म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २०२३

॥ ॐतत्सत् ॥

श्रीयोगवाशिष्ठांतर्गत

# चूडालाख्यान.

( हंसराजकृत अभंग, शतकें २२ ).

बेळगांव—शके १८४१.

आवृत्ति ३ री.

किंमत १० आणे.

REFBK-0003452

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 88805 वि: वाङ्मय
क्रमांक 2088 नों: दि: 31-3-72

कै. प्रभाकर विठ्ठल गुप्ते, रा. ठाणे
यांचे स्मरणार्थ
संग्रहालयास देणगी.

॥ ॐ तत्सत् ॥

श्रीयोगवाशिष्ठांतर्गत

# चूडालाख्यान.

REFBK-0003452

## ( अभंग शतकें २२ )

वेदेश्वरी, वाक्यवृत्तिटीका, सदाचारटीका, कथाकल्पलता, आगमसार, संकेतकुबडी, तत्त्वझाडा इत्यादि ग्रंथांचे कर्ते हंसराज यांनीं केलेलें.

हा

वेदान्तविज्ञान व गुरुभक्तीचा कळस

असा ग्रंथ,

भाविक व मार्मिक मुमुक्षु व साधक जनांच्या उपयोगार्थ

सुविस्तृत विषयानुक्रमणिकादि जोडून

**दत्ताजीराव आबाजीराव सावंत**

यांनीं बेळगांव येथें

आपल्या ' श्रीरामतत्त्व-प्रकाश ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

आवृत्ति ३ री.

या पुस्तकासंबंधीं सर्वप्रकारचे हक्क प्रकाशकांनीं आपल्याकडे राखिले आहेत.

शके १८४९, सन १९२७ इ०

किंमत १० आणे.



# प्रस्तावना.

स्त्रियांची जात व त्यांचें कर्तृत्व ह्मटलें ह्मणजे पुरुषांना मोहून विषयदरींत अडकवून टाकावयाचें, फार झालें तर आपल्याच उद्धाराकरितां पातिव्रत्यानें वागून धर्म, अर्थ व काम ह्या तीन पुरुषार्थांत पतीला साह्य करावयाचें; पण आपल्या भर्त्यास **स्वात्मसुख**प्राप्ति ( चतुर्थ पुरुषार्थ–मोक्ष लाभ ) करून देणारें चूडालेसारखें स्त्रीरत्न–जिचें वर्णन वशिष्ठासारख्यांनीं **निर्वाणनिजबोध** प्राप्तीकरितां श्रीरामचंद्रापाशीं केलें––तें पुरातन सर्व पुराणेतिहासांत अगदीं अद्वितीय आहे. परमवैराग्यावस्थेंत आत्मबोध श्रवण करितां करितां व्यतिरेकानें मनोलय होऊन श्रीरामास समाधि लागली; पण वशिष्ठगुरूस ही तटस्थावस्थारूप एकदेशी समाधि न मानल्यामुळें त्यांनीं रामाला जागृत केलें, त्यावेळीं आनंदसमुद्रांत गटंकळ्या खात असलेल्या आपणांस व्यर्थ देहावर आणिलें, ही प्रपंचप्रवृत्तीची उपाधि आपणांस नको अशी विनंति श्रीरामानीं केली असतां, समाधि उत्थानविरहित जें निजस्वरूप–ज्याचा कधींही व कोणत्याही अवस्थेंत किंचित्‌ही भंग होत नाहीं–तें आत्मत्वेंकरून प्रत्ययास येण्याकरितां वशिष्ठगुरुवर्यांनीं हा पुरातन अत्यंत हृदयंगम इतिहास रामाला सांगितला व हवा तसा व्यवहार करीत असतांना–फार काय घनघोर युद्धप्रसंगींही अगदीं अचल राहील अशी अखंड समाधि त्यांनीं रामाला लाविली.

वेदांताचें आणि इतकें प्रौढ कादंबरीसारखें मनोरंजन करणारें व एकंदर ब्रह्मसूत्रें व उपनिषदांचा रहस्यार्थ तितक्याच सोप्या व गोड शब्दांनीं सांगून त्याचा चित्तावर सदृढ ठसा उमटविणारें पुस्तक दुसरें विरळा असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हें संस्कृताच्या आधारें अभंग छंदांत एका सत्पुरुषानीं रचलेलें, मुमुक्षु व साधक जनांच्या मनास अत्यानंद देण्याकरितां तशा लोकांच्या आग्रहावरून आह्मीं प्रयत्नानें मिळवून छापून प्रसिद्ध केलें आहे. आंतील विषयाचें स्वरूप चांगल्या रीतीनें व लवकर लक्षांत येण्याकरितां पुस्तकाला विषयानुक्रमणिका व त्यांतील मुख्य मुख्य मुद्दयांवर चर्चा केलेला वेदान्त रहस्य-दर्शनाचा एक उत्कृष्ट निबंध जोडला आहे.

बहुतकाळ लागून मूळ संस्कृत समग्र योगवाशिष्ठ ग्रंथाचें मननपूर्वक श्रवण करण्यानें तीव्र मुमुक्षा असलेल्या जीवास जो व जितका बोध होतो, तो व तितका बोध ह्या पुस्तकाच्या वाचनानें सहजगत्या येऊं शकतो, असा अनुभव आहे. ह्या ह्मणण्याचें सत्यत्व वाचकांना वाचनांतींच कळून येणार आहे. शिवाय ग्रंथ लहान, भाषा सोपी व गोड, विषयविवेचन सुबोध, आणि आख्यानही चटकदार असल्यामुळें सुसंस्कृत मनाच्या पुरुषांस त्याचप्रमाणें आत्मज्ञानाची अपेक्षा करणाऱ्या अल्पबुद्धी अबलाजनांसही हे रसाळ अभंग वाचतांवाचतांच अनुपम आनंद होत जाईल व संसारानें संतप्त झालेल्या जिज्ञासु स्त्रीपुरुषांस या नीतबोध ज्ञानप्राप्तीनें सर्व सुखाचें भांडार जें समाधान त्याची पूर्ण प्राप्ति होईल असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

सज्जनकृपाभिलाषी,

**दत्ताजीराव आबाजीराव सावंत,**

‘ श्रीगमतत्त्व–प्रकाश ’ छापखान्याचे मालक.

३८५२

# चूडालाख्यान–विषयानुक्रमणिका.

**१ शतक पहिलें**:–( पृष्ठ १–४ )–मंगलाचरण–चूडालास्तुति–वसिष्ठमहिमा–रामावतार-गुरूवांचून ज्ञानसिद्धि नाहीं ही त्रिभुवनांत प्रसिद्धि होण्याकरितां श्रीराम वसिष्ठास शरण जाऊन ज्ञानोपदेशाकरितां त्यांची प्रार्थना करितात–वसिष्ठ लीलावतारी श्रीरामाची स्तुति करून **स्वरूपवर्णन** करितात–रामास समाधि लागते व ती चित्त तटस्थावस्थारूप एकदेशी समाधि वसिष्ठ उतरवितात-**रामास** खेद होतो–वसिष्ठ सत्य-ज्ञानाचा उपदेश करूं लागतात.

**२ शतक दुसरें**:–( पृष्ठ ४-८ )–निजस्वरूपामध्यें बंधमोक्ष वगैरे कांहीं नाहीं, तथापि प्रपंचप्रवृत्तीची उपाधि आपणास नको असें वाटत असेल तर एक जुनाट इतिहास ऐक ह्मणजे सर्व कांहीं तुझ्या प्रत्ययास येईल असें सांगून वसिष्ठांनीं श्रीरामास शिखिध्वजराजा व राणी चूडाला यांचा इतिहास सांगण्यास आरंभ केला ( १-८ ) चूडालेची इतर पतिव्रता स्त्रियांपेक्षां श्रेष्ठतमता ( ९-१४ )–एका सत्पुरुषापासून उभयतां ( राजा राणी ) उपनिषदादिकांचें श्रवण करितात. ( १६-४६ )–तीव्रतर प्रज्ञेमुळें राणी पूर्ण समाधान पावते पण राजा कच्चा राहतो तें पाहून राणीस वाईट वाटतें. ( ५३ ) राणी स्वानंदांत निमग्न राहून व्यवहार करीत असतां, तिची अंग-कांति पालटलेली पाहून तिला विषय गोड लागूं लागले आहेत अशी शंका घेऊन राजा तिला विचारतो ( -७१ ) विषयमिथ्यात्व वर्णन करून चूडाला आपणास झालेल्या सद्गुरुकृपाप्राप्तीचें व ह्म. पूर्ण स्थितीचें वर्णन करिते. ( –२०१ ).

**३ शतक तिसरें**:–( पृष्ठ ८-१२ )–राणी असत्य सांगते असें समजून राजा तिची हेळणा करितो ( -१७ ) राजाच्या अज्ञानाची राणीला कींव येऊन ती त्याला ज्ञान-पूर्ण करण्याची गुरुकृपाबलावर प्रतिज्ञा करिते ( –३१ ) राजाचा तिचे ठिकाणीं अविश्वास व ह्म. हीनभाव असल्यामुळें ज्ञान स्थिर होत नाहीं. ( -४४ ) राणी पुनः प्रतिज्ञा करून राजास बोध करिते-वैराग्य हेंच ज्ञानाला मुख्य कारण आहे ( -६८ ) पूर्वापूर्व संप्रदायाप्रमाणें राजा अरण्यास जाण्याची इच्छा दर्शवितो; राणी त्याला विवेकावांचून वैराग्य आंधळें आहे, ज्ञानावांचून बाह्यात्कारी त्याग मोक्षास निरुपयोगी आहे असें सदृष्टांत सांगते ( -९५ ) पण राजा उत्तर न देतां स्तब्ध राहतो, त्यायोगें तो बोध राजास पटला असें तिला वाटतें.

**४ शतक चौथें**:–( पृष्ठ १२–१६ )-राजाचें वनवासास जाणें–राणीची व्याकुळता-कारणपरत्वें हठयोगसिद्धीची इच्छा-ज्ञानयोगापुढें हठयोगाची तुच्छता ( ५२-६३ ) निरुपायास्तव हठयोगसाधन.

५ शतक पांचवें:-( पृष्ठें १६-२० )-पूर्ण ज्ञानप्राप्त सिद्धी बाधत नाहींत. ( १-३ )-चूडालेची योगपूर्णता-षड्चक्रभेद ( -२० ) अष्टमहासिद्धींची प्राप्ति ( -३८ ) राज्याचा बंदोबस्त ( -४२ ) लिंगदेहानें चतुर्दशभुवनें धुंडाळणें ( -६९) भर्त्याची अप्राप्ति व चूडालेचा खेद ( -८५ ) दिव्य दृष्टीनें पिंडीं ब्रह्मांड शोधन करीत असतां राजाचा शोध व राज्ञीचा हर्ष ( -५०० ).

६ शतक सहावें:-( पृष्ठें २०-२४ ) राजाचे बोधाविषयीं राणीची तज-वीज-ज्ञानाविषयीं खरी तळमळ उत्पन्न झाल्याशिवाय ज्ञान सांगून व्यर्थ आहे असें ह्मणून त्याला कांहीं दिवस त्याच स्थितींत राहूं देते ( -२० ) पूर्वदेहानें राज्याचा बंदोबस्त ( -२७ ) तीन वर्षांनंतर राजास अनुताप-स्वर्ग व इतर साधनें यांजवर वैराग्यबुद्धि गुरूचा धांवा खरी कळकळ उत्पन्न झाल्यानंतर सद्गुरु दूर नाहींत (९३) चूडाला सिद्धिबलानें पुरुषवेष धारण करित्ये.

७ शतक सातवें-( पृष्ठें २४-२७ )-तेजःपुंज पुरुषरूपानें राजास चूडाला भेटते-राजा विस्मय पावून परम पूज्य भावनेनें पूजा व स्तुति करितो ( -३१ ) तो पुरुष आपलें नांव कुंभक असें सांगून जन्मवृत्त कथन करितो व मुमुक्षूंचा उद्धार कर-ण्याकरितांच आपलें संचरण असतें असें सांगतो (-५४) राजास महानुभावदर्शनानें धन्यता वाटते व कुंभकाची स्तुति करून राजा आपलें इतिवृत्त सांगतो, व संतमाहात्म्य वर्णन करून आपल्या उद्धाराविषयीं प्रार्थना करितो (-८६ ) कुंभकाचें अभयदान.

८ शतक आठवें:-( पृष्ठें २८-३१ ) अनुतापयुक्त वैराग्य प्रबळ होण्या-करितां कुंभक एक हत्तीची चमत्कारिक गोष्ट सांगतो (-३२) अतिपरिचयामुळें अना-दर अथवा हस्त प्राप्तीचा त्याग करणाऱ्या एका ब्राह्मणाची गोष्ट (-५५) दोन्ही गोष्टींचें राजाच्या स्थितीशीं संमेलन-चुडालेसारखी सत्संगती सोडून अरण्यांत आल्याबद्दल त्याची सहेतुक निर्भर्त्सना-त्याचें खरें वर्म ( -८०० )

९ शतक नववें:-( पृष्ठें ३१-३५ )-आपल्या कर्मांबद्दल राजा अत्यंत पश्चात्ताप दर्शवितो व गुरुदर्शनानें सर्व कष्ट परिहार झाले असें सांगून पुढें काय करावें असें विचारितो (-३५) सद्यो विरक्तीबद्दल त्याचें अभिनंदन करून निष्काम भावानें केलेली जपतपादि खटपट अंतःकरण शुद्धीला उत्तम कारण झाली असें सांगून कुंभक राजाला आश्वासन देतो (-५१) भवभयाचा नाश व परम सुखाचा लाभ कसा होईल असा राजानें प्रश्न केला असतां त्याग हेंच सर्व सुखाचें मूळ असें प्रथम उत्तर देऊन बाह्य पदार्थांचा त्याग तो त्यागच नव्हे असें सांगतो ( ९०० ).

१० शतक दहावें:-( पृष्ठें ३५-३९ ) राजा गैरसमजुतीनें देहत्याग कर-णेस जातो, तें त्याचें मूर्खत्व सदृष्टांत त्याच्या पदरीं घालून देहत्याग केला तरी त्याग घडत नाहीं असें कुंभक सांगतो व नरदेहास येऊन ज्ञान संपादन करीत नाहीं तो तित-क्याही जन्मीं आत्महत्या करणारा होतो असेंही सांगतो-सुखास मूळ ज्ञान-ज्ञानसिद्धीस कारण त्याग-त्याग ह्मणजे देहादिक बाह्यपदार्थ त्याग नव्हे, तर संगत्याग-संग अहंका-

राचा, असें सांगून त्रिपुटीसंगापर्यंत त्याग करणेस सुचवितो (-५५) अति सूक्ष्म रूपानें अंतरांत स्फुरणारें मीपण कसें त्यागावें-ब्रह्म तें काय, आत्मा तो कोण-अहंकार सुटून संपूर्ण त्याग कसा घडेल अशाविषयीं राजा प्रश्न करितो ( १००० )

**११ शतक अकरावें:**-( पृष्ठें ३९-४३ ) कुंभकाचें उत्तर-तत्त्वविचार-सच्चिदानंदपदविवरण-मायानिरास-विद्या अविद्या-जीवशिव स्वरूप-उपाधीचे प्रकार-व्यष्टी-समष्टीभूतपंचक-अव्याकृत-त्रिगुण-कर्मेंद्रियें-ज्ञानेंद्रियें-सप्तदशकलात्मक-जीव-प्राज्ञ तैजस विश्व अभिमानी-बाह्य नामतः मात्र भेद, स्वरूपतः सर्वत्र अभेद-प्रत्ययविचार-ब्रह्मार्चे सनातनत्त्व-प्रळयकाळीं सर्वांसच मोक्ष मिळत नाहीं-ब्रह्मज्ञानानेंच मुक्ति-अहंकारामुळेंच विश्वाभासादि-या त्रिविध अहंकाराचें व नेणिवेचें साक्षित्व-शुद्ध आत्मस्वरूप-तिन्ही अभिमान निःशेष मावळले तरच मुक्ति ( -११०० ).

**१२ शतक बारावें:**-( पृष्ठें ४३-४७ ) कुंभकाचा राजास नित्य सहवास घडतो सांख्य, योग, वेदांत, इत्यादिकांची रोज चर्चा होते-राजास सत् व चित् हीं दोन पदें कळतात पण आनंदाचा अनुभव मात्र येत नाहीं, त्याचे प्राप्तीसाठीं तो गुरूची प्रार्थना करितो-ते त्यास उत्तर देतात-निर्विकल्पाचे प्राप्तीचा उत्तम अभ्यास (३०-३८) सहज कुंभक ( -४० ) सविकल्प समाधी ह्मणजे काय ( ४१ ) निर्विकल्प सोहळा तो कोणता (४२) ब्रह्मानंद व वासनानंद यांचीं लक्षणें (४८) निर्विकल्प समाधि(४९) -चार वाचांचीं लक्षणें ( ५२-५५ ) त्यांतील परस्पर अन्वयव्यतिरेक प्रकार ( ५८ ) चार अवस्था व त्यांचे चार अभिमानी यांचीं लक्षणें ( ६०-६८ )-चारी अभिमाना-पलीकडे शुद्ध आत्मा ( ६९ ) अन्वयेंकरून चारी अवस्थेंत आत्म्याची व्याप्ति ( ७०-७५ )-व्यतिरेक स्वरूप ( ७६ ) अशा सविकल्प अभ्यासानेंच निर्विकल्प प्राप्ति ( ७८ ) अभ्यासांत प्राप्त होणाऱ्या विक्षेपादि चार विघ्नांचे प्रकार ते निवारण्याचे उपाय ( ८०-८८ ) निर्विकल्प समाधीचा अभ्यास करितांना चित्त उफाळतें, तसें न होण्यास उपाय ( ९५-९६ ) अशा अभ्यासबळानें शिखिध्वजराजास निजात्मस्वरूप प्राप्त होतें.

**१३ शतक तेरावें:**-( पृष्ठें ४७-५१ ) त्यास अशी समाधि लागलेली पाहून कुंभकरूपी चूडालेस परम हर्ष होतो. ती त्यास तसाच ठेवून देऊन पूर्व देह धारण करून दीड वर्षपर्यंत राज्यकारभार पाहते-नंतर पुनः राजाकडे येऊन त्यास समाधींतून जागृत करिते. स्वात्मसुखप्राप्तीबद्दल तो अत्यंत आभार दर्शवितो-पण समाधिभंगाबद्दल हळहळतो-कर्में करीत असतांही समाधीचा भंग होऊं नये याबद्दल विवेचन करून ती त्याचें समाधान करिते ( ७०-८७ ) बाह्य कोणतेही व्यापार चालले तरी आत्मा असंग असतो वृत्ती उठूंच नयेत हा आग्रह चुकीचा आहे, मोक्षास कारण क्रिया नसून ज्ञान हेंच एक कारण होय-अहंकारादिकांचे नाशासाठीं जे उपाय करावे ते क्रियारूप होतात, व कर्माचा आणि मोक्षाचा तर विरोध आहे-करितां अंतःकरण-व्यापार चालले असतांही आपण ते मिथ्या असें समजून आत्म्याचें निःसंगत्व पहावें-

आत्म्याचें ठायीं उत्थान केव्हांच नाहीं मग समाधी उत्पन्न झाली असें कसें ह्मणतां येईल (९७) वृत्ति अनेक उठल्या तरी आत्मत्व कायम असतें. (९९-१३००)

१४ शतक चौदावें:–(पृष्ठें ५१-५४) अन्वयव्यतिरेक विवरण-भेद वसतो तो नामरूपींच-वस्तुतः सर्वत्र अभेद-आत्मत्वांत प्रवृत्ति नाहीं व निवृत्तीही नाहीं (२१-२२) एक आत्माच परिपूर्ण आहे नामरूप कल्पूंच नये. आत्मप्राप्तीस विचारावांचून इतर कोणतींही साधनें नको आहेत (२५) आत्मा ह्मणजे आपणच असा निश्चय करावा. (२६) समरसता व त्रिपुटीनिरास-कोणत्याही स्थितींत आत्म्याचें पूर्णत्व खंडत नाहीं-बोधप्राप्तिनंतर राजा आपलें धन्यत्व वर्णितो-शास्त्रप्रतीति, गुरुप्रतीति व आत्मप्रतीति (५५-५७) अपरोक्षतेचें लक्षण (५८) स्वरूपाचा एकदा प्रत्यय आला तरी परिपक्वता व्हावयाचीच असते-समाधि या शब्दाचा खरा अर्थ (६१) मायिक समाधीचे प्रकार (६४-६८) पूर्ण समाधान अथवा समाधी याचें सुविस्तृत विवेचन (७०-८०) उत्थानाचीं लक्षणें (८३-९८) अशा उत्थानानें नसता संदेह उत्पन्न होतो व संदेहाच्या अभावानें अपरोक्षता दृढ होते (१४००).

१५ शतक पंधरावें:–(पृष्ठें ५४-५८)-त्रिकाळीं उत्थान होऊं नये याला वृत्ति अभ्यासावी लागते-स्वस्तोत्थान व परतोत्थान यांचीं लक्षणें (५-८) दृढ अपरोक्षता ती कोणती (९)-त्रिविध प्रतीतीनें अभ्यासपूर्वक वृत्तींचा खळ झाल्यावर उत्थान रहात नाहीं. (१०-१७) अभ्यासाचें सौलभ्य (२४-२७)-कुंभकाची स्तुति-अभ्यासाविषयीं राजाची आस्था-राजाची आदरबुद्धि पाहून कुंभक हा अभ्यासक्रमाचा विशेष परिस्फोट करितो-स्फूर्ति नाश-विश्वाभिमान्याचा लय (–६९) तैजस अभिमानी याचा लय होण्याविषयींचा अभ्यास (–१५००).

१६ शतक सोळावें:–(पृष्ठें ५८-६२) प्राज्ञ अभिमानी नाश पावण्यासाठीं त्रिपुटी ओळखली पाहिजे. मूळ अज्ञान तें कोणतें! (१५-१८) प्राज्ञाची व्याख्या (१९)–प्राज्ञाचे निर्मूलनावांचून ज्ञानाची परिसमाप्ति नाहीं (२०) ज्ञेय, ज्ञान व ज्ञाता यांचेपलीकडे शुद्ध स्वरूप-साध्य व साधक, दृश्य व द्रष्टा यांतील परस्पर भिन्नता दिसून देतां आपली ह्म० आत्म्याचीच परिपूर्णता पहावी-असा अभ्यास चालविला असतां हळू हळू ज्ञानाची समाप्ति विज्ञानांत होते-विज्ञान ह्मणजे काय? (३२-३५)-असा अभ्यास चालवून राजा पूर्णतेप्रत पावलेला पाहून कुंभकास आल्हाद होतो व तो त्याची पाठ थापटतो. कुंभकाच्या आज्ञेनें राजा अनुभूत स्थितीचें उत्तम प्रकारें वर्णन करितो (४६-७२)-कुंभक आतां आपलें कार्य झालें असें सांगतो तेव्हां मानवदेहाचा व गुरु, शास्त्र इत्यादिकांचा महिमा वर्णन करून राजा कुंभकास सेवादानाविषयीं विनवणी करितो-त्यास कुंभक रुकार देऊन तिकडे राहतो.

१७ शतक सतरावें:–(पृष्ठें ६२-६६)–राजास कसून पाहणेसाठीं त्याची वैराग्यादि दैवी संपत्ति ऱ्हास पावण्याजोगी कुंभक एक अद्भूत माया रचितो–देव ऋषि गंधर्वादिकांचा समुदाय जमतो–त्यांचें आतिथ्य–ते त्याचा गौरव करून अनेक

दिव्यलोकसंपदेची लालसा दाखवितात-राजा त्या गोष्टींचा तिटकारा करितो—त्याचे नैराश्याची पुनः परीक्षा पाहणेकरितां कुंभक त्यास घेऊन विमानांतून चतुर्दश भुवनें फिरतो-त्यास अनेक गोष्टी दाखवितो-राजाचें मन त्यांत मुळींच आसक्ति धरीत नाहीं. सर्व ज्ञानी लोकांनीं अवश्य लक्षांत ठेवण्याजोगी राजाची अनुपम अशी सर्वत्र अद्वैत भावना (६०-७७) सर्वांस अनुकरणीय असें बुद्धीचें आग्रहराहित्य, अथवा " बुद्धे-फलमनाग्रहम् " हें तत्त्व ( ७८-१७०० ).

१८ शतक आठरावें:–( पृष्ठें ६६-७० ) राजाच्या कामवासनादि मनोविकारांची परीक्षा पाहणेसाठीं कुंभक दुसरें एक कपटजाल उत्पन्न करितो—स्त्रीरूप होणेबद्दल दुर्वासाचा शाप झाल्याचा बहाणा व त्यासाठीं त्याचा मायिक खेद-तो दूर होण्यास राजा परम विनयानें बोधपर चार शब्द सांगतो—अस्तमानाचे वेळीं कुंभकास स्त्रीरूप प्राप्त होतें.

**१९ शतक एकोणिसावें:**–( पृष्ठें ७०-७४ )-मदनिका हें नांव धारण करून कुंभक रोज रात्रीं स्त्रीवेषानें असतो. शयनादिव्यापार एकत्र होतात, पण राजाचा बोध किंचितही ढळत नाहीं-त्याचे चित्ताची निर्विकारता व बुद्धीची निश्चळता-त्याचे अहंभावशून्यतेची व निर्विषयतेची मदनिकेकडून अधिक परीक्षा-विषय प्राप्त झाले नसतां चित्त निर्विकार रहाणें यांत नवल नाहीं, पण बलवत्तर प्रारब्धानें देहास विषय भोग प्राप्त झाले असतांही समाधिभंग न झाला तरच ज्ञानाचें सार्थक (४४-५४) गुरु आपली परीक्षा पाहत आहेत असा राजास किंचित् संशय येतो-अकृत्रिम अशा आत्मसुखापुढें इतर बाह्य ह्म. कृत्रिम सुखें सर्व तुच्छ आहेत असें तो ह्मणतो ( ७२-७४ ) मदनिका ही राजास आपला पति होणेविषयीं विनंति करिते-राजा अत्यंत खेदानें मूर्छितप्राय होतो.

**२० शतक विसावें:**–( पृष्ठें ७४-७७ ) राजा सावध होऊन तिचे पायीं लागतो—मदनिकारूपीं कुंभक त्याचें समाधान करूं लागतो. ज्ञानी पुरुषानें देहात्मबुद्धि समूळ टाकिली पाहिजे-आपणास ह्म. आत्म्यास जीवदशा कां प्राप्त झाली ( १३ ) संचित, क्रियमाण व प्रारब्धकर्म यांचें स्पष्टीकरण व तिहींचा नाश कशानें होतो याबद्दल खुलासा ( १४-२१ ) प्रारब्धाची दुर्निवारता ( २२-२९ ) सर्वांस प्रारब्ध हें सारखें असतां ज्ञानी पुरुषास त्यापासून सुखदुःख होत नाहीं तें कसें ( ३०-३३ ) आलेला प्रारब्धभोग निमूटपणें भोगला पाहिजे-अनिष्टाचा प्रतिकार करण्याचा आग्रह धरिला तर जीवावर क्रियमाणाची जबाबदारी मात्र विनाकारण येते-अहंभावाचे त्यागाविषयीं व समाधानाविषयीं विशेष सयुक्तिक विवेचन ( ४०-४७ ) विवाहाविषयीं राजास कुंभकाची आग्रहपूर्वक आज्ञा-राजाचा निरुपाय-त्याची गुर्वाज्ञापरिपालनदक्षता-उभयतांचा विवाह-विवाहविधीवर आध्यात्मिक रूपक ( ६४-६९ )-विवाह झाला असतांही मदनिकेविषयीं राजाचे चित्तांत पत्नीभाव उत्पन्न होत नाहीं-ती त्यास अनेक तऱ्हांनीं मोह पाडण्याचा यत्न करिते पण तिजविषयीं त्याची गुरुबुद्धि किंचित्‌ही लोपत नाहीं-( ७७-९५ )

**२१ शतक एकविसावें:**–(पृष्ठें ७८-८१) निर्विकल्प अद्वैतबोध अंत:करणांत सुदृढ ठसला असल्यामुळें राजाची समाधि व्युत्थानच पावत नाहीं-त्रिपुटीचा पूर्ण ग्रास करून तो सदा स्वस्वरूपींच रममाण असतो-आपले विषयींचा राजाचे मनांतील पूज्य-भाव मोडतो कीं काय हें पाहणेसाठीं मदनिका व्यभिचार केलासें दाखविते-तरीही त्याचें नि:सीम गुरुप्रेम व ज्ञान हीं काडीमात्र विकार पावत नाहींत-( सर्व गुरुभक्तांनीं अधिक लक्ष्य देण्याजोगा येथें त्याचे गुरुभक्तीचा कळस होतो )-सर्व इंद्रियांचे व्यापार, किंबहुना एकही स्फूर्ती गुरुस्वरूपावीण न पाहणें ( ६९-७२ ) त्याची अशाप्रकारच्या परिपूर्ण ज्ञानसंपन्नतेची खात्री झाल्यामुळें चूडालास गहिंवर येतो व त्याचें याहून अधिक सत्व पाहणेचा यत्न सोडून मदनिकेचा वेष टाकून एकदम मळच्या राणीचे रूपानें ती त्यापुढें उभी राहते-राजा शिखिध्वज विस्मित व साशंक होतो—आरंभापासूनचें सर्व वृत्त निवेदन करून ती त्यास शंकामुक्त करिते-राजा परम आश्चर्यचकित व आनंद-भरित होतो—तो तिला प्रथम नमस्कार करून नंतर अंकावर घेतो-उभयतां गुरुशिष्य ब्रह्मानंदीं समरस होतात.

**२२ शतक बाविसावें:**–(पृष्ठें ८१-८५) नंतर तिची नानाप्रकारें स्तुति करून तो अत्यंत उपकार प्रदर्शित करितो व पूर्वींचे आपले अन्यायाबद्दल क्षमा मागतो—उपकार मानण्याचें कारण नाहीं, आपण नवीन कांहींच दिलें नाहीं, असें सदृष्टांत ( २६-३२ ) सांगून चूडाला त्यास राज्यावर घेऊन येते-चूडालेच्या ठिकाणचा पत्नीभाव उडून जाऊन जागृतींतील सर्व व्यवहारांत व स्वप्नांत सुद्धां तिच्याविषयीं राजाचा गुरुभाव अचल राहतो व तो जडचंचल सर्व विसरून सर्व चराचर गुरुस्वरूप पाहतो ( ३८-६३ ) असा इतिहास वसिष्ठांनीं श्रीरामचंद्रास सांगून अवतारकार्य यथासांग संपादण्याविषयीं उपदेश केला व तो श्रीरामांनीं मान्य केला ( -७६ ) ग्रंथकर्त्याचा उपसंहार (-२२००).

[ श्लोक–अनुष्टुप् ]

आख्यानविषयादर्श केला हा पारदर्शक ॥
दर्शवी तत्स्वरूपा जो स्वस्वरूपाहि साधकां ॥ १ ॥

**॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥**



# कांहीं कठिण शब्दांचें अर्थ.

[ शब्दांमागील आंकडे शतकारंभाचे दर्शक समजावे. ]

१ परात्पर—मायेपलीकडील
बंदीजन—स्तुतिपाठक
बुझें—समजे
उपमावे—उपमा द्यावी
निके—चांगलें
क्षुरा—वस्तरा
तावावे—तापवावे
वोहटे—मागें परते
निर्वाणी—शेवटचे स्थितींत, ( स्वस्वरूपीं )
गिरा—वाणी
मार्तंड—सूर्य
आली नवचे—येत नाहीं
२ बोज—चांगले रीतीनें
मिथुनाचा—दोघांचा
पद्मकरीं—हस्तकमलानें
सामुग्री—पुण्याईचा साठा
इह—या लोकीचें
आमुष्मिक—परलोकसंबंधीं
उटंक—उथळ
नामरूप—शब्द व आकार अथवा कल्पना
त्रिपुटी--द्रष्टा दृश्य दर्शन इ०
सप्रतीत—सानुभव
वोप—शोभा, तजेला
उडूप—चंद्र
रजत—रुपें
गंधर्वनगरी—आकाशांत नगरीप्रमाणें दिसणारा ढगांचा समुदाय, माया
विश्रामेल—शांत होईल
वोडंबर—इंद्रजाल; गारूड
लेणें—अलंकार
आतुडतां—मिळाली असतां
केउता—कसला
केवळसुखें—निर्विषय सुखानें
बाणली—प्राप्त झाली; पटली
कांजी—पेज
जळाच्या अतौता—पाण्यामध्यें
दुमदुमिलें—भरलें
वोखटा—वाईट
३ हेळसून—धिक्कारून
खरखरा—हुरहूर
खर्पूस—चोख; चमचमीत
राहा—तऱ्हा, राहटी
निर्बीज—पोलकट
मोड—कोंब
अटाटी—खटपट
४ अवरीं—पायथ्याशीं
गुंफा—गुहा
कंबळेचें—कांबळीचें
इडा—डावेकडील योगनाडी
पिंगला—उजवेकडील योगनाडी
सुषुम्ना—इडा व पिंगला यांचे मध्य संधीची नाडी
५ समीर—वायु
पैठी—स्थित
तुंबीणीची—भोपळयाची
६ उपतिष्ठत—पावेल
अभिनिवेश—आसक्ति
निज—स्वस्वरूप

७ परिग्रह–संग्रह, परिवार
मुमूर्षु–मरणोन्मुख
अवर्षण–अनावृष्टि
कोडें–कौतुक
८ उपाळे–फार वाढे
गार–मोठा खळगा
महावत–महात
जनस्थान–नगरी
हेकाडी–दुराग्रह
९ उरग-सर्प
हेकड-पिसाट, हट्टी
१० व्यष्टी–व्यक्ति
समष्टी–समुदाय
भौतिक–भूतांसंबंधीं
हारपल्या–नाहींशा झाल्या
नाथिलें–नसलेलें, खोटें
११ त्रिपदविवरण–तत्त्वमसि०
आविष्कारे–प्रगटे
१२ बालाग्र–केंसाचें अग्र
चइलें–जागृत झालें
गोलक–इंद्रियाचें छिद्र
दुकळिया-दुष्काळांतील उपवासी माणसाला
सिद्धान्न–शिजून तयार झालेलें अन्न
थाया–छंद, हट्ट
१३ चडळ–ढेंकूळ
परोक्ष–अप्रत्यक्ष
अपरोक्ष–प्रत्यक्ष
घुंगुट–बुरखा
१४ पाडे–सारखे
वहिले–लवकर
निपटून–निखालस
निमाला–नष्ट झाला
१५ अनुभाव्य–अनुभव ज्याचा घ्यावयाचा तें
अनुभविता–अनुभव घेणारा
अनिर्वाच्य–सांगतां न येण्याजोगें
शनैः-हळू हळू
नवचे बोलिलें–बोलून दाखवितां येत नाहीं.
संवे–संवय
१६ वस्तुतंत्र–निष्कर्मस्वभावरूप
कर्तृतंत्र–कर्मीस्वभावरूप
पाडें–मोल, उपमा
बोजा–चांगला
येरु–तो, दुसरा
१७ मीने–मिळे, मिसळे
निष्टंक–खरोखर
ओळंबा–वाळवी
मणिस्तंभ–रत्नाचा खांब
निबुजला–घाबरला, झांकला
रळी–विनोद
१८ पैजा–पैजेनें
अचळीं–पदरांत
बोसंगा निभोनी–मांडीवर पडून पदरांत घुसून
सटवली–नष्ट झाली
बिंदु–शून्य
धावा–वृत्ति
चिदचिद्ग्रंथी–अहंकार
हार्द–अंतस्थ हेतु
संभ्रम–मोह
२० निष्कर्षीचें–निकराचें
भोवलें–फिरलें
मथितार्थ–सार, तात्पर्य
२१ धर्मत्रयी–धर्म, अर्थ, काम
कुरवंडी–ओवाळणी
परवडी–उपचार
उपायनें–नजराणे
वृंदावन–एक कडू फळ

# ॥ योगवाशिष्ठांतर्गत चूडालाख्यान ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीरामसमर्थ ॥ श्रीसद्गुरुस्वामीसमर्थ ॥

जय जय जया श्रीगुरुसमर्था । अर्थाचिया स्वार्था परात्परा ॥ १ ॥
संतश्रोते साधु सर्वांसी प्रार्थना । योगी मुनिजना नमन माझें॥ २ ॥
आतां श्रोतीं द्यावें पूर्ण अवधान । परमार्थकथन कीजेताहें ॥ ३ ॥
पवित्र आख्यान मंगळा मंगल । तेची बोलिजेल चूडालेचें ॥ ४ ॥
जयेची हे कथा वासिष्ठ बोलत । श्रीराम ऐकत परमादरें ॥ ५ ॥
काय तिची थोरी वर्णावी वाचेनें । शेष पार नेणें अथवा वेद ॥ ६ ॥
युगायुगीं झाल्या स्त्रियाही अनंत । सम नाढळत चूडालेच्या ॥ ७ ॥
नाहीं देखीयेलें नाहीं ऐकीयेलें । निजभर्त्या दिधलें स्वात्मसुख ॥ ८ ॥
स्त्रियांची हे जाति पुरूषा मोहावें । बंधनीं घालावें विषयदरीं ॥ ९ ॥
ऐसें असतांही काय नवलावो । निजपदीं ठावो भर्तीयासी ॥ १० ॥
ऐसी कृपाळू ते माऊली जगाची । व्यक्ति हे स्त्रियेची ह्मणे कोण ॥ ११ ॥
असो ऐसी धन्य धन्य ते माऊली । वसिष्ठें गाईली निजमुखें ॥ १२ ॥
सूर्यासम ज्याची छाटी मीरवत । पृथ्वीस वाहत दंड ज्याचा ॥ १३ ॥
कमंडलूंतूनी अमृततुषार । वाहे निशीकर सम ऐसा ॥ १४ ॥
विश्वामित्र ज्याचें सामर्थ्य पाहुनी । राज्यही त्यागूनी वन सेवी ॥ १५ ॥
ऐसा महाराज पूर्ण ज्ञानयोगी । सृष्टाक्रमालागीं कर्मी वर्ते ॥ १६ ॥
अंगें जो निष्कर्म तया कैचें कर्म । आचरे स्वधर्म लोकांसाठीं ॥ १७ ॥
सूर्यवंशीं महाविष्णूचा अवतार । होणें धराभार उतराया ॥ १८ ॥
याची हेतू सूर्यवंशीं पौरोहित्य । स्वीकारी अगत्य निश्चयपरी ॥ १९ ॥
असो ऐसा मुनीराज चुडामणि । श्रीरामालागूनी बोधीतसे ॥ २० ॥
दुष्ट संहारावे सज्जन पाळावे । यास्तव संभवे यागायुगीं ॥ २१ ॥
त्रेतायुगामाजी अवतार सातवा । स्वात्मसुख ठेवा निजभक्तां ॥ २२ ॥
तया कासयाची ज्ञानासिद्धि व्हावी । निजांगें गोसावी ब्रह्मरूप ॥ २३ ॥

वेद बंदीजन शास्त्रें भाट होती । जया वर्णीताती दिननिशी ॥२४॥
तोचि परमात्मा जनाच्या उद्धारा । स्तवीतसे गीरा गुरुलागीं ॥२५॥
गुरुवांचूनीयांनव्हे ज्ञानसिद्धी । हे व्हावी प्रसिद्धि भुवनत्रयीं ॥२६॥
जैसीजैसी रीति श्रेष्ठ आचारती । लोकही वर्तती तेणें रीति ॥२७॥
या हेतू श्रीराम श्रीगुरु सेवन । होऊनियां लीन प्रार्थीतसे ॥२८॥
नाहीं तरी तया कासया उपदेश । स्वयें जगदीश पूर्ण ब्रह्म ॥२९॥
परी श्रेष्ठाचारें वर्ततसे अंगें । जना मार्ग लागे विचाराचा ॥३०॥
एकांताच्या ठाईं वसिष्ठ मुनीसी । प्रेमें साष्टांगेंसी वंदी राम ॥३१॥
नेत्रींअश्रुधारा कंठ सद्गदीत । स्वमुखें स्तवीत दीनापरी ॥ ३२ ॥
जयजय महाराज गुरुराया । त्रैलोक्या ताराया तूंची एक ॥ ३३ ॥
मज अथानासी बोधा ब्रह्मज्ञान । अनन्य शरण गुरुराया ॥३४॥
वत्सालागीं जैशी धेनु कळवळे । तेवीं पाजीं लीळें स्वात्मसुख ३५
धन्य म्यांदेखीलें पाउला गुरुचे । धन्य भाग्य साचें आमुचें जगीं ३६
आतां स्वामी मज उपदेशा ज्ञान । जेणें समाधान अखंडीत ॥३७॥
ऐसें प्रार्थुनियां पुन्हा चरण धरी । वारंवार करी प्रदक्षिणा ॥३८॥
वसिष्ठें ऐकोनी प्रेमें आळंगीलें । स्वमुखें बोलिलें धन्य रामा ॥३९॥
अगा तूंची तरी स्वामी त्रैलोक्याचा । वेद गात वाचा भाटापरी ४०
सकळ मंगळ तुझिया मंगळें । सर्वांसी सोहळे तुझिया योगें ॥४१॥
सर्व डोळसांचा डोळा तूं श्रीरामा । सर्वां सर्व कर्मां आधार तूं ४२
सर्व ज्ञानियांसी ज्ञान तुझ्या योगें । योगी लागवेगें ध्याती तुज ४३
तुजसाठीं योग आणि संतसंग । त्यागिताति भोग तुज साठीं॥४४॥
सकळ कल्याण जगाचें जीवन । पतितपावन तूंचि रामा ॥ ४५ ॥
अर्क प्रकाशीत तुझीये प्रकाशें । वायु वाहातसे तुझे आज्ञें ॥४६॥
तुझीया भयानें मृत्यु संहारीत । शीतळ करीत चंद्र जना ॥४७॥
अग्नी वाहतसे दहन शाक्तितें । जगा धरणें ते शक्ती भूमीं ॥४८॥
तुझे आज्ञेमुळें आपीं असे गोडी । द्रवत्व न सोडी कल्पांतींही ४९

जें जें होतें जातें तुझ्या शक्तिवशें । हें असो काईसें ब्रह्म तूंची ५०
तिहीं काळीं आहे नाश कधीं नोहे । तेंचि तुझें पाहें रूप रामा ५१
जागृति स्वप्नातें सुषुप्तीतें जाणें । तेंची रूप होणें तुझें रामा ॥५२॥
जेथें सुखदुःख निःशेषची नाहीं । केवळ सुख पाहीं तूंचि रामा ५३
जीवशीव दोनी प्रतिबिंब तुझें । मिथ्यत्वेंसी बुझें आपुले ठायीं ५४
यास्तव तूं एक आहे तैसा होसी । कल्पना कायसी तुझ्याठायीं ५५
पंचभूतादिक जितुकें हें जग । रज्जूचे भुजंग तुझ्या ठायीं ॥५६॥
अवयवावीण अमुकासारिखें । उपमावें निकें कैसें रूप ॥ ५७ ॥
ऐसा तूं अभेद एकपणें वीण । अनिर्वाच्य खूण तुझी रामा ॥५८॥
तुझे ठायीं केव्हां जहालें अज्ञान । ह्मणोनियां ज्ञान प्रगटावें ॥५९॥
गाईचीये कासीं सायची असावी । तरिच फेडावी ढवळूनी ॥६०॥
आकाशाची साली काढावी ते कैसी । तळहातींच्याकेशी क्षुरालाऊं ६१
पाणिया धुवावें चांदण्या उठावें । तैसें तुझें जावें अज्ञान हें ॥६२॥
नाहीं तया रामा कैसें निवारावें । नसतां वधावें वंध्या पुत्रा ॥६३॥
आहे तया कांहीं घेतां देतां नये । जाणेंही होय कैसें तेथें ॥६४॥
अग्नीशीं तावावें हिऱ्या पूट द्यावें । पाणिया पाजावें पाणीकेवीं ६५
आकाशास कैसें आकाशीं शयन । अमृता रांधन कैसें रामा ॥६६॥
तैसें तुझे ठायीं जाणणें हें खोटें । विचार वोहटे मागिल पायीं ६७
ऐसा तुं गा रामा ज्ञानाज्ञानेंवीण । तया समाधान कैसें द्यावें ॥६८॥
आपआपणासी सांडून परदेशीं । गेलासे तयासी भेटवावें ॥६९॥
आपुलें श्रीमुख असावें विन्मुख । तरी तें सन्मुख करणें लागे ७०
सन्मुख न होतां मुख हरपलें । हें नाहीं ऐकिलें करणामुळें ॥७१ ॥
तैसा तूं अक्षयीं रामीं राम होसी । होणें जाणें तुजसी कोठें आहे ७२
संयोग वियोग आपापणा केवीं । तूंचि तूं गोसावी नामेंवीण ॥७३॥
बोलणें खुंटलें मौन हारपलें । ऐसें जें संचलें तूंचि रामा ॥७४ ॥
ऐसी वसिष्ठाची वाणी पडतां कानीं । श्रीराम निर्वाणीं समरसे ७५

सागरांत जेवीं गंगा एकरूप । वृत्तीचे संकल्प तैसे झाले ॥ ७६ ॥
देह काष्ठवत तटस्थता आली । समाधी लागली निर्विकल्प ॥ ७७ ॥
श्रीरामाची स्थिती वसिष्ठ पाहुनी । कांहीं हर्ष मनीं झाला नाहीं ॥७८॥
तेव्हां मुनिराज विस्मय पावले। ह्मणाति कैसें झालें अघटीत ॥७९॥
प्रवृत्तीचें रूप मुळीं झालें नाहीं । तेथें निवृत्तीही आली कोठें ॥८०॥
सविकल्प जरी स्वरूप असतें । तरी बोलूं येतें निर्विकल्प ॥ ८१ ॥
निजरूपीं केव्हां जाहलें उत्थान । समाधि निर्माण नेणों कैसी॥ ८२ ॥
जेथें अद्वैतेंसीं द्वैत हें मावळे । समाधिसोहळे तेथें कैचे ॥ ८३ ॥
समाधि उत्थान हेंची नोहे ज्ञान । तरी सावधान करूं यासी ॥८४॥
मग मुनीरायें थापटिला पाठी । धरूनी हनुवटी कुरवाळीती ॥८५॥
उठीं उठीं रामा तटस्थता केवीं । विचारें पाहावी सहजस्थिति ॥८६॥
ऐसी गुरूवाणी अंतःकरणीं पडतां । नेत्र उघडीता होय राम ॥८७॥
परी आनंदांत वृत्ती बुचकुळे । तेणें नेत्रकमळें झांकुळतीं ॥ ८८ ॥
कंप सर्व गात्रीं नेत्रीं अश्रुधारा । बोलतसे गिरा मंद मंद ॥ ८९ ॥
धन्य गुरुराया कृपा केली स्वामी । मेळविलें रामीं निर्विकल्पीं ॥९०॥
मज निर्विकल्पा संकल्पाची मात । नसावी मागत हेंचि स्वामी॥ ९१ ॥
सदां सुखी असो अखंड समाधी । नसावी उपाधि प्रवृत्तीची॥ ९२ ॥
श्रीरामवचन ऐसें आयकोनी । वसिष्ठ हंसोनी बोलताती ॥ ९३ ॥
श्रीरामा सर्वज्ञा अगा वेदमान्या । बोलतोसी अन्या आज्ञा ऐशी ९४
तुजवीण काय असेगा वेगळें । ह्मणोनि ये वेळें सांडुं पाहसी ॥९५॥
जळें लहरि कैसी परती सारावी । अग्नीनें दवडावी ज्वाळा केवीं॥ ९६ ॥
निज किरणावरी मार्तंड रूसला । कीं चंद्र विटला चांदणी या ।९७।
तैसा तूं आपुले ठायीं या वृत्तीसी । दवडूं पाहसी वाउगेंची ॥९८॥
पाणीयाच्या ठायीं लहरी उठली । तेणें क्षीणता आली नवचे आपा९९
तैसी तुझी स्थिति परिपूर्ण असे । भेदभान नसे बोले वेद ॥ १०० ॥
मागुती वसिष्ठ बोलती श्रीरामा । समाध्यादि कर्माअलिप्त तूं ॥ १ ॥

जागृती अथवा स्वप्न आणि झोंप। तेवीं निर्विकल्प समाधि हा ॥२॥
बुद्धीवृत्तियोगें अवस्थेसी नांव। नाहीं तरी ठाव कैंचा कोणा ॥३॥
स्वरूपीं पहातां रूपनाम नाहीं। उत्पत्तिस्थितिही लय तैसा ॥४॥
नाहीं बद्धसिद्ध मुमुक्षु साधक। परमार्थ निष्टंक जाणें ऐसा ॥५॥
तथापीहि रामा तुज वाटतसे। प्रवृत्तीचें पिसें मज नको ॥६॥
तरी अवधारी जुनाट इतिहास। तेणें प्रत्ययास येईल तुज ॥७॥
यया पूर्वयुगीं राजा शिखिध्वज। यथायुक्त वोज प्रजा पाळी ॥८॥
तयाची ते भार्या चुडाला नामाची। धर्मार्थ कामाची धर्मपत्नी॥९॥
धर्म पत्नियोगें अर्थ पत्नियोगें। काम पत्नि योगें कर्मकांडीं॥१०॥
पत्नीयोगें मोक्ष नाहीं बोलियेला॥ अन्यथा तो केला चूडालेनें॥११॥
पार्वती सावित्री लक्षुमी सुंदरी। परी नये सरी चुडाळेची ॥१२॥
पवित्र त्या धन्या खऱ्या पतिव्रता। तारियेला भर्ता कोठें कोणें॥१३॥
ह्मणोनी चूडाला सर्वांमध्यें श्रेष्ठ। तिची कीर्ती स्पष्ट ऐकें रामा॥१४॥
ऐसा पत्नीयुक्त शिखिध्वजराजा। पाळीतसे प्रजा यथान्यायें॥१५॥
कोणीएक मुनिराज पूर्णज्ञानी। अखंड समाधानीं विचरत ॥१६॥
तया मिथुनाचा भाग्योदय झाला। मुनीराज आला सदनीं त्यांचे।१७।
उभयतां उठोनी साष्टांगीं नमीलें। आसन दीधलें बैसाया ॥१८॥
अर्घ्यपाद्यादीक पूजा सांग केली। वार्ताही पुसीली मुनीरायें॥१९॥
तेव्हां शिखिध्वज चूडाला तें राणी। जोडोनीयां पाणी प्रार्थितात२०
अहो गुरुराया अनाथाच्या नाथा। बोधावें परमार्था पावूं जेणें २१
धन्य हा सुदिन सफळ हा जन्म। धन्य सर्व कर्म फळा आलें।२२।
जन उद्धाराया भूमीं या संचार। धन्य भाग्य थोर दर्शन झालें२३
आतां स्वामीराया कृपा दीनावरी। करूनी पद्मकरी निववावें॥२४॥
कांहीं एक काळ करावा विश्राम। आपुलेंचि धाम पवित्र करा २५
ऐसें लीनपणें सन्मानीलें थोर। तेणें ऋषीवर संतोषला ॥ २६ ॥
आपुलेठाईं ह्मणे धन्य हे अधिकारी। पूर्वींची सामुग्री उभयांची२७

नित्यानित्य यांसीं असेंची विवेक । इह अमुष्मिक विरक्तिही॥२८॥
शमदमआदि साधन संपत्ति । जाणावें इच्छिती परब्रह्म ॥ २९ ॥
इतुकेंचीं काम असें आह्माप्रती । बोधावें निश्चिती अधिकारीया ३०
परि चूडालेचा अधिकार थोर । दृढतीव्रतर प्रज्ञा जीची ॥ ३१ ॥
ईच्यासम नाहीं प्रज्ञा राजियाची । तरी उपदेशाची समतां कैशी ३२
तथापी उपदेश करूं उभयांसी । पात्रता हे जैशी स्थिरे बोध॥ ३३॥
मेघ काय ह्मणे सखोल उटंक । वर्षावेंहें एक जाणतसें ॥ ३४ ॥
तैसें उभयांसी बोधूं ब्रह्मज्ञान । निश्चय करून बोले ऋषी ॥३५॥
धन्य तुह्मी! दोघें मोक्ष इच्छितसां । तरी आह्मां सहसा राहणें लागे ३६
तेव्हां उभयतां मुनीराजमुखें । श्रवण करिती सुखें वेदांताचें ॥ ३७॥
ज्ञानकांडरूप जीं का उपनिषदें । तीच अर्थ स्वादें चाखविती॥ ३८॥
प्रत्यगात्मा ब्रह्म महावाक्यें ऐसीं। बोधी दिननिशी सप्रतीत ॥ ३९॥
तेणें चूडालेसी पूर्णज्ञान झालें । भेदा खंडियेलें निःसंशय ॥४०॥
दृढ अपरोक्ष पावली प्रतीति । जे का सहज स्थिती पूर्णरामा॥४१॥
जैसी तैसी सर्व सृष्टी हे असतां । परी नसे वार्ता नामरूपा ॥४२॥
तिहीं अवस्थेसी सुख समाधीचें । उत्थानची कैंचें असे तेथें ॥४३॥
प्रवृत्ती निवृत्ती समानची सरी। सविकल्पमाझारी निर्विकल्प ॥४४॥
कैचें सविकल्प कैचें निर्विकल्प । त्रिपुटीचा अल्प भेद नाहीं॥४५॥
ऐसी स्थिती रामा चूडाला पावली। पाहतां आनंदली गुरुमूर्ती॥ ४६॥
परी शिखिध्वजा नाहीं समाधान । जयासी मननशक्ति थोडी॥४७॥
मननावांचून श्रवण तें व्यर्थ । यास्तव परमार्थ वर्म नेणें ॥ ४८ ॥
असो मुनीराय उभयांसी पुसोनी। संचारा लागुनी जाते झाले॥४९॥
इकडे चूडाला स्वात्मसुखें तृप्त । सदां विचरत लोकां ऐसी ॥५०॥
द्वैताद्वैत भान किमपी असेना । समूळ कल्पना बुद्धेची ॥ ५१ ॥
परी खंति वाटे रायाची अंतरीं । पूर्ण निर्विकारी जागा नोहे॥५२॥
तोंचि अंगें असतां कैसें हें अज्ञान । जाणोनीयां रान सेवीतसे॥५३॥

असो चूडालेसी पूर्ण समाधान । झालें तेणें चिन्ह पालटलें ॥५४॥
मुखीं नाहीं ग्लानी तेजःपुंज देह । सर्व अवयव टवटवीत ॥५५॥
अंग कांतीमुळें अळंकारा वोप । शोभे जैसा उडूप नक्षत्रेंसी॥५६॥
एकदां तो राजा रात्रीचे माझारी । चुडालेशि करीं धरून बोलें ।५७।
ह्मणे तुह्मी आह्मी वयानें समान । पूर्ववय जाण गेलें आपुलें ।५८।
उत्तर अवस्था पातली आपणा । कांहीं तरुणपणा उरला नाहीं ।५९।
ऐसें असतांही तुझी देहकांति । पालटली चित्तीं माझे वाटे ॥६०॥
पूर्ववयामाजी न देखों जे कांती । आतां दिसे दीप्ती वृद्धपणीं ।६१।
चंद्रसूर्यासम नखीं प्रभा पडे । सौदामिनी दडें दंततेजें ॥ ६२ ॥
मुखचंद्र कैसा नेणो टवटविला । त्यातेजें रत्नाला शोभा नाहीं ।६३।
कैसें तुझें वृद्धपण पालटलें । नेणों कैसें आलें तारुण्य हें ॥६४ ॥
मेनिका कीं रंभा अप्सरा ऊर्वसी । वाटताती दासी तुझ्यापुढें ।६५।
कांहीं तुजा चित्तीं नसे चिंता आधी । शरीरासी व्याधी नाढळती ६६
कोणत्या सुखानें अससी तूं सुखी । सांगें सत्यमुखीं मजलागीं ६७
कोणता विषय तुजप्राप्त झाला । अप्राप्य लाधला नूतन आजी ६८
मागें इतुकें दिनीं विषया विटसी । भोगीतां उदासी होती तुज ६९
तया विरक्तीशी शून्य पडिलें दिसे । रुचती विषय कैसे आतां तुज ७०
मज वाटे मनीं राज्यादिसंपता । विषयसुखें चित्ता हर्ष वाटे ।७१।
ऐसें राजियाचें खोंचून बोलणें । चूडाला ते ह्मणे हांसोनीयां ।७२।
अगा महाराजा शरीरसंपत्ति । वोकापरी चित्तीं माझी असे ।७३।
विषयासी कैचें रूप सत्यावीण।अस्ति भातिवीण भिन्न असती ।७४।
नामरूप तरी मुळीं नाहीं झालें । भिन्नपण आलें विषया कैसें ।७५।
रज्जूचिया ठाईं सर्पाची असावा । तरीच दवडावा किंवा बधू ।७६।
नाहीं तया राया निवारावें कैसें । घेतांही येतसे होतां केवीं ।७७।
शिंपीचें रजत टाकितांची नये । किंवा घेतां होय दरिद्रहरण ।७८।
तैसें सर्व विषय त्यागावे ते कैसे । सेवितां होतसे तृप्ती केवीं ।७९।

पोरीच्या खेळांत जैशी एकादशी । सुटेल द्वादशी तैसी राया ।८०।
मार्गीं भ्रमतां भेटे गंधर्वनगरी । तेथें कोणेपरी विश्रामेल ॥८१॥
वोडंबरि लेणें बहु आतुडतां । लाभ हा केउता असे राया ॥८२॥
तया अळंकारा तस्करें लुटिलें । तेथें काय गेलें हानी नसे ॥८३॥
तेवीं विषयभोग प्राप्त जरी होता । मज लाभवार्ता नसे बुद्धी ।८४।
अथवा सर्वही येकदां नासती । तरी हानि चित्तिं मज नाहीं ।८५।
लाभची न दिसे तेव्हां हर्ष कैंचा । हानी नव्हे साचा खेद नाहीं ८६
हर्षशोकाविण जे जे प्राप्त भोग । भोगीतां असंग वेगळी मी ।८७।
तुवां पुसीयेलें विषयसुख तुज । परि राया समज वचन माझें ।८८।
विषयाचें सुख मज नाहीं स्पर्शलें । तेणें सुखीं झालें कैसी राया ८९
सद्गुरूरायानें कृपा मज केली । केवळ सुखें झाली तृप्ति मज ।९०।
अमृताची तृप्ति बाणली जयासी । तो कदा कांजीसी अपेक्षीना ।९१।
तैसी राया खरी मज तृप्ति झाली । वार्ताही बुडाली विषयाची ।९२।
तस्मात बोळखी माजी अलिप्तता । जळाच्या अतौता कमळपत्र ।९३।
आणिक राया तुझें मन संशयांत । तारुण्य परतत मागें केवीं ।९४।
तरी राया मज हर्ष खेद नाहीं । तेणें दिसे पाहीं शरीरशोभा ।९५।
मनोव्याधि जातां अंतर सुखी झालें । बाह्य दुमदुमिलें तेंचि तेज ९६
प्रारब्धाच्या योगें व्याधीही नासल्या । अथवा उद्भवल्या मज काय ९७
देह हा सुंदर अथवा ओखटा । मज तया वाटा जाणें नाहीं ।९८।
एवं विषय देह जें जें नामरूप । माझ्या ठाईं अल्प नाहीं राया ।९९।
इतकें बोलून मौनातें धरीत । रामा सावचित्त वसिष्ठ ह्मणे २००
पूर्णस्थिती ऐसी या नाव बोलिजे । वेद राय गर्जे दीर्घ नादें ॥१॥
चुडालेचें वाक्य सर्वही ऐकिलें । अहाच वाटलें शिखिध्वजा ॥२॥
हेळसून राजा राणीसी बोलत । ह्मणे स्त्रीची जात कपटरूपी ॥३॥
मनामाजीं एक वाणीमाजीं आन । करणें त्याहून भिन्न असे ॥४॥
स्त्रियेचे स्वभाव ऐसे हे असती । तरी तुझी कृति भिन्न कैंची ॥५॥

विषयलालुचि अंतरीं असतां । बोलशी वरुता विषय मिथ्या ॥६॥
कैंचें ब्रह्मसुख तुज प्राप्त झालें । विषय स्पर्शले न तुज कैसे ॥ ७ ॥
विषय भोगीतां अलिप्तता कैंची । कोणी तापेलची अग्नीसंगें ॥ ८ ॥
ब्रह्मप्राप्ति कांहीं सुगम असेना । ऐसें माझे मना पूर्ण ठावें ॥ ९ ॥
युगायुगीं हटयोगी कष्टताती । तरी नव्हे प्राप्ती तया सुखा ॥१०॥
तुज कैसें नेणों सुख प्राप्त झालें । व्यवहार चालीले पूर्व रीती ॥ ११॥
चांगुली वाईट जिव्हे रुचि कळे । पाहाताती डोळे सर्वांलागीं ॥ १२॥
संगीत सुशब्द कान ऐकताती । मृदु त्वचेप्रती गोड लागे ॥ १३ ॥
सुगंध आवडे दुर्गंध नावडे । संपत्ती आवडे मनींहुनी ॥ १४ ॥
सर्व देह तरी यथायुक्त वागे । तरी सुख सांगें घेसी कैसें ॥१५॥
पूर्ण स्थिति ह्मणसी आपुले वाचेनें । मज वाटे उणें सर्वस्वेंसी ॥ १६॥
असत्याची राशी स्त्रियाची हे जाती । हे आली प्रचीति मजलागीं १७
ऐसें हेळसून शिखिध्वज गेला । चित्तीं विस्मय झाला चुडालेचे १८
मज हेळसीलें अथवा गांजिलें । दुःखतें वाटले नाहीं मज ॥ १९ ॥
परि राजयासी बोध नाहीं झाला । खरखरा मनाला इतुका वाटे ।२०।
आह्मीं उभयतांनीं श्रवण गुरुमुखें । केलें असे निकें वेदांताचें ॥ २१॥
परि ब्रह्मरूप पहिलेंची आहे । असतांही नव्हे ज्ञान राया ॥ २२ ॥
सर्व जेव्हां जावें तेव्हां ब्रह्म व्हावें । एऱ्हवीं तें नव्हे भाव ऐसा॥ २३॥
अहा कैशी कर्मगती हे गहन । रायें कैसें रान घेतियलें ॥ २४ ॥
माझी तृप्ति झाली स्वामीसी अतृप्ति । हेची वाटे खंती माझे मनीं॥ २५॥
यासी गुरु कोण मिळेल खपूस । रायाचे बुद्धीस पालटील ॥ २६॥
देहाचा भरंवसा काय असे खरा । ह्मणोनीउधारा विश्वासावें ॥ २७॥
एक वेळा गेला पुन्हा प्राप्त कैचा । ह्मणोनीयां साचा त्वरा कीजे ॥ २८॥
तरी आपणची राया बोध करूं । होय निर्विकारू येची देहीं ॥ २९॥
तरीच नामाची चूडाला जन्मल्यें । नाहीं तरी झाल्यें भूमीभार ॥ ३०॥
ऐसी ते प्रतिज्ञा चुडाला स्वीकारी । पुढें काय करी रामा ऐकें ॥ ३१॥

नाहींची बाणलें अभेदाचें सुख । लावितांही राख काय होतें ॥८४॥
अखंडींत स्थिति न बाणेचि जरी । धुम्रपानें तरी काय होतें॥८५॥
त्रिकाळांचे स्नानें मोक्ष जरी जोडे । जळीं काय थोडे जळचर॥८६॥
वायु भक्षितांचि मोक्ष होत असे।सर्पा काय असे अहार दुजा॥८७॥
पर्णाशन करितां मोक्ष प्राप्ती व्हावी । तरी मेषा वा यावी मुक्तदशा॥८८॥
मोक्ष प्राप्ती लागीं असावीनिराशा । चातंका दुराशा कोठें आहे॥८९॥
मोक्षालागी एके ठाईं राहू नये । तरी उंदीर काय एका बिळीं॥९०॥
भस्माचें लेपन होय मोक्षकर । न लोळती खर उकरडीया ॥९१॥
मोक्षालागीं जरी शुष्कध्यान धरी । बक नदीतिरीं काय थोडे॥९२॥
असो जंव नाहीं ज्ञान दृढ झालें। नाना कष्ट केले तरी काय ॥९३॥
तरी आतां राया अंतर विरागी । होऊनियां भोगी प्राप्त भोग॥९४॥
ब्रह्म अंगें होणें विचार हा करी । येर बाह्यात्कारीं त्याग नको॥९५॥
ऐकावें श्रीरामा वचन चूडालेचें । ऐकताही साचे न मने राया॥९६॥
परि तयेलागीं नेदीच उत्तर । तेणें ते सुंदर सुखमानी ॥ ९७ ॥
ह्मणे राजा जेव्हां नाहीं बोलियेला । असेल बाणला उपदेश॥९८॥
मग उभयतां निद्रा करिताती । गाढ आली सुषुप्ती चूडालेसी॥९९॥
असो ऐसा बोध वेदें मान्य केला । वृत्तांत पुढील ऐकें राया॥ ३००॥
शिखिध्वज राजा तया रजनी आंत।चुडाला निद्रीस्त सांडूनीया ॥ १॥
तसाच निघाला सेवकां न कळतां।ग्रामाच्या पाहातां बाह्य देशीं॥ २॥
वस्त्र पात्र आणि सर्व अलंकार । सांडिले सत्वर तया ठायीं ॥ ३॥
आंगीं रक्षा लावी कौपिन कांसोटा।मस्तकींच्या जटा बांधियेल्या॥४॥
जेणें कदा उष्ण नाहीं देखियेलें। तोचि चरणीं चाले अरण्यांत॥५॥
जयाचिया माथा अखंडित छत्र । तो राजा चालत अनवाणी ॥ ६॥
जयाचिया आंगीं परिमळ उटी।तो घाली लंगोटी रक्षा लावी॥ ७॥
ऐकें रामा ऐसा राजा शिखिध्वज । चालिला सहज उत्तर पंथें ॥८॥
अज नामखंड सोडियलें मागें । हिमालय वेगें त्यागियेला ॥ ९ ॥

मेरुचीया विवरीं एक महादरी । तेथूनी शेजारीं ईलावती ॥ १० ॥
तया दरीमाजीं आश्रम सुंदर । जेथें ऋषीश्वर समुदाय ॥ ११ ॥
तेथें एक स्थान पाहुनी एकांत । राजाचि स्वहस्तें गुंफा बांधी॥१२॥
तया गुंफेमाजीं निवांत राहिला । आहार घेताझाला फळमूळांचा १३
त्रिकाळींही संध्या जप आणि ध्यान । करीत शयन तृणासनीं १४
असो ऐसा राजा गमा वनीं आला । चुडालेच्या बोला ऊपेक्षिलें१५
नाहीं ज्ञानसिद्धी नाहीं समाधान । वाडगेंची रान सेवीतसे ॥ १६ ॥
असो इकडे रामा चुडाला मंचकीं । जागी एकाएकीं होती झाली१७
तंव शेजेवरी राजा नाढळत । चूडाला चित्तांत दचकली ॥ १८ ॥
दासीसी पाचारी ह्मणे शोध करा । राजराजेश्वरा पाहा वेगीं ।१९।
सर्वही मंदिरें शोधूनी पाहाती । तेथें तो भूपती नाढळेची ॥ २० ॥
सर्व नगरींमाजीं सेवक धांवती । प्रधाना सांगती राजा गेला ।२१।
प्रधान धांवुनी राणीपाशीं आला । साष्टांग घातिला नमस्कार २२
ह्मणे माते सांगें स्वामी काय झाले । राज्यभार चाले केवीं आतां२३
तेव्हां प्रधानासी बोलतसे राज्ञी । राजेश्वर वनीं गेले वाटे ॥ २४ ॥
रात्रींमाजीं मज उदास वचन । बोलिले त्यागून राज्य जाऊं ।२५।
त्याहि केलें बहु युक्तीशांतवन । नाहीं तया मान दिला रायें ।२६।
मज निद्रा आली रायानें पाहुनी । गेलेती त्यागुनी एकटेची ॥२७॥
अगा हे प्रधाना चतुराच्या राया । चालवी उपायें राज्यभार २८
गुप्तरूपें हेर भूमीवरी धाडीं । रायाची ते काढीं शुद्धी कोठें ॥२९॥
प्रजेलागीं नेदी कळूं वर्तमान । असती सुजाण प्राणसखया ॥ ३०॥
तथास्तु ह्मणुनी चरण वंदीले । दूतही धाडिले शोधालागीं ॥ ३१॥
जेथवरी असे मनुष्य संचार । तेथवरी हेर धुंडिताती ॥ ३२ ॥
नानाजनस्थानें अथवा निरंजनें । शोधिलीं संपूर्ण दूतीं तेव्हां ।३३।
परि राजयाची वार्ता न लागत । प्रधानासी येत सांगावया ॥३४॥
प्रधानें राणीसी विनविलें थोर । ह्मणे राज्यधर नाढळती ॥ ३५ ॥

ऐकुनीयां राज्ञी प्रधानासी ह्मणे। राज्य चालविणें यथारीती ॥ ३६॥
राजियाची चिंता सर्वथा न करा। परि राज्यभारा चालवावें ॥ ३७॥
मीच विचारानें रायासी शोधीन। मागुती आणीन राज्यावरी ॥ ३८॥
माझे भेटीलागीं कोणीही न येणें। राज्य चालविणें पुर्वरीती ॥ ३९॥
मजवाटे तेव्हां तुज पाचारीन। तये समयीं घेणें भेटी माझी ॥ ४०॥
बहुबरें ह्मणुनी प्रधान जातसे। राज्य पूर्वी ऐसें चालवीत ॥ ४१ ॥
इकडे चुडाला मनासी विचार। करीत सत्वर आतां कैसें ॥ ४२॥
सन्निध असतां हरप्रयत्नानें। हळूहळू करणें बोध राया ॥ ४३ ॥
आतां भेटी नाहीं तेव्हां कैसें करूं। असते जरी नरु बरें होतें ॥ ४४॥
स्त्रीचा देह कांहीं स्वतंत्र असेना। एकटेंही वना जातां नये ॥ ४५॥
यया प्रयत्नासी सामर्थ्य सिद्धीचें। असावें हो साचें मजलागीं ॥ ४६॥
सामर्थ्यावांचुनी कार्यसिद्धि नव्हे।तरी योग पाहे करणें लागे ॥ ४७॥
योगावांचूनीया सामर्थ्य असेना। योगाचे लक्षणा अभ्यासावें ४८
जरी उपेक्षूनी राहिल्यें मी आतां। दृढापरोक्षता रायाकेवीं ॥ ४९॥
लोक उपकारासाठीं निंदापरी। केलें थोरथोरी भलतेसें ॥ ५० ॥
तैसें हे तो नव्हे अती निंद्य जनीं। परि पूर्णज्ञानी हांसतील ॥ ५१॥
पूर्ण समाधान ज्ञानेंची पावन। असतां योगाभ्यसन कासयासी ५२
असो रायाकरितां अवश्य करणें। परी तया तेणें समाधान ॥ ५३॥
पिकलिया शेतीं नांगर घालिजे। तेंवि आतां कीजे योगाभ्यास ५४
सायुज्यपदवी पुर्ण असोनीयां। जाणें मागावया माधुकरी ॥ ५५॥
कुबेरासी जाणें मागावया ऋण। योगाभ्यास करणें तेवीं मज ५६
भोजन झालीया करणें जेवी पाक। योगाचें कौतुक तैसें मज ५७
कळसावरी काम जेवी चालवीजे। तैसें मी करीजे योगाभ्यास ५८
उंसाचीया शेंडा फळें जैसीं येती। तेवी सिद्धीप्रती वांछीजेम्या ५९
सूर्योदय होतां दिवट्या लावीजे। तैसें म्यां करीजे योगाभ्यास ६०
रज्जु वोळखीतां सर्पा मारूं जाणे। योगाभ्यास करणें तैसें झालें ६१

शिंपीचें रजत कळतां वंचू जाणें । योग अभ्यासणें तेणें रीती ६२
मृगजळावरी बांधिजेल सेतु । तेवीं अघटित योग करणें ॥ ६३ ॥
असो आतां योग अभ्यासावा पूर्ण । योगाभ्यासेंवीण सिद्धी कैंच्या ६४
सिद्धीवांचूनीया सामर्थ्यचि नसे । तरी कैसा होय बोधराया॥६५॥
यास्तव कीजे उद्योगाचे सायासा । निश्चयची ऐसा केला बुद्धी ६६
रायास्तव ध्यान योग चूडालेचा । संक्षेपचि साचा बोलूं ऐके ६७
कोणी एक हटयोगी पूर्ण होता । तयासी तत्वतां सद्‌ना आणी ६८
आसन देऊनी पुजा अर्पियेली । प्रार्थना हे केली कर जोडोनी ६९
अहो योगिराया अंतरींचा हेतु । पुरवावा हे तूं इतुकेंची ॥ ७० ॥
योग अभ्यासावा मज वाटे जीवा । तरी स्वामी दावा मार्ग मज ७१
वचन चूडालेचें योगियें ऐकुनी । संतोषला मनीं अतीशय ॥७२॥
ह्मणे धन्य राज्ञी सुकुमारे सुंदरी । इच्छिसी अंतरीं योगाभ्यास ७३
तरी अभ्यासावें सांगेन मी जैसें । अभ्यासासी नसे दुरी काई ७४
अल्पचि आहार अल्पचि विहार । कारितां सत्वर योग होतो ।७५।
एकांताचे ठायीं आसन रचिलें । कुश अंथरीलें पूर्व अग्रें ॥ ७६ ॥
तयावरी कृष्ण अजिन समान । त्यावरी आसन कंबळेचें ॥७७॥
योगिरायें तेव्हां तया आसनावरी । चुडाला सुंदरी बैसविली ।७८।
प्रथम प्राणायाम क्रिया हे सांगत । स्वाधीन हा होत वायु जेणें ७९
पद्मासन ऊरु जंघा एके ठायीं । जानूमध्यें खोवी पाद् चवडे ।८०।
कटीपासूनीयां मस्तकापर्यंत । समधरवत देह आपुला ॥ ८१ ॥
एक मात्रात्मक आरंभीं सांगती । सबीज ते युक्ती प्राणायाम ।८२।
जितुका वोढावा पुरक अंतरीं । चतुर्गुणें करी कुंभक त्याचें ॥८३॥
जितुका उदरीं प्राण स्थिरावत । रेचन सोडित त्याच्या अर्ध्यें ८४
ईडेनें पुरक पिंगळेनें रेची । मध्यें कुंभकाची स्थिरता होय ॥८५॥
पिंगळेनें जरी पुरक वोढीला । तरी रेचनेला ईडाद्वार ॥ ८६ ॥
येणें रीती दाहा प्राणायाम केले । त्रिकाळ साधीलें एक दीनीं ।८७।

एके एके दीनीं एक एक मात्रा । चढवी सुंदरा अनायासें ॥८८॥
दहावे दिनीं दश मात्रा प्राणायाम । जाहाला सुगम वायुजय॥८९॥
मासामाजीं जय वायूचा होतसे । परि साधीलासे दहावे दिनीं॥९०॥
नाडीचे पदर सर्वही सूटले । कष्टही निमाले सुख वाटे ॥९१॥
योगिरायें तेव्हां मार्ग कुंडलीचा । दावियेला साचा हळू हळू॥९२॥
गुदद्वारीं वाम टाच पिडुनीयां । दाटिली योनियां सव्य टांच ।९३।
दृढतर आसन वज्रबंध दिला । नवही द्वारांला बंद केलें ॥९४॥
यामाचिया योगें वायु चतुर्दळीं । आलासे सकळी सर्वांगींचा ।९५।
अपानाचे मुख तेणें ऊर्ध्व झालें । प्राणापान केलें एक रूप ॥९६॥
सुषुम्न नाडींत वायु प्रवेशत । ते क्षणीं चालत ऊर्ध्वगती ॥९७॥
स्वाधिष्ठाननाभी हृदय मंदिरीं । चढत अंतरीं कंठीं आला ॥९८॥
भृकुटीच्यामध्यें वायु सर्व येतां । आली निचेष्टता सर्व देहा ॥९९॥
पुढें आतां रामा योग पूर्ण होय। ऐकावी ते सोय वेद उक्त॥४००॥
तृप्ति पावूनीयां शीण जो करणें । परोपकारा होणें ज्ञानि यासी॥१॥
जयाचे गळाले तिन्ही अभीमान । सिद्धीचें बंधन तया नाहीं॥२॥
जेसें असे करणें तैसेंचि न करणें । प्राप्ताप्राप्त कोणें जाणिजेल॥३॥
असो ऐसें रामा करणें चुडालेचें । तेंचि ऐकें साचें परमादरें ॥४॥
भृकुटी पावेतों सर्व वायु आला । काष्ठप्राय झाला देह जीचा ॥५॥
ऐसें पाहुनीयां तया योगीरायें । ह्मणे गेलें कार्य सिद्धीलागीं ॥६॥
सहस्र दळीं जातां आतां नाहीं वेळ । होईल सुकाळ परमानंदें॥७॥
तंव चुडालेचा वायु उतरला । साष्टांग घातिला योगिराया ॥८॥
विनविती जाती स्वामी एक करा।सहस्रदळीं वारा जावा वेगीं ॥९॥
मग योगीराज सांगताती गुज । आतां जाणें सहज अल्प काळें।१०।
द्विदळीं जाउनी ब्रह्मरंध्र द्वारीं । वायू हा थावरी चीरकाळ ॥११॥
अणु ऐसे छिद्र असे अंतराळीं।ऊर्ध्व मुखीं न्यहाळी मनोधर्मे॥१२॥
तयाद्वारीं जरी वायु स्थिर होतां । प्रवेशे अतौता हळु हळू ॥१३॥

दाटतां समीर छिद्र होय थोर । प्रवेशे अंतर वायु तेव्हां ॥ १४ ॥
वायु प्रवेशतां सहस्र दळामाजीं । पैठी होसी सहजीं ब्रह्मानंदीं १५
परि वायु स्थिर होतां अंतराळीं । स्मरण ते काळीं असतां बरें १६
विस्मरण होतां सुख तें कळेना । यास्तव स्मरणा पूर्ण राखीं ॥१७॥
ऐसें चुडालेनें ऐकोनी वचन । तथास्तु ह्मणून योगाभ्यासी ॥१८॥
आधारापासूनी द्विदळासी आली । पुढें दृष्टी घाली ब्रह्मरंध्रीं ॥ १९॥
तया ब्रह्मरंध्रीं वायु झाला स्थिर । बोलिला प्रकार तेणें रीति ॥२०॥
सहस्रदळीं गेला ब्रह्मरंध्रांतून । असेंचि स्मरण तयेकाळीं ॥ २१ ॥
परि प्रवृत्तीचें सर्व विस्मरण । होतसे स्फूरण स्फूर्ती मात्र ॥ २२ ॥
आपण हे कोण स्त्री कीं पुरुष असे । आठवाचि नसे कोणताही २३
जागृती कीं स्वप्न सुषुप्ति आठवे । निर्विकल्प घ्यावे सुख एक॥२४॥
शिखिध्वजा करितां प्रयत्न मांडिला । हेही स्फूर्ती तिला नसे कांहीं २५
माघारी फिरावे जागृतीसी यावें । कांहींच नाठवे तयेलागीं ॥२६॥
ऐसें योगीरायें जाणुनी अंतरीं । ह्मणे व्यापारीं नये आतां ॥२७॥
तेव्हां उत्थानाच्या क्रिया ज्या असती । तेणें हरे वृत्ती उतरे वायू २८
वायु उतरीतां झाली सावधान । उघडीतां नयन पाहूं लागे॥२९॥
सर्व इंद्रियांसी निचेष्टता होती । सांवरी मागुती हळू हळू ॥ ३० ॥
योगियाचे पाय वंदोनी बोलत। झाला जो वृत्तांत निवेदिला ॥३१॥
जय जय स्वामी श्री गुरूसमर्था । माझे मनोरथा पूर्ण केले ॥३२॥
तेव्हां चुडालेसी योगिराज बोले।अभ्यासन फळलें तुझें आतां ॥३३॥
अष्टमहा सिद्धि तुज वोळखती । पुरवी निश्चितीं मनोरथ ॥ ३४ ॥
आतां आह्मी जातों स्वथाना आपुले।ऐसें बोलून गेले योगीराज ३५
इकडे चुडाला असतां मंदिरीं । सिद्धि निरंतरी तिष्ठताती ॥ ३६ ॥
जैसी जैसी इच्छा अंगिकारी मना । तैसें तैसें जाणा होत असे ।३७।
सिद्धीचें सामर्थ्य ऐसें पाहुनीयां । करणें उपाया आतां ह्मणे ॥३८॥
प्रधानासी तेव्हां सदनीं पाचारिलें । तया आज्ञापिलें राज्य रक्षीं ३९

मी आतां बैसेन यया खोली आंत। कपाट निश्चित उघडूं नका । ४०।
मज वाटे तेव्हां बाहेरी येऊनी । सर्वांसी भेटूनी बोलीजेन ॥४१॥
इतुकें सांगुनी कपाट दिधलें । प्रधानादि गेले स्वस्वकार्या ॥४२॥
आसन घातिलें वायु चढविला। मनीं कल्पियेला भाव दुजा ॥४३॥
हा देह सोडूनी लिंगदेह गुप्त । उत्पन्न करीत तये वेळे ॥ ४४ ॥
गुप्तरूपें आधीं भूमिसी फिरावें । रायासीं शोधावें कोठें आहे ४५॥
ऐसिया निश्चयें चालिली धुंडित । अजनाभ त्वरित शोधियेलें ।४६।
नदीचीं तटाकें पर्वताच्या दऱ्या।शोधियेल्या साऱ्या रायासाठीं ।४७।
जनसमुदाय अथवा निर्जन । बहु ऋषीस्थान शोधियेलें ॥ ४८ ॥
परि नाढळेची राजा शिखिध्वज।पुढें जात सहज हिमालया ॥४९॥
जितुका विस्तार तितुका हिंडतां । रायाची ते वार्ता नसे कोठें ५०
जंबुद्वीपाचीं जीं नवखंडें जितुकीं। शोधियेलीं निकीं उपखंडेंसी ५१
परि नाहीं राजा देखियेला दृष्टी।यास्तव ते कष्टी होत असे ॥५२॥
मनुष्याची गती नाहीं रामा जेथें।शोधिलें सामर्थ्यें आपुलीया ।५३।
न देखोनि राजा कैसी झाली परी।नेणेचि अंतरीं कोठें असे ।५४।
अथवा द्वीपांतरी स्वामी गेले असती।तरी शोधाप्रती जाऊं तेथें ५५
क्षारसिंधु मग वोलांडुनी गेली । तेथें शोधियेली सर्व भूमी ॥५६॥
तेथेंही नाढळे झाली अतिक्षीण।जात उल्लंघूनी तिसऱ्या द्वीपीं ॥५७।
तैसेचि सातही द्वीप ते फिरतां।रायाची ते वार्ता नसे कोठें ॥५८॥
मग आपुले ठायीं कल्पीत सुंदरा । काय राजेश्वरा झालें नकळे ५९
किंवा विसर्जिला देह पंचात्मक । यास्तव साशंक होत असे ॥६०॥
जरी प्राणेश्वर भूमि त्यागुनि गेले । सायास जे केले व्यर्थ जाती ६१
आतां यमलोकीं लिंगदेह शोधूं।ऐसा बुद्धिबोध करुनी निघे ॥६२॥
पहातां तेथें राजा दृष्टी नाढळेची।तेथुनि पाताळाची शुद्धि घेत ६३
सप्तही पाताळें शोधुनी पहातां। राजाची तत्वतां शुद्धि नाहीं ॥६४॥
तेथुनीयां स्वर्गभुवना येऊन । राजया लागून शोधितसे ॥ ६५ ॥

पितृलोक आदि पाहिले सकळ । पुढें सत्यलोक धुंडीतसे ॥ ६६ ॥
जनलोक आणि महर्लोक धुंडी । तपोलोक निवडी शोधुनीयां ।६७।
तेथोनियां मग गोलोक शोधिला । पुढें वैकुंठाला शोधीतसे ॥ ६८॥
नदेखे राजा पुढें कैलासासी । येऊनी त्वरेसीं शोधीतसे ॥ ६९॥
राजियाची शुद्धी कोठेंची नलागे । विचार तो वेगें करिती झाली ७०
सर्वही ब्रह्मांड शोधुनी पाहिलें । तरी काय झालें राजयासी । ७१ ।
लिंग भंग झालें नसतां जे जीव । तेही शोधियेलेसे राजा नाहीं ७२
अथवा जन्मला कवणे ठायीं असे । तेंही शोधिलेसे राजा नाहीं ७३
स्वर्गादिकलोक प्राप्ती झाली असतां।स्वर्गादि शोधितां शुद्धी होती ७४
सलोकता मुक्ति मुक्ति समीपता । तेथेंही पाहतां राजा नाहीं ।७५।
स्वरूपता मुक्ति जे जे पावलेती । पाहतां ते भूपती नाढळेची ।७६।
तरी काय पावे विदेह कैवल्यातें । यास्तव दृष्टीतें न पडेची ।७७।
तरी कोण गुरु रायासी मिळाला । तेणें बोध केला दृढतर ॥७८॥
ऐसे जरी झालें असेल स्वभावें । तरी गुरुदेवें बरें केलें ॥ ७९ ॥
अपरोक्षावीण मोक्ष दशा प्राप्ती । नव्हेची कल्पांतीं सत्य सत्य ।८०।
ऐसें ज्ञान कांहीं नव्हे गुरुवीण । तोची गुरु कोण झाला राया ८१
कोण तो भेटो महाराज मजप्रती । वार्ता सांगो प्रीती राजयाची ८२
अगे वो चूडाले पति झाला मुक्त । कैवारी सांगत न का मज ८३
तरी आतां किजे निश्चय तो कैसा । माझिया मानसा सुख कैचें ८४
ऐसे रीती रामा चुडाला सुंदरी । नानातर्क करी पतीसाठीं ॥८५॥
पुढें स्फूर्ति एक झाली तयेलागीं । बैसोनिया वेगीं एकेठायीं ॥८६॥
ज्ञानदृष्टी सर्व ब्रह्मांड पाहावें । व्यर्थ कां हिंडावें शुद्धी साठीं ।८७।
मग बैसोनिया सर्व अवलोकीत । तेधवां दिसत एकदांची ॥८८॥
तंव एक दरी देखिली सुंदर । तेथें ऋषेश्वरसमुदाय ॥ ८९ ॥
तयासमुदायीं गुंफा दिसतसे । तेथें बैसलासे शिखीध्वज ॥ ९० ॥
पहातांचि राजा आनंदली थोर । उडवूनी वस्त्र नाचू लागे ॥ ९१ ।

आहे आहे राजा पूर्व देहयुक्त । कार्यसिद्धि त्वरित माझी झाली ९२
ऐसें मज पूर्वी नाहीं आठवलें । वाउगें हिंडले ब्रह्मांड हें ॥ ९३ ॥
असो आतां झाले कष्टाचे परिहार । आहे राजेश्वर भूमीवरी ।९४।
तेव्हां मग आली तयादरी आंत । गुप्तरूपें येत गुंफेजवळी ॥९५॥
अंतराळी गुप्त उभी राहूनीयां । अवलोकीत चर्या राजयाची ॥९६॥
मस्तकीं त्या जटा कौपिन रक्षा आंगीं । बैसला तो वेगीं देखिला ९७
पात्रें तुंबिणीचीं कृष्णा जिनादिकें।पाहिलें सकळीकें वैभवासी ॥९८॥
असो ऐसी रामा पतीसी पाहुनी।चुडाला तें मनीं आनंदली ॥९९॥
जयें दिनीं होय विरक्ती सहज । तेव्हां वेदराज बोले जावें ॥५००॥
हेंचि वचन रायें प्रमाण करूनी । आला असे वनीं राजत्यागें ॥१॥
ऐसे शिखिध्वज चुडाला देखत । विचार करीत आपले चित्तीं॥२॥
ह्मणे बरें झालें राजा वनीं आला । अपरोक्ष ज्ञानाला पात्र होय॥३॥
राज्यावरी असतां उपाधीच्या योगें । बोध स्थिरे वेगें कोणेपरी॥४॥
आणि माझा देह स्त्रीरूपें पहात । केवीं उपतिष्ठत अविश्वासें ॥५॥
तरी आतां रूप आपुलें पालटावें । रायासी बोधावें पुरुषरूप ॥६॥
चुडालाहे माझी पट्टराणी असे । हेही राया ऐसें कळोनेदी ॥७॥
पुरुषरूप धरुनी वनीं बोध करूं । जेणें परपारू पावे राजा ॥ ८॥
ज्ञानें समाधान पूर्णदृढ होतां । रायासी तत्वतां सदनीं नेऊं ॥९॥
परि आधीं याचा अभिनिवेश थोर । कीं तपें शरीर कष्टवावें।१०।
तरी कांहीं काळ कष्ट करूं द्यावे । तेणेंही उद्भवे अधिकार ॥११॥
उष्णकाळीं होय भूमी तप्त जैसी । तेणें वृष्टीसरसी अंकुरता ॥१२॥
तापोनिया आला पांथस्थ श्रमोनी। सुखावे येवोनि वृक्षातळीं॥१३॥
भोंवंडीवांचुनी दम कैसा जिरे । तेंवि यासि खरें श्रमूं द्यावें ॥१४॥
जपतप कर्म अंतःकरण शुद्धि । होतां ज्ञानबुद्धी वेळ नाहीं ॥१५॥
वैराग्यहि वाढे विवेक प्रबळे । शमादि सोहळे दुणावती ॥१६॥
जाणवें हे इच्छा उद्भवें अंतरीं । तेणें अधिकारी पूर्ण होय ॥१७॥

ऐसा अधिकार राया पूर्ण होतां । बोधीजे तत्त्वतां सप्रतीती ॥१८॥
श्रवण मनन होतां निदिध्यास । तेव्हां अपरोक्षास वेळ नाहीं॥१९॥
तरी आतां राया कांहीं काळ ऐसें । जैसें आहे तैसें असों द्यावें॥२०॥
ऐसाचि निश्चय चुडालेनें केला । तैसाचि ठेविला राजा वनीं॥२१॥
अंतराळमार्गीं तैशीच चालली । निमिषांत आली खोली आंत २२
नंतर कपाट उघडुनी बाहेरी । येउनी पाचारी प्रधानादी ॥२३॥
तयालागीं पुसे झालें वर्तमान । प्रधानें संपूर्ण निवेदिलें ॥ २४ ॥
मागुती ते राणी पुढें कैसें करणें । तें तें सांगे येणेंरीती करा॥२५॥
आपुलीया भेटी प्रजा बोलाविली । सर्व सुखी केली यथान्यायें २६
पूर्व रीति राज्य सर्व चालवीत । वारंवार करित परामर्श ॥ २७ ॥
ऐशीं तीन वर्षें लोटलीं यावरी । तेव्हां ते अंतरीं ह्मणे जावें ॥२८॥
इकडे तो राजा वनामाजीं असतां । पस्तावला चित्ता अनुतापें॥२९॥
तेंचि संक्षेपेंसी बोलिजेल रामा । झाला सर्व कर्मी उदासीन ॥३०॥
अहो मी आपुलें राज्य त्यागुनीयां । राहिलों वनीं या सुखासाठीं३१
अझुनीया नाहीं माझें समाधान । तरी काय शीण व्यर्थचि हा ३२
मागें जे जे राजे राज्यादि त्यागुनी । स्वर्गसुखालागीं वना येती३३
देह असतांचि तपें कष्टवूनी । देहांतीं जाउनी स्वर्गी राहती ॥३४॥
कोणी देखियेलें स्वर्गीं सुख असें । येदेहीं येतसे प्रत्यय केवीं ॥३५॥
अथवा प्राप्त होतां पुण्य सरतांक्षणीं।भूमी जन्म योनी होत असे ३६
इतुकेही कष्ट करून निर्फळ । होईल सुकाळ सुखदुःखाचा ॥ ३७ ॥
एवं हें उधार आणि नाशिवंत । तयासी इच्छीत मूढ जन ॥३८॥
इह लोक भोग सर्व त्यागुनीयां । करिती उपाया सुखासाठीं॥३९॥
तया काय मूर्ख ह्मणिजेत नाहीं । आंधळे सर्वही अविवेक ॥४०॥
आंधळिया मागें आंधळेंचे जाणें । कुपामाजीं पडणें तेणें पडतां४१
एकाचें पाहुनी एक वर्तताती । विवेकी असती थोडे येथें ॥ ४२ ॥
असो मज काय काज परोपदेशीं । बोधावें मनासी आपुलिया॥४३॥

स्वर्गादिकां ठायीं केवळ सुख नाहीं । मत्सराचि पाहीं उठतसे॥४४॥
सत्य लोकादिक ऐसेचि हे सर्व । अविनाश वैभव तेथें कैचें ॥४५॥
सलोकता आदिमुक्ती ज्या बोलिल्या।या हीन कल्पिल्या सत्यत्वेंचि ४६
सर्व दशांमाजीं सुख कैचें असे । उद्भवूनी नासे सर्व कांहीं ॥४७॥
ब्रह्मादिपासूनि तृणांतीं पाहतां । सुखाची ते वार्ता बोलों नये॥४८॥
तरी आतां सुख कवणे ठायीं मिळे।मनाचे ते डोहळे पुरती कैसे॥४९॥
सुखरूप एक ब्रह्मरूप असे । मुनीराज ऐसें बोलत होते ॥ ५० ॥
तये समयीं माझी कर्मी व्याप्त मती।तेणें मजप्रती न बाणेची ५१॥
तयाही उपरी चुडाला दिननिशी । बोलत होती तिशीं अव्हेरीलें५२
आतां केव्हां मज गुरुराज भेटती । ब्रह्मसुख प्राप्ती मज कैची॥५३॥
सद्गुरुवांचुनी ज्ञान कैसें जोडे । केविं तें आतुडे समाधान ॥ ५४॥
माझी मंदमती समर्थ पांहुनी । गेले उपेक्षुनी आतां कैंचे ॥ ५५ ॥
मागुती विचारी आपुले मनांत । भावना जैसी होत देव तैसा॥५६॥
आतां गुरुदेव कृपा मज करो । मजलागीं तारो भवजाळीं ॥५७॥
कांहीं पूर्व पुण्य जन्मांतरिचें असे । भेटती अपैसे गुरुनाथ ॥ ५८॥
गुरुवांचूनिया कर्म धर्म जप । नलगे संताप वाउगाची ॥ ५९ ॥
ऐकावें श्रीरामा शिखिध्वजालागीं । तळमळ आंगीं होत असे॥६०॥
नावडे सत्कर्म नावडे जपतप । नावडेचि अल्प संध्यास्नान ॥६१॥
नावडे आहार नावडे अर्चन । नावडे शयन निद्रा नये ॥ ६२ ॥
अहो अहो गुरू आतां उपेक्षिसी । तरि मज दिनासी कोण तारी६३
चातकासी मेघ जरी न ओळती । तरी त्याची तृप्ती कैसी होय॥६४॥
चंद्र चकोरासी जरी अव्हेरिलें । तरी जिवन चाले कैसें त्याचें॥६५॥
वत्सासी टाकुनी धेनु दूर जाय । तरि तया उपाय दुजा नसे॥६६॥
धेनूचिया ठायीं वत्साचा कळवळा । तेविं पाहे डोळा मज दिना६७
गुरुमाउलिये कूर्मिणीचे परी । अवलोकावें नेत्रीं मज दीना ॥६८॥
बाळकासी माता जेविं उपेक्षिना । तेविं मज दीनालागीं पाहीं॥६९॥

अपराध बाळाचे काय माता पाहे । धांवुनी घेताहे वोसंगासी ॥७०॥
अनंत अपराधी तैसा मी पतीत । पावन विख्यात नाम तुझें॥७१॥
कृपावंत होसी ऐकिलें सखया । तरी गुरुराया कां न येसी ॥७२॥
किंवा माझें कर्म आडवें पडलें । यास्तव ना झालें येणें तुझें॥७३॥
विश्वचक्षु कैसा आंधळा झालासे । मी रंक न दिसे तयालागीं॥७४॥
दिशा ज्याचे कर्ण तोचि बहिरा झाला।माझिये शब्दाला नायकेचि७५
मीचि अपराधी अवगुणांची राशी।तरि काय कोणाशीं शब्द आहे७६
एक वेळ माझे अवगुण पाहुनी । गेलासे रुसूनी गुरुराजा ॥ ७७ ॥
असो जरी न याल ऐसिया समर्थी । नसे दुजी आई शिखिध्वजा७८
ह्मणसी गुरुमाये तुज एक वेळे।पाजितां स्वलीळें न पीसी तूं ॥७९॥
तरी अवधारी बाळकाची भूक। नसतां कौतुक स्तन न घे ॥८०॥
तया बाळकासी उपेक्षूनी माता । भूकही लागतां न पाजी ते ॥८१॥
आतां इच्छा झाली गुरूमाय रुसली।अहा ओढवली कर्मगती ।८२।
असो आतां मी हा देह गुरुपायीं।अर्पिलासे नाहीं संदेह येथें ॥८३॥
येचि देहीं कृपा जरी न करा स्वामी।तरी सप्तजन्मीं पावे नचा॥८४॥
मेघें उपेक्षितां चातक अनन्य । तेवीं मी शरण गुरूपायीं ॥ ८५ ॥
चंद्रें अव्हेरितां चकोर अनन्य । तेवीं मी शरण गुरूपायीं ॥८६॥
धेनू अव्हेरितां वत्स तें अनन्य । तेवीं मी शरण गुरूपायीं ॥८७॥
माता अव्हेरितां बाळक अनन्य । तेवीं मी शरण गुरूपायीं ॥८८॥
कूर्मी अव्हेरितां बाळक अनन्य । तेवीं मी शरण गुरूपायीं ॥८९॥
जलचरा जेवीं जीवनचि थारा । तेवीं मज लेंकुरा आधार तूं ॥९०॥
पक्षियासी जेवीं आकाशची थारा । तेवीं मज लेंकुरा आधार तूं ॥९१॥
ऐसी या प्रकारें शिखिध्वज राजा । आठवी महाराजा दिननिशीं॥९२॥
ऐसी जया रामा वाटे तळमळ । सद्गुरू दयाळ दूर नाहीं ॥ ९३ ॥
असो इकडे राज्ञी प्रधाना पुसोनी । कपाटें देऊनी बैसे खोलीं ।९४।
तैसीच निघाली आकाश मार्गानें । पुरुष रूप धरणें सुशोभीत ।९५।

आतां रामा होय गुरु शिष्य भेटी। परमानंद सृष्टी दुमदुमेल ॥९६॥
सर्व श्रोतीं व्हावें सादर श्रवणा। सत शिष्य गुरुराणा बोललासे॥९७
धन्य ते चुडाल धन्य शिखिध्वज। येचिदेहीं निज पावलेती ॥९८॥
वेदाचा मथितार्थ उपदेशक्रम । होईल सुगम मुमुक्षूंसी ॥ ९९ ॥
चुडालेनें धरिलें पुरुषाचें रूप। आकाशीं उडूप जैसा शोभे ।६००।
केवळ मदन आकर्ण नयन । बाहु ते आजान सरळदीर्घ ॥ १ ॥
चुबुक हनुवटी सरळ नाशीक । कपाळ मस्तक यथायुक्त ॥ २ ॥
मस्तकींच्या जटा दिव्य बांधियेल्या। पादुका शोभल्या उभयपदीं ।३।
शुभ्र ते कौपीन दिव्य कटिबंध । पाहतांचि आनंद नेत्रां होय ॥ ४ ॥
द्वादश ही टिळे दिव्य रेखीयेले । त्यावरी शोभलें यज्ञोपवित ॥ ५ ॥
उत्तरीतें वस्त्र आणि दिव्य माळा । या रीती उतरला गगन मार्गीं ६
शिखिध्वजापुढें अंतराळीं उभा । अंगकांती शोभा दिसेपडे ॥ ७ ॥
ऐसा एकाएकीं रायें शिखिध्वजें । स्वरूप देखिजे दृष्टीपुढें ॥ ८ ॥
पाहतांचि विस्मय पावला अंतरीं । ह्मणे हा कैवारी कोण आला ।९।
अतित्वरा उठे राहे बद्धांजुळी । साष्टांग ते घाली वारंवार ॥ १० ॥
कांहीं स्तवूं नेणें कांहीं अर्चूं नेणें । स्वमुखेंचि ह्मणे नमो नमो ॥ ११॥
आसनही नेणें अर्घ्यपाद्य नेणें। स्वमुखेंचि ह्मणें नमो नमो ।१२।
बैसा ह्मणो नेणें कोणपुसों नेणें। स्वमुखेंचि ह्मणे नमो नमो ॥१३॥
ऐसें पाहुनीया स्वामी उतरले। प्रेमें आलिंगिलें शिखिध्वजा ॥१४॥
तये आलिंगनीं दोघांही विस्मृती । सदृढ धरिती एकमेकां ॥१५॥
वाढवेळ होतां राजा उमजला। ह्मणे हा पातला कैवारीचि ॥ १६ ॥
मग तृणासन बैसावया देत । स्वामीसी त्वरीत बैसा ह्मणे ॥१७॥
तया तृणासनीं बैसती जाऊनी। परि नव्हे स्पर्श न भूमीलागी ॥१८॥
अंतरिक्ष तये आसनीं बैसती । क्षेमही पुसती शिखिध्वजा ॥ १९ ॥
अर्घ्य पाद्यादिक रायें पुजा केली। फळेंमुळें अर्पिलीं बहुप्रीतीनें ।२०।
हस्त जोडुनिया चरण वंदीत । वारंवार करीत प्रदक्षिणा ॥ २१ ॥

धन्यमाझाजन्मधन्यमाझेंकर्म । धन्यहास्वधर्म फळा आला ॥२२॥
स्वामीचीं पाउलें देखियलीं दृष्टीं । आनंदेंची सृष्टी दुमदुमीली।२३।
काय माझें भाग्य उदयासी आलें । अद्भुत हें झालें दर्शनादिव्य २४
कोणेठायींवास कोणस्वामीनाम । कोणता आश्रम निवेदावा ॥२५॥
मजवाटे विष्णु अथवा सदाशीव । किंवा ब्रह्मदेव मनुष्यरूपी ॥२६॥
किंवासनकादिक असा नारदमुनी । अथवावसिष्ठज्ञानीकिंवाअत्री २७
कीं अत्रीतनय दत्तदिगंबर । किंवाऋषीश्वर कपिलमुनी ॥२८॥
याज्ञवल्की असा किंवा तूं गभस्ती । संशयो निश्चिती फेडीं माझा २९
ऐसें बोलोनिया चरणवंदीले । सर्व निवेदिलें पाहिजे आतां ॥३०॥
पूर्ण अधिकार राजियाचा पाहें । ह्मणें लवलाहें अवधारीं ॥३१॥
आमुचा आश्रमब्रह्मांड अवघें । संचारनिजांगें तिहीं लोकीं ॥३२॥
नाम माझें पुससी तरी जाणें कुंभक । नारद तो एक पिता माझा ३३
राया कल्पिसी तूं नारद ब्रह्मचारी । तरी अवधारीं इतिहास ।३४।
एकवेळ आलें पर्व महाथोर । दुर्लभ पवित्र सर्वांहुनी ॥३५॥
सरस्वती तिरीं ऐसीया पर्वासी । देव आणि ऋषी मिळती तेथें ३६
पितर गंधर्व गणादिक थाटी । झाली असें दाटी अप्सरांची ॥३७॥
असंख्य विमानें आणि नानावाहनें । मिळतांचितेणें दाटी झाली ३८
तेथें श्रीनारदें स्नानही सारोनी । बैसती नयनीं पाहें सर्व ॥३९॥
तंवदेवस्त्रिया आणि गंधर्वांच्या । मिळाल्याती साच्या क्रिडेलागीं ४०
देव गंधर्वही मिळाले सकळ । नारीनर जळक्रीडा करिती ॥४१॥
वस्त्रें जळें स्निग्ध अवयव दिसती । तेणें उद्भवती काम दृष्टी ।४२।
ऐसी ते जळक्रीडा नारद पहात । तेणें सर्व चित्त मोहियेलें ॥४३॥
काम नावरत रेतस्खलन झालें । तें वीर्य त्यागिलें कुंभामाजीं ४४
तत्क्षणीं त्याकुंभींजन्ममाझाझाला । समुदायमिळाला पहावया ४५
नारदाचा पुत्र सर्वांसी कळलें । तेव्हां आनंदले देवऋषी ॥४६॥
कुंभापासूनीयां जन्मलों ह्मणूनी । नाम मजलागोनी कुंभकची ४७

नारदाच्या संगें तिहीं लोकीं गमन । देवादि संपूर्ण मान देती ॥४८॥
कैलासीं वैकुंठीं सत्यलोकादिकें । तेथेंही कौतुकें गमन माझें ॥४९॥
शिव विष्णुब्रह्मा मज कृपा करिती । सर्वदां बोलती स्वानुभव ॥५०॥
आह्मापरिग्रह कांहींचि असेना । ब्रह्मांड सदनामाजीं वर्तें ॥५१॥
किंचितही नाहीं आह्मांकर्तव्यता । मुमुक्षुच्याहिता विचरतों ॥५२॥
अमुकपावावें कांहीं उरलेंनाहीं । स्वात्मसुखें पाहीं तृप्त असों ॥५३।
ऐसें वर्तमान शिखिध्वजरायें । ऐकतां हृदय संतोषलें ॥५४॥
नारदाचे पुत्र आणि समाधानी ।वर्तती त्रिभुवनीं जगदोद्धारा ॥५५॥
धन्य भाग्य माझें वर्णना रहित । नेत्रांशीं पहात गुरुमूर्ती ॥५६॥
काय पूर्व पुण्य अद्भुत असेल । आजि तें उदेलें नावरत ॥५७॥
इतुके दिन होतां तया प्रतिबंध । तो आजि प्रसिद्ध निरसेल॥५८॥
जे कां अनधिकारी अह्माऐसेजड । तयालागींकोडें उद्धारितां॥५९॥
प्रपंचीं गुंतले तयां इच्छा कैंची । स्वतःदेतां रुचि येउनिया॥६०॥
वत्स जैसें खुंटा दृढ बांधियलें । मातेपें भुकेलें जातां नये ॥६१॥
तरी धेनु तया भरूनीया कास । येतसे सायास वत्सा केवीं ॥६२॥
तैसे प्रपंचिक गुंतले असतां । तया सत्संगति प्राप्त कैंची ॥६३॥
परी आपणचि संत ते दयाळू । येऊनी स्नेहाळु सोडविती ॥६४॥
असो आतांस्वामीमाझाभाग्योदय।देखियले पाय महाराजाचे ॥६५॥
जैसी मुमुक्षुसी अमृतवृष्टि होय।देखियले पाय महाराजाचे ॥६६॥
भुकेलिया जैसी अन्न प्राप्ती होय।देखियले पाय महाराजाचे ॥६७॥
उष्णें तापल्यासी जीवन प्राप्त होय।देखियले पाय महाराजाचे॥६८॥
चातकासी जेवीं घन बोळुनि ये । देखियले पाय महाराजाचे॥६९॥
अवर्षणीं जैसी पूर्ण वृष्टि होय । देखियले पाय महाराजाचे॥७०॥
तस्करें लुटतां जेविं धांवणें ये । देखियले पाय महाराजाचे ॥७१॥
व्याघ्रेंहरिणीधरिताकैवारीपातला । तेविंस्वामीआलासोडावया ॥७२॥
तरि मज दीनाची प्रार्थना परीसा । माझिया मानसा सुख व्हावें७३

सुखासाठीं राज्य त्यागुनीयां आलों।वनींही राहिलों सुख नव्हे॥७४॥
जप तप कर्में उग्र अनुष्ठान । करितां समाधान नोहे मज ॥ ७५ ॥
दीन उद्धराया आपुला संचार । जेवीं निशाकार चकोरासी॥७६॥
तरी स्वामी मज कृपा ऐसी करा। जेणें मी उद्धारा गती पावें॥७७॥
गुरुविण कोण सोडवी संकटीं । वाउगें हिंपुटी होणें लागे ॥७८॥
हा देह सर्वथा अर्पियेला पायीं । आतां मज काई चिंताअसे ॥७९॥
समर्थें मजपाशीं स्थिर व्हावें ह्मणतां। तरी काय सत्ता माजी असे ८०
अवश्य करणें मुमुक्षुचें हित । यास्तव त्वरित येणें आपलें ॥ ८१ ॥
जरी स्वामी दीनावरि कृपा असे।तरी आपुलें ऐसे ह्मणा दीना॥८२॥
सज्जनाचा संग अल्प पुण्यें नोहे। सत्संगेंचि आहे तरुणोपाय ॥८३॥
सर्व संग त्याग होता जरी खरा । परि नपवे थारा संतावीण॥८४॥
ऐसामजदिनाचाजाणोनीआशय । करास्वामीकायबहूबोलूं ॥ ८५ ॥
ऐसें करुणा वचनें करुनी प्रार्थना । वंदीत चरणा वारंवार ॥ ८६ ॥
पूर्ण अधिकार पाहिला कुंभकें । ह्मणे गेलें निकें कार्य सिद्धी॥८७॥
आतां रायासी या ज्ञान सिद्धी होय । केलासे निश्चय हृदयामाजी८८
तेव्हां तो कुंभक ह्मणे शिखिध्वजा।आह्मा याचि काजायेणेंझालें।८९।
ऐसा अधिकारी मानतां संतासी । उपेक्षा ती कैसी तया होय॥९०॥
आणिक करणें दुजें नाहीं संतां। मुमुक्षुच्या हिता आटाआटी ॥९१॥
धन्य तुझें चित्त संगवांछीतसे।तरी आह्मा अवश्य राहणें लागे॥९२॥
जैसा मुमुक्षुसी सत्संग आवडे । मुमुक्षुचें कोडें तेविं संता ॥ ९३ ॥
जैसा संतसंग दुर्लभ हा जनीं । तेवीं संतांमनीं मुमुक्षुही ॥ ९४ ॥
ऐकें शिखिध्वजा मुमुक्षु वांचून । आह्मा एकक्षण न कंठेची ॥९५॥
आतां तुजपाशीं आह्मासी राहणें। तुझें सुख देणें तुजलागी॥९६॥
तुझें तुज होणें जेव्हां समाधान । तेव्हांची गमन आमुचें होय॥९७॥
ऐकें रामा ऐसी गुरुमाय बोलली । मुमुक्षूच्या बोली वर्ततसे ॥९८॥
वेदाचा मथितार्थ प्रगटेल आतां । तेणें श्रोता वक्ता धन्य होय॥९९॥

प्रतिज्ञा करुनी कुंभक राहिला । तेणें संतोषला शिखिध्वज॥ ७०० ॥
प्रथम कुंभक शिखिध्वजालागीं । सांगत प्रसंगीं इतिहास ॥ १ ॥
तेणें अतिशय वैराग्य प्रबळे । प्रस्तावो उफाळे अनुतापें ॥ २ ॥
ऐकें राया एका अरण्यामाझारीं । गज लक्षवरी विचरती ॥ ३ ॥
मनुष्याचा वारा नाहीं ठावा तया।स्वतंत्र ते राया क्रीडताती॥ ४ ॥
तेथें एक आला गज आकर्षक । गज अवश्यक धरूं ह्मणे ॥ ५ ॥
गार खोदूनिया मुख आच्छादिलें । अंतरीं राहिलें पोकळ सारें॥ ६ ॥
तयावरी तृण वाढलें असतां । तेणें दिसे समता भूमीपरी ॥ ७ ॥
तयाठायीं गज एक चरूं आला । मोडता पडिला गारीमाजी॥ ८ ॥
तेथुनिया तया निघतांचि नये । कासावीस होय तेणें गज ॥ ९ ॥
तेव्हां महातें करूनियां मार्ग । सवें लागवेग स्कंधीं बैसे ॥ १० ॥
अंकुशाचे मार गंडस्थळवारी । तेणें क्षीण करीदर्प त्याचा॥ ११ ॥
ऐसा आकळूनि जनस्थाना आला । दृढ आकळीला चारी पायीं। १२।
चारा पाणी घाली परी ऐकें राजा । स्वाधीन त्या गजा करितसे। १३।
स्वतंत्र जो होता पराधीन झाला । दर्पही हरला सर्व त्याचा ॥ १४ ॥
एके दिनीं दैवगत्या तोचि गज । सुटला सहज त्यापासूनी ॥ १५ ॥
तयावेळीं महावत पाठी लागे । प्रयत्नेसी वेगें धरूं पाहे ॥ १६ ॥
एका वृक्षावरी लपुनी बैसला । नेणोनिया आला गज तेथें ॥ १७ ॥
तयावृक्षाखालीं हत्ती उभा असतां । महात तत्वतां उडी टाकी। १८।
स्कंधीं जों बैसावें तेव्हां त्यागजानें। कांहीं चुकावणें माथा आपला १९
तेणें महाताची उडी ते चुकतां। पडिलासे खालता चरणातळीं॥ २० ॥
तेव्हां गजें दिला पाय उरावरी। शुंडादंडें धरी चरण त्याचा ॥ २१ ॥
चिरोनी सांडावा जंव महात । तों आली त्वरित दया गजा ॥ २२ ॥
आतां मी सुटलों याचिये हातीचा। तरी प्रयत्न याचा निर्फळ झाला २३
तैसेचि लोटोनि महावता देत । स्वयें आरण्यांत जाता झाला ॥ २४ ॥
इकडे महावत सावध होऊनी। पहातसे नयनीं सभोंवता ॥ २५ ॥

ह्मणे मी वाचलों तरी आतां पुढें । सामर्थ्याच्या प्रौढें धरिन गजा २६
मग महावतें हर प्रयत्नानें । जाउनी धरणें गजालागीं ॥ २७ ॥
पूर्वी अविश्वास तयाचा आठवे । यास्तव बांधावें अतीदृढ ॥ २८ ॥
पहिल्या दशगुणें यातना करीत । तेणें गज होत कासावीस ॥ २९ ॥
पुढें पडिला होता त्याक्षणीं मारीता । तरी हें पावता दुःखकाई ।३०।
असो ऐसा गज पराधीन झाला । विचार वहिला करीराया ॥ ३१ ॥
आणीकही एक ऐकें इतिहास । सावध मानस असों द्यावें ॥ ३२ ॥
जनस्थानीं होता कुटुंबी ब्राह्मण । कांहीं होतें धन तयापाशीं ॥ ३३ ॥
परी आशा मोठी असे त्या ब्राह्मणा। ह्मणे इच्छित धना प्राप्त व्हावें ३४
तेणें कोण्याग्रंथीं होतें तें पाहिलें । पाहिजे ते गेलें मेरूवरी ॥ ३५ ॥
तयेठायीं वर्ष एक अहोरात्र । जपावा हा मंत्र यथाविधी ॥ ३६ ॥
ऐसें अनुष्ठान वर्ष एक होतां । चिंतामणी हाता येईल त्याचे ॥ ३७ ॥
इच्छीलें देतसे तोचि चिंतामणी । मग तया लागोनी उणे काय ।३८।
ऐसें त्या ब्राह्मणें ऐकोनि निघाला । मेरूवरी आला प्रयत्नानें ॥ ३९ ॥
तेथें अनुष्ठाना बैसला ब्राह्मण । झाले तीन दिन तयालागीं ॥ ४० ॥
उत्तम ते भूमि तेणें चिंतामणी । आला तयेक्षणीं विप्रापुढें ॥ ४१ ॥
परी हतदैव ब्राह्मण ठायींचा । ह्मणे असे कैंचा चिंतामणी ॥ ४२ ॥
वर्षाचि न होतां तिन दिसा माझारीं । चिंतामणी करीं नये सत्य ॥ ४३ ॥
ऐसा त्या मण्याचा अव्हेर ब्राह्मणें । करितां तेणें जाणें रुसोनीया ४४
पुढें तो ब्राह्मण सांगितल्यारीती । बैसला निश्चीती अनुष्ठाना ।४५।
वर्षएक होतां नये चिंतामणी । गेला तो रुसोनी आतां कैंचा ॥ ४६ ॥
तया ऐसा एक कांचखडा येत । ब्राह्मण निश्चीत हर्षें तेणें ॥ ४७ ॥
ह्मणे अनुष्ठानसिद्धी गेलें माझें । धन्य म्या लाभिजें चिंतामणी ४८
तैसाचि ब्राह्मण सदनासी आला । सांगे कुटुंबाला अत्यादरें ॥ ४९ ॥
आतां आपणासी चिंतामणी प्राप्त । तरी सर्व वित्त वांटावें हें ॥ ५० ॥
वस्त्रेंपात्रें धन वाडाही ब्राह्मणा । देऊनीया वना जाता झाला ॥ ५१ ॥

पुढें चिंतामणी पूजीला आदरें । अमुकहें देरे प्रार्थू लागे ॥ ५२ ॥
तंव तो कांचखडा देईल कोठोनी। तेणें ब्राह्मण मनीं दुःखी झाला ५३
होतें तेंही गेलें पुढें प्राप्त नाहीं । ऐसें झालें पाहीं हतदैवा ॥ ५४ ॥
कुंभक सांगत अगा शिखिध्वजा । विचारें समजा अर्थांतर ॥५५॥
ऐसें ऐकुनीया शिखिध्वज बोले। ह्मणे मजकळलें नाहीं कांहीं॥५६॥
गज तोचि कोण कोण महावत । धरितां सुटत पुन्हा कैसा ॥५७॥
गजाचीयापुढें कैसा रिपू पडिला । कैसा नाहीं वधिला दयाळुत्वें५८
पुन्हां महावतें गज धरोनीया । कैसें झालें तया बंधन तें ॥ ५९ ॥
आणि तो ब्राह्मण कोण चिंतामणी। प्राप्तही होऊनी गेला कैसा६०
कोण कांच खडा ब्राह्मणा लाधला । हें सर्व मजला पुन्हां सांगा६१
बहु बरें ह्मणुनी कुंभक सरसावें । तेंचि अवधारावें श्रोतेजनीं॥६२॥
आगाशिखिध्वजा तुझें तुज न कळे।असोनीया डोळे झाकिसी तूं६३
तूंचि जाणगज असतां स्वतंत्र । झालासी परतंत्र अज्ञानाचे॥६४॥
तुझें जें अज्ञान तोचि महावत । तुजला आकळीत हरप्रयत्नें॥६५॥
जेणेंचि संसारबंध दृढ झाला । बहुशीण केला सुखदुःखें॥६६॥
येथूनी सुटावें ऐसी इच्छा तुज । झाली जैसागज सुटियेला॥६७॥
तुज इच्छा होतां तुझिया सदनीं । आले महामुनी सोडवाया॥६८॥
बहु प्रकारेशीं तुज निरोपिलें । अज्ञान पडलें तुझे पुढें॥६९॥
तेचि वेळे तुज ज्ञान विचारानें । शत्रूचें मारणें नाहीं झालें॥७०॥
तयेकाळीं जरी ज्ञान पूर्ण होतें । अज्ञान राहतें तरी कोठें ॥७१॥
अज्ञाना दुखवूनी सोडिलें मागुतें । तेंचि पुन्हां धरितें झालें तुज७२
अधिक बंधन अविश्वासें झालें । विचारुनी बोलें खरें खोटें॥७३॥
ब्राह्मणासारिखा तूंचि हतदैव । तेहि ऐकें सर्व विचारेंसी ॥७४॥
गुरुविण गति नाहीं शास्त्र बोले । ऐसें त्वां ऐकिलें विप्रापरी॥७५॥
ब्राह्मण तो जैसा गेला शिखरावरी । तेविं तुज अंतरीं श्रवण प्रीती७६
ब्राह्मणाच्या दैवें चिंतामणी आला । तेविंतुज लाधला संतसंग॥७७॥

तोचि संतसंग ह्मणसी कोणता । तरी पाहें वनिता तुझी राया॥७८॥
धन्य ते चूडाल पूर्ण समाधानी।ते तुज क्षणक्षणीं उपदेशीत॥७९॥
चुडालेसारिखा गुरु प्राप्त झाला। तो तूं अव्हेरिला अविश्वासें॥८०॥
तुज वाटे मनीं हे आमुची राणी।यास्तव तुझे मनीं अविश्वास॥८१॥
जरी तूं विश्वासें वचन मानितासी।कां न पावतासी समाधान॥८२॥
चिंतामणी जैसा कल्पिलें पुरवीत।तेवि तुझें चित्त स्वरूपीं मिळतें ८३
हत दैव जैसा ब्राह्मण ठाईंचा। तेवि तुझ्या हातींचा संग गेला॥८४॥
कांचखडा जैसा मानी चिंतामणी।तेवि तुजलागुनी शीण गोड।८५।
कांचखडा जैसा नेदीच कल्पीत।तेवि सुख देत शीण केवीं॥८६॥
जयेच्या संगती तुज प्राप्त झालें। वैराग्य बोलिलें विवेकेशीं॥८७॥
परि त्वां विवेक सोडुनीया दूरी। हेकाडी पदरीं घेतीयेली॥८८॥
होतें जैसें धन ब्राह्मणें वांटीलें। तेवि त्वां त्यागीलें राज्य सर्व॥८९॥
कांचखड्यालागीं पूर्ण विश्वासून। तेवि अनुष्ठान सुख ह्मणसी॥९०॥
वनामाजीं येतां तुज प्राप्त झालें। तें काय वहिलें सांग मज॥९१॥
तुज चुडालेनें बोलिलें असतां। तया अव्हेरितां होसी मूर्ख॥९२॥
राया तुझें चित्त जरी आशंकील।कीं तुह्मा चुडाल काय ठावी।९३॥
तरी आह्मी भूत भविष्य जाणतों।तीहीं लोकीं घेतों प्रत्ययसर्व॥९४॥
मुंगीचें अंतर आह्मां कळतसे। चुडाल तरि असे मनुष्यदेह॥९५॥
असो तुवां राया आपुलें स्वहीत। पाहसी चित्तांत विवेकेंचि॥९६॥
येथें मिळविलें चर्मकाष्ट पात्र। हा काय संसार नोहे राया॥९७॥
येथें संध्या स्नान फळ मूळ खावें।राज्यचि त्यागावें कासयासी॥९८॥
नामरूप त्याग बोलियेला वेद। न जाणासि शुद्ध विरक्तीतें॥९९॥
ऐसीं कुंभकाचीं भेदक वचनें। विस्मयची तेणें शिखिध्वजा॥८००॥
आधींच विटला सर्व कर्मालागीं। त्यावरी प्रसंगीं निर्भर्तिसलें॥१॥
जैसें उरगासी फडीं ताडिजे तें। तेव्हांचि खवळतें अनावर॥ २॥
तैसें तें वैराग्य अंतरीं खवळलें। बोलत ते वेळे कुंभकासी॥ ३॥

अहो महाराजा बोलिलां आपण। सत्य आलें पूर्ण प्रतितीसी ॥ ४॥
नानापरी मज तया मुनीरायें । सांगितलें जाय व्यर्थ सर्व ॥ ५ ॥
त्याहिवरी प्रतिदिनीं बोधक्रिया । सांगत उपाया चूडालही ॥ ६॥
तयेचा तो मज विश्वासची नाहीं । यास्तव सर्वही व्यर्थ गेलें ॥७॥
अंतर विरागी बाह्य लोकाचारें । वर्तावें आदरें बोलतसे ॥८॥
ऐसीया वचना नाहीं मानीयेलें । वन मीं सेविलें अविवेकें ॥९॥
चिंतामणी खराचि मीं उपेक्षुनी । आलोंसे घेऊनी कांचखडा॥ १०॥
मनीं म्या भावीलें थोर कष्टाविणें।नुसतें शब्दज्ञान काय कीजे।॥ ११॥
मागेंजेजेराजेराज्यहीत्यागुनी। सुखालागी वनीं आले असती ॥ १२॥
तैसाच मी राज्य त्यागुनीया आलों।कारितां शिणलों कष्टबहु॥ १३॥
कोणतें करावें काय न करावें। हेंचि नोहे ठावें मजलागी ॥ १४॥
वाउगेचि कष्ट मीं कीं जे जे केले।तेणें शीण झाले सुख नाहीं॥ १५॥
शीत उष्ण सुख दुःख कीं आपदा।न देखेचिकदां देहाकडे ॥ १६॥
आकंठ राहिलों उदकीं शीतकाळीं।पर्जन्य सकळीं शिरीं घेत॥ १७॥
उष्ण काळा माजीं पंचाग्नि साधन।काढिला भाजून देह अवघा १८
धूम्रपान केलें उभाचि राहिलों।न उठतां बैसलों कांहीं काळ ॥१९॥
स्नान संध्या केली जें कर्म आपुलें। अग्नीसी पुजिलें यथाविधी २०
जप पुरश्चरणें आणि केलें ध्यान।परी समाधान झालें नाहीं ॥ २१॥
सुखासाठीं कीजे दुर्गम साधन।तो तो होतो शीण सुख कैचें ॥ २२॥
असो स्वामी झाले ते होउनी गेले।आतां पुढें केलें पाहिजे काय २३
गत गोष्टी काई मागुती येतसे । होणे जैसें जैसें तैसें झालें॥ २४॥
हातींचा तो बाण निसटोनी गेला।पुढें आवरिला कैसा जाय॥ २५॥
ऐसा मी अविवेकी दुःखामाजीं पडलों।पाहिजे काढिलोंस्वामी आतां२६
अहो स्वामीराया मज ऐसें वाटतें।कष्टही सर्व ते फळा आले॥ २७॥
उपोषण अंतीं पारणें होतसें। कष्टांतींही तैसे देखे चरण ॥२८॥
इतुके म्यां जे जे कष्ट करोनिया। जोडियेले पाया मज वाटे॥ २९॥

मृगजळ देखुनी हरिण धांवत । तया अकस्मात पाणी मिळे॥ ३०॥
तया मृगामनीं शिणाचें हें फळ । देखतांचि जळ आनंदलें ॥ ३१॥
तैसाचि मजला घडला जो शीण।तेणेंचि दर्शन स्वामी झालें॥ ३२॥
राज्यत्यागुनीयावनासीनयेतों। तरीस्वामीपहातोंचरणकेवीं ॥ ३३॥
असो माझे झालें कष्टाचे परिहार। देखिली सुंदर गुरुमूर्ती ॥ ३४॥
ऐसें ऐकुनीया कुंभक तोषला। ह्मणे भलाभला शिखिध्वजा ॥ ३५॥
सुरासुरी राज्य तुझें अपेक्षिजे । तें तुवां मानिजे वोकापरी ॥ ३६॥
स्त्रीपुत्रस्वजन बहु आवडते । ते तुवां परते सांडियले ॥ ३७॥
सर्वांलागी देह बहुत आवडे । त्याचें तुवां मढें केलें राया ॥ ३८॥
धन्य तुवां केलें जपतपकर्म । अंतरीं सकाम न होऊनी ॥ ३९॥
तयाचें हें फळ अंतर्शुद्धिझाली । सहजें दुणावली विरक्तीही॥ ४०॥
आह्मीं तुज पूर्वीं धिक्कारिलें असें । प्रयोजन कैसें तेंचि ऐकें ॥ ४१॥
तुझे चित्ताठायीं न व्हावा निर्धार । कर्मधर्में पार पावेन मी ॥ ४२॥
अनेक साधनें मोक्षकर होतीं । येथेंही विरक्ती तुज व्हावी ॥ ४३॥
आतां तुज कळला व्यर्थाचि हा शीण। हेंचि फळ जाण साधनाचें ४४
सर्व कर्मांवरी झालासी उदास । लागलीसे आस सत्संगाची॥ ४५॥
ऐसी जे भावना तुझे ठायीं झाली । साधनें फळलीं सर्व राया॥ ४६॥
दिननिशीं तुझें अंतर गुरुपदीं । अंतःकरणशुद्धि झाली राया॥ ४७॥
ऐसा आह्मालागी कळला वृत्तांत । यास्तव धांवत भेटी आलों ४८
जरी तुझी कर्मीं आवडी असती।तरि आमुची कल्पांतीं भेटी नव्हे४९
असो ऐसें रामा राया आश्वासीलें । तेव्हां राजा बोले कुंभकासी५०
अगा महाराजा परिसावी प्रार्थना । स्वामीच्याचरणा शरण मी ५१
कोणत्या उपायें मज सुख होय । आणि भवभय नासे सारें ॥ ५२॥
कायकैसें करूं न करूं काय तें । सागावें समस्तें स्वामीराया॥ ५३॥
विनंती रायाची कुंभकें परिसोनी । संक्षेप वचनीं बोलतसे ॥ ५४॥
कर्में सुख नाहीं स्वधर्म देहाचा । त्यागेंविण कैचा मोक्ष जोडे॥ ५५॥

ऐसें बोलतांचि राजा शिखिध्वज । उठला सहज आसनीहुनी॥८२॥
भोपळाफोडिलामाळातोडियल्या । पादुका फेंकिल्यादूरदेशीं ॥८३॥
विभूतीचा गोळा आणि कडासन । पाळेंआदिकरून फेंकियलें॥८४॥
कटीबंदासह कौपिन फेंकिलीं । काष्टपात्रें दिधलीं फेंकुनिया ॥८५॥
अग्निकुंडेंफोडी यज्ञोपवित तोडी।त्यागूनि झोंपडी दुरी गेला ॥८६॥
ऐसें कुंभकपाहे आपुले दृष्टीसी।ह्मणे हा अपेशी हेकड असे ॥८७॥
तेव्हां मग उठोनिया कुंभकानें । तयाजवळी ह्मणें येउनियां॥८८॥
माळाकौपीन हे अथवा आसनें । सांडितांहि येणें तुजकाय ॥८९॥
अथवाजैंहोतींतेव्हां काय खाती । कींत्यागितांजातीरुसोनिया ॥९०॥
न घेसी फळहार तरी वृक्ष काय । घेघे ह्मणुनि पाय वंदीतील॥९१॥
आधींच हें सर्व तुजहून वेगळें । असतां त्यागिलें तुवां कैसें॥९२॥
त्यागायाचि वस्तु नाहीं त्यागियेली । वरिवरि दाविली विरक्तीहे ९३
धन ठेवुनिया जळचि सोडिलें। तैसें तुवां केलें सत्य राया ॥९४॥
मूळ रक्षुनीया शाखा तोडी जैसा । तेणें रीति ऐसा त्याग केला९५
ऐशिया त्यागानें होतें काय राया । त्यागतोलवलाह्या करीं वेगीं ९६
विचारानें पाहे बाधक कोणतें । तें त्यागीपरतें सुखी होसी ॥९७॥
पुरताविवेक करीं आपुले ठायीं । तोचि त्यागपाहीं करीराया॥९८॥
वेद बोलियेला जोका मुख्य त्याग । करूनी असंग होईराया॥९९॥
ऐसें कुंभकाचें वचन ऐकुनी । विचारिता मनीं होय राजा॥१००॥
आतां काय उरलें असें मजपाशीं । ह्मणोनिया त्यासी त्यागिजेल १
देह एकमात्र उरला साचारु । त्याचा त्याग करूं ह्मणें आतां॥२॥
वृक्षाचियासाली काढुनी वोळिल्या।झाडाशीं सांधिल्या फांसा करून३
आपुलिया कंठीं फांस तो घातीला । पहातां कुंभकाला विस्मय होय४
धांवोनि वोढिलें फांसाही तोडिला । ह्मणे काय तुला वेड आलें॥५॥
देह हा नीमता पुढें सुख कैचें । तेंचि पाहे साचें विचारुनी ॥६॥
मरणा उपरी मोक्ष प्रतिपादिती । तुज ऐसें मानिती मूर्खजन ॥७॥

जीवन्मुक्तीसुख मग कोणें ध्यावें । विचारें जाणावें कोणेंरूप ॥८॥
जाणिल्या वांचुनि सुखना तेमुक्ती।अधःपाता जाती आत्मघ्न ते ॥९॥
वेणु कैसा वाजे सुंदर तो नाद । फोडुनी विशद पाहूं लागे ॥ १० ॥
तैसें देहत्यागें ज्ञान होय कैंचें । अधःपात साचे होय राया ॥११॥
वेणु असतांचि कळे वाजवितां। तेविं देह असतां वोळखावा॥१२॥
बहुपुण्यें झाला नरदेह प्राप्त । तेथें नाहीं होत ज्ञान जरी ॥ १३ ॥
जरी नाहीं ज्ञान प्रगटलें खरें । प्राण देतां सरे केंवी भोग ॥ १४ ॥
पुढें अकस्मात नीच योनी जावें। अंधतमीं रहावें कल्पवरी ॥१५॥
कोटी कोटी जन्म फिरतां हा जीव । नरदेह अपूर्व प्राप्त कैंचा १६
ऐसा जो दुर्लभ प्राप्तही होऊनी । ज्ञान न पावुनी हत्त्या झाली १७
ऐक राया तया हत्त्या नाहीं झाली । पाहिजे ऐकिली संख्या तुवां१८
मागें जितुके जन्म घेतले असती।आणि पुढें होती तितुके जन्म १९
आत्महत्या तितुक्या नरदेहा येउनी।संपादिल्या ज्यांनीं ज्ञानेविण२०
नरदेहा तरावया लागीं यावें । हें तो नसंभवे नर्कजोडे ॥ २१ ॥
उत्तम देहा आला हत्त्या जोडावया । तो केविं पापिया उद्धरेल २२
ऐसाचि तूं राया असती अविचारी।देह निमतां तरी सुखकैंचें ।२३।
दिव्यदृष्टि यावी म्हणूनिया डोळे।फोडोनि बुबुळें अंध झाला॥२४॥
विरूप असतां रूपवंत व्हावें । यास्तव छेदावें नाक कैसें ॥ २५ ॥
आपुले जिव्हेची रुचि सर्व जातां।तरि काय कापितां रुचियेते॥२६
पाणी हाता नये यास्तवविहिरी । ढांसळीतां करीं काय येतें ॥२७॥
तैसें तुज काय प्राणही देऊनी । प्राप्त होय जनीं सुख कैंचें ॥२८॥
तरी राया समजें पूर्ण विचारानें । येचि देहीं घेणें सुख स्वयें॥२९॥
ज्ञानावांचुनिया सुख प्राप्त नाहीं । यास्तव लवलाही ज्ञान व्हावें।३०।
तेंही ज्ञान नोहे वैराग्यावांचुनी । संग त्याग करणें आधीं राया३१।
आपणासी संग असेल जडला। तितुका त्याग केला पाहिजे तो३२
देहही त्यागितां त्याग तो न घडे । तरी सुख जोडे कैसें राया॥३३॥

तरी आहे आतां संग तुज कोण । पाहे विचारून मग त्यागीं॥ ३४॥
ऐसें त्या कुंभकें शब्द मृदु कठिण । केलें शांतवन बोलोनिया ॥ ३५॥
मग उभयतां स्नानेंही करूनी । जानवें कौपीन दिधली राया ॥ ३६॥
भस्म विलेपन गवाळें आसन । जप संध्या करून फळें खाती ॥ ३७॥
मागुती तो झाला विनविता राजा । ह्मणे महाराजा त्याग कैसा॥ ३८॥
मजलागी संग कोणता जडला । तो नाहीं कळला चित्तीं माझ्या ।३९।
तरी कृपा करुनी सांगा कोणसंग।जडला त्याचा त्याग कीजेमीजी४०
माझी मंदमती परी शरणांगत। तरि मज दीनातें उद्धरावें ॥ ४१॥
ऐसें बोलोनीया चरण वंदीले । मग काय बोले कुंभकतो ॥ ४२ ॥
अगाराया तुज अहंकार संग । जडला अभंग देहबुद्धीचा ॥ ४३ ॥
तरी आधीं अभिमान त्यागी राया । येर त्याग वांया बाह्यात्कार४४
स्त्रीपुत्रादिधन तुजहुनी भिन्न । त्याच्या त्यागें जाण काय होतें ।४५।
कर्म धर्म वर्ण आश्रम देहाचे । सांडितांही त्याचे कठीण केवी॥ ४६॥
देहही त्यागितां काय असें कठीण।यास्तव अभिमान त्यागी आधीं४७
स्थूलासी मी ह्मणसी तेचि आतां सांडी।मग हे साडीमांडी नलगेतुज४८
सुक्ष्माची ग्रंथी तोडोनियासांडी । मगहेसांडीमांडी नलगे तुज॥४९॥
कारणाचें मूळ खाणोनियासांडी । मगहेसांडीमांडी नलगेतुज॥५०॥
सर्व जगताचा सर्वपणासांडी । मगहे सांडीमांडी नलगे तुज ॥ ५१ ॥
त्रिपुटी माजील द्वैतभावसांडी । मगहे सांडीमांडी नलगे तुज ॥५२॥
स्फूर्तिजाणिवेचा अहंभाव सांडी । मगहे सांडीमांडी नलगेतुज ।५३।
ऐसें हें त्यागाचें रूप बोलियेलें । पाहिजे त्यागीलें येणें रीती ॥५४॥
ऐशा त्यागेविण सुखप्राप्ति कैची । आणि कैवल्याची प्राप्ती नोव्हे ५५
मुख्य त्याग हाचि सांगितला राया । करणें उपाया अता तूंवा ५६
ऐसें कुंभकाचें वचन ऐकतां । झालासे बोलता शिखिध्वज ॥ ५७ ॥
अहो स्वामीराया ऐकावी विनंती । सांगावें मागुती बोलिलें जें ।५८।
कैसा अभिमान जाणोनि त्यागावा।बंधनाचा गोवा पडिला कैसा ५९

मी मी जें वाटतें तें त्यागितां नये । सांडितांही जाय कोणे परी६०
स्थूळ देह असतां न जाय अभिमान । ऐसें मजलागुन वाटताहे६१
अग्नि जैसा असतां नजाय उष्णता । तया त्यागूं जातां क्षीण उरे६२
तेवि देह असे पूर्वील व्यापारी । मी मी ह्मणणें तरी कैसें राहे॥६३॥
मुखीं मी मी ह्मणतां व्यापार चालती । नाहीं तरी होती कासयानें६४
तथापि ते जरी न केला उच्चारू । अंतरीं उच्चारू होत असे ॥६५॥
मुखीं न बोलतां अंतरीं जो उठे । तोचि कैसा आहे सांगा स्वामी६६
मज बहू अवघड दिसताहे । थोरसा संदेह वाटताहे ॥ ६७ ॥
बोलिले कीं स्वामी जाणोनी त्यागावें । तरी काय जाणावें विचारानें६८
स्थूल बुद्धी जावी सूक्षम सांडावें । कारण त्यागावें जाणोनियां ॥६९॥
तरी स्थूल देह कासयाचा झाला । अवयवें घडीला कोण्या द्रव्यें७०
जड कैसा झाला चंचळासारिखा । व्यापार हा निका कैसा चाले७१
तया मी मी ह्मणें तोचि असे कोण । देह कीं त्याहून अन्य असे७२
देहचि तो असतां त्याग कैसा घडे । यास्तव सांकडें वाटे मज॥७३॥
देहासी वेगळा जरी अभिमान । ह्मणें परा आपण मी मी कैसा७४
तैसाचि सूक्ष्म देह जाणूं कैसा । तया मी मी ऐसा कोण ह्मणें॥७५॥
स्थूळाचा अभिमान तोचि सूक्ष्माचा । किंवा दुजा साचा असे तया७६
तयाचा व्यापार कैसा चालतसे । कोठें राहतसे सांगा स्वामी॥७७॥
कारण तें कैसें आणि कोठें राहे । व्यापार होताहे याचा कैसा॥७८॥
तया मी मी कोण मानितो दिननिशी । बद्धता जीवासी कैसी झाली७९
जिवाचें तें रूप कैसें ओळखावें । कोठोनी संभव कीं अनादी॥८०॥
कैसा तत्व झाडा करोनी पहावें । हें सर्व सांगावें स्वामीराया॥८१॥
महा मुनीराज अथवा चुडाल । बोलिले सखोल तें मी नेणें॥८२॥
ब्रह्मज्ञान व्हावें आत्मया जाणावें । बोलिले स्वभावें परि तें नेणें॥८३॥
ब्रह्म तें कोणतें आत्मा तो कोणता । सांगावें तत्वतां मजलागीं८४
हें असो मजला त्याग कैचा घडे । केवी सुख जोडे अपरमीत८५

स्वप्न जागृतीसी मज सुखदुःख । असतां अशेख त्याग कैसा ॥ ८६ ॥
झोंपे माजीं मात्र सुख होय जीवा । तितुका विसावा वाटतसे ॥ ८७ ॥
तरी ते सर्वदा झोंपची असावी । व्यापाराची गोवी मज नको ॥ ८८ ॥
तेव्हां मी मी ऐसा सांडी अभिमान । तेणें त्याग पूर्ण होय मज ८९
तरी मज स्वामी कृपा ऐसी करा । पुन्हां स्या व्यापारा नचि यावें ९०
ऐसें बोलोनीया चरण धरियेले । ऐकुनीया बोले कुंभक तो ॥ ९१ ॥
ऐकें राया तुवां प्रश्न केले बरे । परि एक उत्तरें युक्त नव्हे ॥ ९२ ॥
व्यापार सरावे सुषुप्तीचे परी । सहज अंतरीं त्याग घडे ॥ ९३ ॥
तरी ऐकें राया आलीया मरण । अभिमान तेणें जन्म होय ॥ ९४ ॥
तैसांचि सुषुप्ती अभिमान उरे । सरतांही व्यापारें सुख नव्हे ॥ ९५ ॥
सुखरूप असे परि नाहीं जाणीलें । यास्तव ठेविलें निद्रानाम ॥ ९६ ॥
तरी आधीं सर्व जाणिलें पाहिजे । त्यागितां लाहिजे स्वसुखाशी ९७
असो तुवां प्रश्न अन्य जे जे केले । हें तुवां ऐकिलें पाहिजे तो ॥ ९८ ॥
उपक्रम उपसंहार तत्वांचा । वेद बोले वाचा तेंचि बोलूं ॥ ९९ ॥
आतां सावधान असा श्रोते जन । उपदेशालागुन बोलिजे तें १०००
उपदेशक्रम कुंभक बोलत । राजा तो ऐकत शिखिध्वज ॥ १ ॥
ऐके राया मुमुक्षुनें हें जाणावें । विचारें निवडावें सत्य मिथ्या ॥ २ ॥
वेदांताच्या ठायीं दोनचि पदार्थ । जाणावे यथार्थ सत्यमिथ्या ॥ ३ ॥
सत्य तें दिसेना मनासी भासेना । होतां उद्भवेना जगासह ॥ ४ ॥
नाश जरी झाला तरी तें नासेना । चंचळें हलवेना एकरूप ॥ ५ ॥
तिहीं काळीं असे तेंचि सत्यरूप । जाणावें चिद्रूप ज्ञानमात्र ॥ ६ ॥
जें जें उद्भवतें तें तें अवलोकीत । तोचि द्रष्टा होत दृश्य हेतु ॥ ७ ॥
सर्वांसी जाणावें साक्षी तया नांवें । लया ओळखावें तेचि ज्ञान ॥ ८ ॥
स्वप्रकाश सदा ते जाण चिद्रूप । तेचि आनंदरूप अकृत्रिम ॥ ९ ॥
सुखदुःखाविण निज सुख जें कां । आनंदरूपका ओळखावें ॥ १० ॥
एवं सच्चिद्रूप आनंद लक्षण । आनंद परिपूर्ण ब्रह्मसत्य ॥ ११ ॥

एवं सत्य एक सांगितलें राया । ऐकें मिथ्या माया बोलिजे ते ।१२।
उत्पन्न होऊनी कांहीं काळ राहे। लय होत आहे तें तें मिथ्या॥ १३
रज्जूचिया ठायीं सर्पाचें दिसणें। तेवि जग होणें न होऊनी ॥ १४॥
असो जगदाभास भासला जो असे। तो ऐकें विश्वासें उपक्रम।१५।
निश्चळ आकाशीं जैसा वायु होत । तेवि आठवत अहंस्फूर्ती ।१६।
मी ब्रह्मस्फुरण सहज उठलें। जाणोंहीं लागलें तितुक्यासीं ॥१७॥
चंचल प्रकृती पुरुष जाणता। ऐसें हें उभयतां शिवशक्ती ॥१८॥
स्फुरणारहित जे अखंड पूर्ण। तया विस्मरण अज्ञान तें ॥ १९ ॥
जाणणें चंचळ तया नांव विद्या। अज्ञान अविद्या दोन्ही ऐशा२०।
विद्येंत बिंबलें सर्वज्ञत्व आलें। तयासी ठेविलें ईश्वर नाम ॥२१॥
अविद्ये माझारीं बिंबलें किंचित। तया जीव संज्ञ बोलिलेंसे ॥२२॥
उपाधी ह्या दोन परी ते एक रूप। किमपीही अल्प भेद नाहीं॥ २३॥
अविद्येच्या योगें विद्या जड होत। तेचि अव्याकृत दुश्चितपणें।२४।
व्यष्टी समष्टीनें द्विधा विभागलें। दोहीं माजी पडलें प्रतिबिंब।२५।
कारण हे व्याप्ती तयाचा अभिमान। तो जाणिजे प्राज्ञनाम पावे२६
अव्याकृत समष्टीचा अभिमान। तो रुद्र आपण नाम पावे॥२७॥
ययापुढें झाला हिरण्यगर्भनामें। तोचि अनुक्रमें बोलिजे तो॥२८॥
रज सत्व तम गुण तीन होती। क्रियाज्ञानशक्ती द्रव्यात्मिक॥२९॥
तमोगुण द्रव्य शक्तीचिया अंशें। प्रथम आकाश प्रगटलें ॥३०॥
आकाशीं तो वायू वायुपूढें अग्नि। तेजा पोटीं पाणी आपीं भुमी३१
ऐसें भूत पंचक उत्पन्न जैं झालें। गुणही मिळाले शक्तीसह॥३२॥
आकाशादिकांचा काढिला सत्वांश। ज्ञानेंद्रियें त्यास बोलिजेते ३३
तेविच सत्वांश एकत्र निर्माण। तेंचि अंतःकरण होते झाले॥३४॥
संकल्प विकल्प तेचि वृत्ती मन। निश्चय करणें तेचि बुद्धी ॥३५॥
पंचही भूतांचा रजांश काढिला। तेव्हां जन्म झाला कर्मेंद्रिया ३६
तेवीच रजांश एकत्र काढीत। तेचि प्राण होत पंचविध॥ ३७ ॥

एवं पंचप्राण दहाही इंद्रियें । मनबुद्धी हें द्वय मिळतां सत्रा॥ ३८॥
ऐशा सत्रा तत्त्वें मिळोनी सूत्रात्मा । समष्टीरूपें नामा हिरण्यगर्भ ३९
रुद्र नाम तया उपाधि अभिमानें । पावला अभिधानें विष्णुऐसें॥ ४०॥
व्यष्ट्यात्मकतयानामदेह सूक्ष्म । तैजस आलें नाम प्रज्ञालागीं॥ ४१॥
पुढें पंचीकरण करून भुतांचें । ब्रह्मांड हें साचें उभविलें ॥ ४२॥
जारजादि खाणी जे का नाना पिंड । सर्वांशीं ब्रह्मांड समष्टीनाम ४३
इतुक्या दृश्याचा वाहे अभिमानें । तया चतुरानन नाम आलें। ४४।
एका पिंडामाजी तादात्म्य पावला । तैजसचि झाला विश्वनामी। ४५।
तस्मात् हे राया एकचि चैतन्य । पावलें अनाम नाममात्र ॥ ४६॥
जीव शिवालागिं नाम मात्र भेद । रूपतें अभेद उभयतांचें ॥ ४७॥
रुद्र विष्णु ब्रह्मा नामईशालागी । उपाधीच्या संगीं आलें असें॥ ४८॥
प्राज्ञ तैजसविश्व तीन अभिधानें । उपाधीच्या गुणें नामें तीन॥ ४९॥
उपाधीच्या योगें नाम भिन्न होतां । मुळीं स्वरूपता अभिन्नचि ॥ ५०॥
एवंस्फुरणमाया आदिदेहअंतीं । जे जे भासताती तितुकें मिथ्या ५१
सत्य तेंचि असे एक अधिष्ठान। तेथुन संपूर्ण नाम मिथ्या ॥ ५२॥
जयासी उत्पत्ती आणि नाश आहे। तें तें मिथ्या पाहें विचारानें॥ ५३॥
उत्पत्ती ज्या नाहीं लय होय कैसा । तया अविनाश ओळखावें ५४
उत्पत्ती प्रकार सर्व सांगितला । रज्जुवरी झाला सर्प जैसा ॥ ५५॥
आतां याचा लय कांहींसा बोलिजे । तेणेंही लाहीज मिथ्या दृष्टी ५६
रज्जुवरी सर्प कांहीं काळ असे । तेवि जग दिसे स्थिती काळीं ५७
लय काळ जेव्हां सर्वां आदळतां। भौतिकाचा अंत होय आधीं। ५८।
भूतें संहारती एकमेकां खाती । गुणासहित शक्ति हारपल्या ॥ ५९॥
विद्या अविद्याही नाशातें पावती । तयासवें जाती जीव शीव॥ ६०॥
पाणीचि आटतां प्रतिबिंब लोपे। तेवि दोन्ही हरपे जीव शीव॥ ६१॥
अहं ब्रह्म स्फुरण तेंहि लया गेलें । केवळ उरलें ब्रह्म एक ॥ ६२॥
गाढ अंधकारीं सर्पतो नासेना । तेवी सर्व जना लय होय ॥ ६३॥

सर्पेविण रज्जु तयेठायीं राहे । तेवि ब्रह्म आहे सदोदित ॥ ६४॥
सावधान राया उत्पत्ती संहार । सांगितला थोर मिथ्यालागीं॥ ६५॥
सत्य तेंचि ब्रह्म तोचि परमात्मा । आणि प्रत्यगात्मा नामह्यासी॥ ६६॥
माया अविद्येमुळें जीव शीव झाले । परि ते नाथिलें ब्रह्म रूप॥ ६७॥
एकचि अभिमान असे विभागला । तेणेंचि पावला नामभेद ॥ ६८ ॥
अभिमान असे सर्वज्ञपणाचा । तोचि ईश साचा विद्यात्मक ॥ ६९॥
किंचिज्ञपणाचा अभिमान घेऊनी । मरतो जन्मुनी तो हा जीव॥ ७०॥
तया अहंकारा सुषुप्तीच्या योगें । नाम आलें वेगें प्राज्ञ ऐसें ॥ ७१॥
मज कांहीं नकळे हाचि अभिमान । मी मी हें स्फुरण इतुकें असे॥ ७२॥
तें मी मी स्फुरण स्वप्नाचियेठायीं । भास देहा पाही मी मी ह्मणे ७३
तोचि अहंकार जागृतीसी येतां । स्थूळासी तत्वतां मी मी ह्मणे ७४
तुंवा पुसिलें तें सर्व सांगितलें। आणि निवडीलें सत्य मिथ्या॥ ७५॥
येथें तूंगाराया कल्पना करिसी । कीं, लय सर्वांसी सत्यामाजीं॥ ७६॥
तेव्हां सर्व जीव ब्रह्मीं मिळताती । तरी होय मुक्ती सर्व जीवां॥ ७७॥
ऐसी हे कल्पना कदां करूं नये । अज्ञान न जाय लय होतां॥ ७८॥
अंधारांत जैसा सर्पही दिसेना । परी भीति जाईना कळल्यावीण ७९
तैसेंसर्व असतां मिथ्या नाहीं कळलें। तरी तें भय गेलें कैसेंराया ८०
दिवा लावुनीया रज्जुवोळखिली । तत्क्षणी नासली सर्पबुद्धी ॥ ८१॥
तैसेंचिया जगा आणोनिया ज्ञानें । मिथ्या वोळखणें देह असतां ८२
ब्रह्मज्ञानेविण जगमिथ्या नव्हे । ब्रह्मज्ञानलाहे मिथ्या पाहतां॥ ८३॥
जग अवघेंमिथ्या सत्यब्रह्म एक । ऐसा ज्याविवेक तोचिमुक्त॥ ८४॥
तरी आतां राया तुझेंरूप कोण । पाहें विचारूनी आपुले ठायीं ८५
अहंकार साक्षी तूंचि आत्माराम । येरसांडी नाम रूपमिथ्या ॥ ८६॥
अस्थिमासादिक पंचविसमिळाले । तयाचें निर्मिलें शरीर हें ॥ ८७ ॥
बुद्धीवृत्ति बाह्यकारणद्वारा निघे । विषय घेऊं लागे जागृतीतें॥ ८८॥
स्थूलाचा व्यापार तुजनाहींस्पर्शला । अभिमानें मानिला तेंचिविश्व ८९

पुढें सूक्ष्म देह तुजहून भिन्न । अवस्थाही स्वप्न तया असे ॥९०॥
जागृतीच्या ठायीं होता अहंकार । तो आला साचार स्वप्नामाजी९१
परी विश्वनाम गेलें त्याचें असें । तैजस आलेसें नाम तया ॥९२॥
स्वप्नाचा अभिमान वाहे अहंकार । आत्मानिर्विकार साक्षीरूप॥९३॥
बुद्धिवृत्तीलय होतसे सुषुप्ती । कारण ह्मणती त्या अज्ञाना ॥९४॥
व्यापार निमतां त्या नाव सुषुप्ती । अवस्था निश्चिती तुजकेवीं॥९५।
नेणविचा घेत अभिमान बळें। तो प्राज्ञ उफाळे भास मिथ्या॥९६॥
तूं तरी जाणसी तया नेणपणा । तोचि तो आपणा वोळखिगा९७
तोचि तूं जाणतां स्वप्न जागृतीसी । परी तूं असती एक रूप॥९८॥
तिन्ही अभिमान निःशेषजैंजाती । तेव्हांहोय मुक्ती वेदह्मणे ॥९९॥
अगारामराया राजशिखिध्वज । कुंभक त्या बीज बोधितसे।१००।
प्रतिदिनी येणें रीति बोध करित । एकत्र वर्तत उभयतां ॥ १ ॥
एकत्र आहार एकाचि आसन । एकेठायीं शयन उभयतांशी ॥२॥
स्नानपान आदिजितुके व्यापार । करिती विहार एकत्रची ॥ ३ ॥
परिदिननिशीं प्रश्नप्रश्नोत्तर । करीती साचार ब्रह्मचर्चा ॥ ४ ॥
पिंडज्ञान आणि तत्वज्ञान कैसें । विवेचन जैसें निरोपित ॥ ५ ॥
पंचकोश देहत्रय निरोपण । त्रिपदें विवरण सप्रतीत ॥ ६ ॥
सांख्याचा सिद्धांत योगाचा सिद्धांत । प्रतिती वेदांत बोधक्रिया ७
असो ऐसे साहामास त्या लोटले । येणें रीति चाले विवादन ॥८॥
एकोदिनीं राजा कुंभका विनंती । करितसे प्रीति नम्रपणें ॥ ९ ॥
अहोजी दयाळा ब्रह्मात्मा अभेद । परोक्ष विशद मज कळला॥१०॥
अहंकाराचेंरूप अस्वस्थेचेंरूप । कळलें परिअल्प उणें नोहे ॥११॥
जडाचिये ठायीं सद्रूप व्यापलें । स्वामीकृपें आलें निश्चयासी॥१२॥
रज्जुचिये ठायीं सर्प नाहीं झाला । तेंवि या जगाला रूप नाहीं १३
मनादिकतत्वें अथवा जंगमे । सचित् असती नेमें रूपें दोन्ही १४
ऐसे माझे बुद्धी सतचित्दोन्ही । स्वामीकृपें करूनी कळो आलें॥१५॥

परी सुखदुःखाविण जो आनंद । केवळ निर्द्वंद्व असे कैसा ॥१६॥
अहंकारमिथ्या ऐसा कळूं आला । परी नाहीं नासीला अद्यापीही १७
सविकल्पवृत्ती मुरोनी सकळ । न बाणे केवळ निर्विकल्प ॥ १८॥
तरी स्वामी मज आनंद कल्होळीं । लोटावें सुकाळीं परमानंदें॥१९॥
जेथें द्वैतवार्ता नसे निपटून । अंतःकरण लीन जेथें होत ॥ २० ॥
तिहीं अवस्थेचा जेथें नाहीं स्पर्श । तेचि अविनाश होऊन रहावें॥ २१॥
ऐसें प्रार्थुनिया चरण वंदीत । वारंवार करित प्रदक्षिणा ॥ २२ ॥
ऐसा प्रश्न राजियाचा तो ऐकुनी । बहु बरें ह्मणुनी सरसावला॥ २३॥
अगा राया तुज शब्दज्ञान झालें । परि नाहीं बाणलें अनुभव झाला २४
व्यतिरेक कैसा नाहीं ठसावला । व्यापारीं कळला साक्षी मात्र॥ २५॥
उपाधी वेगळा लयाचा देखणा । तो तुझ्या अनुमाना आला नाहीं २६
तरी-ऐकें आतां सावधान अति । मेळवुं निश्चितीं निर्विकल्पीं॥ २७॥
अगा शिखिध्वजा दृश्यासांडीं परतें । दृष्टीसी अतीते नेईं मागें॥ २८॥
रूपावरील दृष्टी रूपासी सांडोनी । घाली परतोनी दृष्टी मार्जी २९
श्रोत्राची जे वृत्ती शब्दासी सांडोनी । घाली परतोनी दृष्टीमार्जी ३०
स्पर्शाची जे वृत्ती स्पर्शासी सांडोनी । घाली परतोनी० ॥ ३१ ॥
रसनेची वृत्ती रसातें सांडोनी । घाली परतोनी दृष्टी० ॥ ३२ ॥
घ्राणाची जे वृत्ती गंधासी सांडोनी । घाली परतोनी० ॥ ३३ ॥
कर्मेंद्रिय वृत्ती क्रियेतें सांडोनी । घाली परतोनी दृष्टी० ॥ ३४ ॥
एकचि ते वृत्ती इंद्रियांचे द्वारें । ते न्यावी माघारें हृदयाकाशीं। ३५।
वृत्तीमार्जी जें का कळणें स्फुरत । तेथें दृष्टी त्वरित घालीं वेगीं॥ ३६॥
संकल्पाचे बुडीं दृष्टी हे घालितां । रमसी अखंडीतां आत्मरूपीं ३७
तेणें नेत्रपातीं उगेस्तब्ध होती । प्राणाची हे गती स्थिर होय॥ ३८॥
सहज कुंभक होत असे राया । दृश्य वृत्ती तया ठायीं मिळती॥ ३९॥
तितुकें स्फुरण उठतां जाणणें । सविकल्प लक्षणें समाधी ते ॥४०॥
तेही वृत्ती स्वरूपाकाशीं जी मिळे । निर्विकल्प सोहळे भोगिसी तूं।४१।

वृत्तीचें माघारीं सुख जेव्हां फिरे । तेव्हां अविष्कारें ब्रह्मानंद ॥४२॥
आनंदाचे प्रतिबिंब पडे मध्यवृत्ती । तयासी ह्मणती वासनानंद॥४३॥
जागृतीचा अंत सुषुप्तीनपरती । तयासी ह्मणती वासनानंद ॥४४॥
वृत्तीची समाधी दुजी न उत्पत्ती । तयासी ह्मणती वासनानंद ॥४५॥
ऐसा वासनानंद अनुभवीं अंतरीं । सविकल्पाची परी जाणतेची॥४६॥
सुषुप्तीच्या ठायीं वृत्ती समूळ हरे । ब्रह्मानंद बारे बोलिजे त्या॥४७॥
तोचि निर्विकल्प समाधी बोलिजे । सुख एक सहजें वृत्ती विना ॥४८॥
ऐसा हा अभ्यास होतां वारंवार । सविकल्पद्वारें निर्विकल्प ॥४९॥
आणिक तेथील सांगतों पर्याय । तोहि यथान्याय अवधारिजे ॥५०॥
जे जे तये ठायीं शब्द आठविती । वैखरी निश्चिती वोळखावी ॥५१॥
तया शब्दाचें जें वारंवार स्मरण । तें होय लक्षण मध्यमेचें ॥५२॥
चिंतना वांचुनी जो का स्फुरे भास । पश्यंती तयेंस बोलिजेंती॥५३॥
उगी आठवण निर्विकल्प होय । परावाचा तिये ह्मणी जेते ॥५४॥
पराही पश्यंती मध्यमादि तिन्ही । वैखरीचे ठायीं अन्वय असे॥५५॥
परापश्यंतीचा मध्यमीं अन्वय । वैखरी न होय तया ठायीं ॥५६॥
मध्यमावैखरी नाहीं पश्यंतींत । परानें वर्तन अन्यरूपें ॥ ५७ ॥
परेचिया ठायीं अभावतीहींचा । अन्वय व्यतिरेकाचा प्रकार हा॥५८॥
जो जो दृश्यभास इंद्रियांच्याध्यासें । ते जागृती असे ओळखिती॥५९॥
आकाराचा उठे कांहींसा अभिमान । विश्वअभिमान तया आले ॥६०॥
चंचळपणाचा होत असे भास । स्वप्न अवस्थेस वोळखावें ॥६१॥
तया चंचळाचा अभिमान वाहे । तेंचि रूप पाहें तैजसाचें ॥६२॥
चंचळा अभावी शून्यदशा होय । ते सुषुप्तीलय वोळखीजे ॥६३॥
या नेणिवेचा अभिमान वाहसी । प्राज्ञ हें तयासी नाम आलें॥६४॥
नेणीव जेझाली जाणतां अवलोकी । स्मरे एकाएकी चंचळ होता॥६५॥
जाणिलें नसतां आठवण घडे । या हेतु उघडे ज्ञानाचित्तें ॥ ६६ ॥
तया जाणिवेसी तुर्या बोलिजेत । अहं स्फूर्ति होत प्रत्यगात्मा॥६७॥

तोहि अभिमान स्वरूपींच थारे । निर्विकार उरे तो तूं आत्मा ॥६८॥
चंचळ अज्ञान तिसरें तें ज्ञान। जागृतीसी भान अन्वयरूपीं ॥६९॥
चंचळाचे ठायीं जागृती लोपली । ज्ञानाज्ञान झाली व्याप्ती असे॥७०॥
चंचळ जागृती न दिसती सुषुप्ती । परि असे व्याप्ती ज्ञानाचीते ।७१।
जागृती चंचळ अज्ञान तिहींचा । व्यतिरेकसाचा ज्ञानामाजीं ७२ ॥
निखळ तुझ्याठायीं ज्ञानस्फूर्ति आटे । द्वैताद्वैत तुटे तोचि तूंगा ॥७३॥
तिहीं अवस्थेसी आस्तिभाती प्रिय । हाचिगा अन्वय वोळखावा ७४
केवळ निजरूपीं अवस्था अभिमान । आटती संपूर्ण व्यतिरेकहा॥७५॥
ऐसा हा अन्वय आणि व्यतिरेक । पाहसी कौतुक आंत जरी ॥७६॥
तरी या अभ्यासास विकल्प ह्मणावें । येणोंचि पावावें निर्विकल्प॥७७॥
अभ्यास करितां विघ्नें होत असतीं । त्यागी तया प्रति जाणानीया ७८
वारंवार स्फूर्ति दृश्याकडे धांवे। तें रूप जाणावें विक्षेपाचें ॥७९॥
तया दृश्यालागी मिथ्यत्वें विदारी । पाहे निर्विकारीं अस्तित्वादि ।८०।
विक्षेपाचें रूप निःशेष निमतां । त्यापुढें तत्वतां लय होय ॥८१॥
झोंपची व्यापावी शून्यदशाव्हावी । लयाची जाणावी स्वरूपस्थिति ८२
निज रूपाची गोडी अत्यंत घेईजे । तेणोंचि नासीजे लया लागीं॥८३॥
मिथ्या विदारुनी अभिन्नाचि व्हावें । तयेसी ह्मणावें सुलीनता ॥८४॥
तयापुढें विघ्न असे कषायाचें । दिसावें तें साचें हिरवें पिवळें ॥८५॥
तेंही विवेकानें वमनप्राय सांडीं । त्यापुढें परवडी रसास्वादु ॥८६॥
वाउगा वृत्तीसी ब्रह्मानंददाटे । होवोनी वोहटे तोहि मिथ्या ॥८७॥
हाचि बापा असे समाधी सोहळा । घेई अवलीळा अभ्यासानें ॥८८॥
सांगितल्या रीती अभ्यास रायानें । करोनी पुसणें गोष्टी एक ॥८९॥
अहो महाराजा सविकल्पामाजीं । येतसे सहजीं स्वानुभव ॥ ९० ॥
परि निर्विकल्प न स्थिरे अंतरीं । उफाळते वरी सविकल्प ॥९१॥
तरी यासी मज उपाय सांगावा । जेणें स्वात्मठेवा अखंडीत ॥९२॥
ऐसें ऐकतांचि कुंभक बोलत । वृत्तीसवें येत राया कैसा ॥ ९३ ॥

वृत्तीचा तरंग वरिच्यावरि सांडी । खालीं मारी उडी स्वानुभवें ९४
पाणियाचा तळ धरीजेत जेवी । वृत्तीसवे तेवी येऊं नको ॥ ९५ ॥
ऐसें ऐकुनिया राजाशिखिध्वज । घेतसे सहज समाधीतो ॥ ९६ ॥
चारी अवस्थेसी चारिहीवाचेसीं ॥ चारीही विभ्रासींसांडियेलें ।९७।
वृत्तीसी सांडूनी शून्यवोलांडूनी । पावला निर्वाणीं स्वस्वरूपेंसी ९८
जये ठायीं वेद मौनातें पावत । तये ठायीं होत लीन राजा ॥९९॥
अगा रामराया ऐकें सावधान । निर्विकल्पींलीन राजा झाला२१००
स्फूर्तीचियाबुडीं आत्मत्वीं समरसे । वृत्तींचेंही पिसें हारपलें ॥ १ ॥
पंचप्राण तेही उगे स्थिरावले । तेव्हां कारण झालें झोंपेपरी ॥२॥
देह काष्ठवत वायुही न वाहे । ऐसी दशा पाहे कुंभक तो ॥ ३ ॥
वाहवा ह्मणोनी टाळिया पिटीत । आनंदें नाचत ब्रह्मानंदें ॥ ४ ॥
गुरुरायें माझी प्रतिज्ञा सिद्धीतें । आठवी मुनीतें नेली ह्मणोनि ॥५॥
असो ब्रह्मानंदीं राजा सुखी झाला । सर्व कष्टा झाला परिहार॥६॥
आतां या सुखाची गोडी चिरकाळ । राजिया केवळ घेऊं द्यावी॥७॥
स्वतां यासी जेव्हां होईल उत्थान । पूर्ण समाधान तेव्हां देऊं॥८॥
आलाचिया समयीं रायानुठवावें । राज्य अवलोकावें तात्काळाचि ।९।
तटस्थावस्था हें तो नोहे ज्ञान । पुढें तीं लक्षणें असतीं ऐके ॥१०॥
असो राजयासी तैसेंचि ठेविलें । प्रयाण मांडिलें चूडालेनें ॥११॥
मागुती विचारी आपणतरी जातां । श्वापदादि पाहतां पीडा करिती१२
यास्तव रायाच्या सभोंवती रेखा । वोढी पिप्पालिका माजी नये ।१३।
वस्त्र आच्छादन करूनी वरूनी । आली शीघ्रगती खोली माजी॥१४॥
कपाटें उघडूनी आली बाह्यदेशीं । प्रधानादिकाशीं पाचारीत ॥१५॥
पूर्वदिनीहुनी झाला जो वृत्तांत । प्रधान सांगत कर जोडूनी ॥१६॥
पुढें राज्यभार स्वताचि चालवी । प्रजाही पाळावी यथान्यायें॥१७॥
ऐशीं तीन षट्कमास लोटियेले । रायाचें घेतलें दरुशन ॥ १८ ॥
नंतर विचारी ह्मणे आतां जावें । रायासी भेटावें येचिकाळें ॥१९॥

उत्थान पावला किंवा तैसा असे । समाधान कैसें पाहुं त्याचें ॥ २० ॥
प्रधाना पुसोनी खोलींत बैसली । मनोवेगें आली तयावर्नी ॥ २१ ॥
गुप्तरुपें आधीं गुंफेमाजी पाहे । पूर्ववत आहे बैसलाची ॥ २२ ॥
ह्मणे राजा नाहीं पावला उत्थान । कैसें अंतःकरण लीन झालें ॥ २३ ॥
मग सन्निधान येऊनी त्वरित । पाठी थापटीत राजियाची ॥ २४ ॥
हालवीबहुवेळ आणि हाकमारी । परि राजा निर्धारी सावधनोहे ॥ २५ ॥
ह्मणे मागिलया आठवचि नाहीं । व्यापारासी पाही नये राजा ॥ २६ ॥
भागलिया ढोरा निवांत मिळे थारा । नुठेचिमाघारा तेथुनिया ॥ २७ ॥
तेवि राजयाचें मन बहु श्रमलें । सुखीं प्रवेशलें नफिरें आतां ॥ २८ ॥
गायनाच्या कळा रागउपराग । दावितसे अंग मधुरस्वरें ॥ २९ ॥
अथवा सुस्वरवाद्यें वाजवीत । परि राजा नयेत जागृतीसी ॥ ३० ॥
अगा शिखिध्वजा हाकाही मारीत । परि राजा नयेत जागृतीसी ३१
तेव्हांते चुडाला विस्मय पावली । ह्मणे काय झाली गती राया ॥ ३२ ॥
देह त्यागुनीया राजराजेश्वर । पावले बिढार निजधाम ॥ ३३ ॥
तरी आपणही कासया रहावें । त्यागूनिया जावें देह हाही ॥ ३४ ॥
मागुती मनांत आपुले विचारी । प्रवेशुं अंतरीं आधी याचें ॥ ३५ ॥
कांहींसे जिवन असतां सावध करूं । नसतां त्याग करूं देह आपुला ३६
मग चुडालेनें सुक्ष्मरूप धरुनी । लीन अंतःकरणीं प्रवेशली ॥ ३७ ॥
बालाग्र सहस्र विभागुनी आहे । तितुकें जिवन पाहे देखियेलें ॥ ३८ ॥
तितुकें पाहुनी सुषुप्ती हालवी । तेणें स्फूर्ती व्हावी राजियासी ॥ ३९ ॥
इतुकें करूनी बाहेरी येऊनी । कुंभक होऊनी गात असे ॥ ४० ॥
रागरंगाक्रिया देवासी मोहक । ऐसा तो कुंभक गात असे ॥ ४१ ॥
तोचि अंतःकरणीं अकस्मातशब्द । पडतां सावध राजा होय ॥ ४२ ॥
अहंस्फूर्ती होतां मनादि प्रगटलें । इंद्रिय चेईलें प्राणुचळे ॥ ४३ ॥
इंद्रियांच्या वृत्ती गोलकासी आल्या । वाहुंही लागल्या नाड्या मंद ४४
परि नुघडतीं पक्षही नेत्राचें । सर्वही देहाचें काष्ठ झालें ॥ ४५ ॥

बहु नेटें रायें डोळे उघडीले । सन्मुख देखिलें गुरुराया ॥ ४६ ॥
धांऊनी वंदावे प्रेमें गुरुचरण । तों देहा चळण नोव्हे राया॥४७॥
तेव्हां कुंभकानें आपुला सुपाणी । सर्व गात्रा वरुनी फिरवीला॥४८॥
तेणें सर्व गात्रीं पुष्टता भरली । चलन शक्ती आली पूर्व रीति ४९
मग उठोनिया चरण वंदीले । दोन्हीही प्रक्षाळिले नेत्रोदकें ॥५०॥
तेव्हां कुंभकानें राया उठवुनी । थोर कळवळोनी आलिंगीलें॥५१॥
बापा तुझा मनोरथ पूर्ण झाला । किंवा नाहीं वहिला सांगें मज५२
तुझें सुख तुज अनुभवासी आलें। प्रयत्नाचें झालें सार्थकराया॥५३॥
शिखिध्वज ह्मणें धन्य गुरुराया । मेळविलें तया सुखालागी॥५४॥
कर्दमीचा मीन सोडिला सागरीं । मन स्वरूपावरी सोडियेलें ।५५।
कायउतराई व्हावेंम्यास्वामीसी। पादुका चरणासी शरीराच्या॥५६॥
कल्पनेचें मूळ जगाचें कारण । तेथें ज्ञानाज्ञान मावळती ॥ ५७ ॥
जेथें वाणी फिरे मन मुरडत । स्वयें पांगुळत विचारही ॥ ५८ ॥
ऐसीया सुखासी मेळविलें मज । धन्य झालों आज कृतकृत्य॥५९॥
तया सुखामाजी होतों मी निमग्न । झालों एकक्षण सुखरूप॥६०॥
इतुक्यामध्यें स्वामीमज उठविलें। दुकाळियाबोढिलें पात्रावरूनी॥६१॥
तेथें चिरकाळ असावें हा हेतु । काढिलें क्षणांत बोढोनिया ॥६२॥
तरी आतां स्वामी मज ऐसें करा । न यावें माघाराव्यापारासी।६३।
हिऱ्यासी सांडोनी कोण गारा वेंची। कृत्रीम सुखाची दशातेवी॥६४॥
सिद्धान्न टाकुनी भिक्षाकांमागावी। उठाउठी तेवी व्यापाराची।६५।
आतां निर्विकल्प सर्वदां असावें । उत्थानासी यावें कासयासी॥६६॥
तुज ऐसा रामा राजा शिखिध्वज। थांयाघेत सहज समाधीचा।६७।
तरी अवधारी आतां तो कुंभक । निश्चय आत्मक बोधकारी ।६८।
अगाराया तुंवा मिथ्या सांडोनिया । पावलासी तयासत्यालागी ६९
तरी पुसेनतें सांगें मज प्रती । निवडुनी निश्चिती विचारानें ॥७०॥
आत्म्यासी निश्चळ आजी नवें केलें। कीं असें पाहिलें निर्विकल्प७१

नूतन निश्चळ आत्माऽयाला ह्मणसी । विरोध तुजसी नकळेहा ॥ ७२ ॥
पूर्वीं जो चंचळनिश्चळकैसा होय । कल्पनातेकाय नूतनत्वाची ॥ ७३ ॥
पूर्वीं जो निश्चळ चंचळ नव्हे कदा । तयासी आपदाकोठें आहे ७४
पूर्वीं जो निश्चळ निश्चळ न ह्मणे करा । हें पाहे अंतरा विचारोनी ७५
तथापि तूं ह्मणसी मीयानिर्विकारीं । जिवांतअंतरींनिश्चळव्हावें ॥ ७६ ॥
तरि हा अहंकार चंचळस्वभावें । हाचि आत्मानोव्हे ओळखीचा ॥ ७७ ।
वेगळा होऊनी ब्रह्म पावूंजासी । तरी कल्पांतेसी ब्रह्मनोव्हे ॥ ७८ ॥
तेंचितुं निजांगें अखंड असती । वोळखी तयासी ज्ञानद्वारां ॥ ७९ ॥
तेंचि आंगें असतां पडिलें विस्मरण । बंधासीकारण अज्ञान तें ॥ ८० ॥
आपण असंग यथार्थ कळलें । हेंचि ज्ञान झालें मोक्षरूप ॥ ८१ ॥
अहंकारापासूनी जींजींतत्त्वेंहोती । मिथ्यत्वेंउमटतीं आत्म्यावरी ॥ ८२ ॥
मिथ्या ह्मणजे नाहीं कवणे काळीं झालें । सर्प उमटले रज्जुवरी ८३
दिवालावूनीया रज्जुत्व कळावें । सर्पा मारूं जावें कोण काज ॥ ८४ ॥
तेवि अहंकारादि मिथ्यत्वें जाणावें । निपटूनी मारावें कासयासी ॥ ८५ ॥
आपण आत्मारामआदि अंतीजैसा । व्यापारांत तैसा असंगची ८६
ऐसे वोळखावें याचें नांव ज्ञान । समाधी उत्थान तेथें कोठें ॥ ८७ ॥
निश्चयेसी ज्ञान मोक्षासी कारण । तया साह्य कवण असे राया । ८८ ।
क्रिया कांहीं मोक्षालागी दातीनोहे । ज्ञानादेव आहे मोक्षा हेतू । ८९ ।
अहंकारादि जावें आत्मत्वसाधावें । हें तोंकरणेंव्हावेंक्रियारूप ॥ ९० ॥
ऐसीया क्रियेनें ब्रह्मप्राप्ति जरी । मग ज्ञान तरी कासयासी ॥ ९१ ॥
ज्ञानदेव ऐसें श्रुतीचें वचन । तया आला जाण विरोधकीं ॥ ९२ ॥
तस्मात तूं राया पाहें विचारूनी. । आत्माकींत्याहुनीभिन्नअससी । ९३ ।
आत्मा तूं निजांगें अससी जरी खरा । तरी पाहेविचारा असंगतुं ९४ ।
जरि तूं अहंकाराआपणा मानीसी । तरी केवी पावसीसमाधीतें । ९५ ।
आत्मत्वाचे ठायीं नाहींच उत्थान । समाधी उत्पन्न कैसी तेथें ॥ ९६ ॥
तरी आतां तुंवा आपणाजाणावें । भिन्न तें तें पाहावें मिथ्या अवघें । ९७ ।

ग्रंथ ... २८८४ ... ३७३

जळावरी लहरी जठतांजळासी । क्षिणतायेत कैसी सांगेराया ।९८।
तैसें तुझ्या ठायीं माईकसकळ । होतां तूं निश्चळ वेदबोले ॥९९॥
आगा शिखिध्वजा सावधान व्हावें । रूपतें ऐकावें अन्वयाचें१३००
घटांत मृत्तिका आलंकारी सोनें । सर्वांमाजींपूर्ण तेवि आत्मा ॥१॥
आकार तें रूप बोळखीसी नाम । ठेविलें परिहेम सदोदित ॥ २ ॥
तेवितत्त्वेंसारीं नामरूपा आलीं । परिनाहीं जन्मलीं अद्यापिही ॥३॥
स्थाणुवरी पुरुषकीं शिंपीरजत । भुजंग भासत दोरीवरी ॥ ४ ॥
भ्रमेंचि भाविलें तें तें कायखरें । तैसें दृश्यसारें असुनी नाहीं ॥५॥
नाहींतया कैसें सांडुंमांडु पहासी । विचारमनासी करितां बरें ॥६॥
प्रथमव्यतिरेक करून पहावें । आत्मज्ञान व्हावें ह्मणोनियां ॥ ७ ॥
घटादि सांडूनीमृत्तिका जाणावी । व्यतिरेकें पहावी स्वरूपखूण॥८॥
मृत्तिकाजाणतां घट तेथें नाहीं । तेवि सर्व नाहीं आत्मरूपीं ॥९ ॥
नामरूपमात्र भासलें तें गेलें । तरि तेथें सांडिलें कायराया ॥१०॥
अलंकार कैंचे एकचि सुवर्ण । सर्व नाहीं पूर्ण एकआत्मा ॥ ११ ॥
तळींवरी आत्मा अंतरबाह्यआत्मा । अष्टदिशाआत्मा ओळखावा १२
दिसेतोही आत्मा भासेतोही आत्मा । सर्वीं एक आत्मा नामेंविण१३
आकाराच्यामुळें अंतर्बाह्यनेम । नाहीं तरीनाम असे कोठें ॥१४॥
सुवर्णाचा गर्भ त्वचा बाह्य देशी । परि ते एक राशी सुवर्णाचि १५
तेवीं आंतभास दृश्य हें बाहेरी । परितो निर्विकारी एक आत्मा १६
सूर्याकरितां दिशा सर्व कल्पिजेति । त्याविण याप्रती काय सांगे १७
पृथ्वीचें चडळ मध्यचि भासलें । यास्तव कल्पिलें अधऊर्ध्व ।१८।
पृथ्वीच्या अभावीं जळीं ना ऊपरीं । तेवि निर्विकारी पूर्ण आत्मा१९
प्रवृत्ति निवृत्ति वाउगी भासली। एकाचि संचली आत्मास्थिति॥२०॥
प्रलयांबूचेनीरीं ओघ सर्व नासे । आत्मत्वीं न दिसे प्रवृत्यादि।२१।
एकरूपआत्मा असे परिपूर्ण । नामरूप आत आले नको ॥ २२ ॥
मिथ्याच त्यागणें येणें रीती असे ।नामरूपापैसें नव्हे कदा।२३।

३०५२

आत्मया साधावें नलगे साधनें । विचारें ओळखणें आहे तैसा २४
तरी आतां राया आत्माचिपरिपूर्ण । निश्चये आपण दृढ करी ।२५।
सर्वनामरूप उभसूची नेदि । पूर्ण परमानंदीं समरसें ॥ २६ ॥
सांडूमांडू पाहसी इतुकेचि सांडीं । एकरसीं बुडी देई आतां ।२७।
दृश्यद्रष्टाभाव समूळची सांडीं । एकरसीं बुडी देई आतां ॥ २८ ॥
साक्षसाक्षीभाव समूळची सांडीं । एकरसीं बुडी देई आतां ॥२९॥
ज्ञेयज्ञातृत्वेंसी ज्ञान हें गा सांडीं । एकरसीं बुडी देई आतां ॥३०॥
ध्येय ध्यातृत्वेसी ध्यान हें गा सांडीं । एकरसीं बुडी देई आतां३१
साध्यसाधकेंसी साधन हें सांडीं । एकरसीं बुडी देई आतां । ३२ ।
निवृत्तींत जैसा असर्सी परीपूर्ण । प्रवृत्तींत जाण जैसाचि तूं ।३३।
स्मरणकाळीं जैसा अससी परिपूर्ण । विस्मरणींजाण तैसाचि तूं ३४
समाधीशी जैसा अससी परीपूर्ण । उत्थानी हा जाण तैसाचि तूं३५
सुषुप्तीचिये ठायीं जैसा परिपूर्ण । जागरस्वप्नींजाण तैसाचि तूं ३६
निर्व्यापारस्थानीं जैसा परिपूर्ण । व्यापारीही जाण तैसाचि तूं ३७
निर्विकल्पकाळीं अससी परिपूर्ण । सविकल्पीं जाण तैसाचि तूं।३८।
नेत्रझांकितांही अससी परिपूर्ण । उघडितां जाण तैसाचि तूं ।३९।
असो आतां तूंचि अससीतुजमाजीं । होणेंजाणेंसहजीं तूजकैंचें ४०
बोलणें खुंटलें मौन हरपलें । उपरी संचलें रूप तुझें ॥ ४१ ॥
ऐसी कुंभकाची सिद्धांतवचनें । राजास्तब्ध होणें ऐकतांचि ॥४२॥
एकआत्मापूर्ण नामरूप नाहीं । पूर्णबोध पाहीं ठसला असे ॥४३॥
आतमत्व साधाया कासया साधन । आधींच परिपूर्ण कोंदाटलें ४४
मिथ्याजावयासी कासया साधन । आधींच संपूर्ण झालेंनाहीं ४५
काय मी कष्टलों नेणोनि बापुडा । आत्माधडफुडा असता सर्व ४६
धन्यगुरुराया कृपा मज केली । माझी मजदाविली आत्मस्थिती ४७
धन्यमहामुनी धन्य ते चुडाल । त्यांचे आतां बोल सत्य झाले ४८
आपुलया प्रसादें सुखरूप झालों । बोधोनी काढिलों दुःखांतूनी ४९

जयजयकारें स्तवी चरणीं लोळत । वारंवार करित प्रदक्षिणा ।५०।
कुंभक हर्षूनी दिलें आलिंगन । पावली कीं खुण तुझीतुज ॥५१॥
अगा शिखिध्वजातुझें समाधान । व्हावें आमुचें मन इच्छित होतें ५२
आह्मांसही आतां अतिहर्ष झाला। तुझा तुज बाणला प्रत्यय हा ५३
ब्रह्मआत्मा असे परिपूर्ण अभेद । या नांवें विशद शास्त्रप्रतिती ५४
तत्वमसीवाक्य गुरुउपदेशीती । हे गुरुप्रतिती वोळखावी ॥ ५५ ॥
आपण असंग ब्रह्मनिःसंशय । आत्मप्रतिती होय समाधान॥५६॥
तयासी अपरोक्ष ह्मणती पारदर्शी । उत्थानजयासी नव्हेकदां ।५७।
तुज अपरोक्षाचाप्रत्यय बाणला । परि दृढ झाला नाहीं बोध।५८।
आतां ह्मणसी माझें झालें समाधान । व्यापारें उत्थान होईल तुज५९
पूर्णसमाधान या नांव समाधी । उत्थानची कधीं जेथें नोहे ।६०।
समाधीउत्थान दोहींचें लक्षण । तेंचि सावधान ऐकें सांगू ॥ ६१ ॥
हालवूनी खुंटा बळकट करावा । प्रकार जाणावा तेविंच हा॥६२॥
कल्पना सांडोनी बैसला निवांत । समाधी निभ्रांत तोही नोहे ६३
घुंघुट घेऊनी नेत्र जो झांकीत । समाधी निभ्रांत तोही नोहे ।६४।
ब्रह्मांडीं नेऊनी वायु जो कोंडीत । समाधीनिभ्रांततोहीनोहे ।६५।
मौन मुद्रादीक नानाछंद करीत । समाधीनिभ्रांत तोहीनोहे । ६६ ।
उगा पडे जरी जड काष्ठवत । समाधिनिभ्रांत तोही नोहे ॥६७॥
तरी पूर्ण समाधान ते समाधी । तेंचि कैसें आधीं बोलिजेल॥६८॥
त्रिविधा प्रतीती परिपूर्ण आपण । तेंचि समाधान समाधी तो ६९
आदी अंतीं जैसा मध्यें तैसा पूर्ण । तेंचि समाधान समाधी तो ७०
सर्वही असतां असंग आपण । तेंचि समाधान समाधी तो ॥७१॥
जागर सुषुप्ती स्वप्न एकरूप पाहणें । तेंचि समाधान समाधी तो ७२
होताही व्यापार नाढळे आपण । तेंचि समाधान समाधी तो ॥७३॥
पापपुण्यामाजीं असे जो समान । तेंचि समाधान समाधी तो ।७४।
करो न करो जैसा तैसाचि परिपूर्ण । तेंचि समाधान समाधी तो७५

प्राप्ताप्राप्त भोग दोन्हीही समान । तेंचि समाधान समाधी तो।७६।
त्रिपुटीचें जेथें नोहे उद्भवन । तेंचि समाधान समाधी तो ॥ ७७ ॥
राहो जावो देहो परिपूर्ण आपण । तेंचि समाधान समाधी तो ७८
भलते अवस्थेसी निःसंग आपण। तेंचि समाधान समाधी तो।७९।
एवं समाधीचें कांहींसें लक्षण । केलेंचि कथन जीवीं धरी ॥८०॥
आतां उत्थानाचें रूप तें बोलिजे । तेणें रीती समजे अंतर्यामीं ८१
असंगमी परी व्यापार रहावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ॥८२॥
वृत्तीही मुरोनी निर्विकल्प व्हावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ।८३।
आत्मा सुखीपरी सुखदुःख न व्हावें। हें रूप जाणावें उत्थानाचें८४
असंग असोनी सर्व संग जावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ॥८५॥
समाधीसी सुख व्यापारीं तें नोहे । हें रूप जाणावें उत्थानाचें ८६
असत्य हें खरें परी सर्व जावें । हें रूप जाणावें उत्थानाचें । ८७।
मिथ्या असोनिया सत्यत्व कल्पावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ८८
नामरूपालागीं मनें आठवावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ॥८९॥
अभेदाचे ठायीं भेदचि वाटावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ॥९०॥
तूं एक मी एक उंचनीच पहावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ।९१।
हा स्वर्ग हा नरक वाईट बरें फावें। हें रूप जाणावें उत्थानाचें।९२।
पुण्य तें चांगुलें पाप न घडावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ।९३।
अकर्ता आपण परि करणें नसावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ९४
अहंकाराचें कार्य आपले माथां घ्यावें। हें रूप जाणावें उत्थानाचें९५
ध्येयासी सांडोनी आंगें ध्याता व्हावें । हें रूप जाणावें उत्थानाचें९६
साध्य असोनीया बळें साधू जावें । हें रूप जाणावें उत्थानाचें ९७
ऐसीया उत्थानें समाधान भंग । नसतां पाठी लागे संदेहची ।९८।
वेद बोलियेला संदेहावांचून । दृढ होय अभिन्न वस्तुतंत्र ॥ ९९ ॥
अगा रामराया समाधीची खुण । आणि तें उत्थान बोलियेलें१४००
हेंचि दृढ व्हावें यास्तव कुंभक । सांगेल कौतुक अभ्यासाचें ॥ १ ॥

तया शिखिध्वजा थापटून ह्मणें । समाधी उत्थानें कळली कीं॥ २॥
तिहीं काळीं कदा उत्थान न व्हावें। यासी अभ्यासावें लागेवृत्ती। ३।
स्वतांची संशय उठती अंतरीं । बोलिजे निर्धारीं स्वतोत्थान ॥४॥
नानाशास्त्रांमाजीं नाना निरूपण। आणि नाना जन विवादती ॥५॥
ऐसे जे सिद्धांत नाना हे ऐकतां । संशयाचि चित्ता उठताती ॥६॥
ययासी ह्मणावें परता उत्थान । झालें समाधान बिघडत ॥ ७ ॥
उत्थान न होतां पर किंवा स्वतः । दृढ अपरोक्षता बोलिजेते ॥८॥
संशयाची माशी जयासी लागली । त्यासी तृप्ती झाली नवचे कदा॥९॥
यास्तव त्रिविधा प्रतीती बाणावी । वृत्तीहि खलावी अभ्यासानें १०
वेदांतप्रमाण तेंचि गुरु मुखें । आत्म प्रतिति चाखे स्वानुभव॥ ११॥
सप्रमाण ज्ञान लाधलें असतां । तयासी तत्वता नाश नाहीं॥ १२ ॥
वेदांता परतें प्रमाण कोणतें । यास्तव नाशिजे तें ज्ञान कैंचें॥ १३॥
त्याहीवरी गुरुमुखें दृढ झालें । यावरी चाखिलें अनुभवें ॥ १४ ॥
ऐसें सप्रमाण अपरोक्ष ज्ञान । तयासी उत्थान कैंचें असे ॥ १५॥
तयावरी खलवृत्तीच्या अभ्यासें । होतां कदा नासे ऐसें नाहीं। १६।
तुज राया झाली त्रिविधा प्रतीति। तयावरी निगुती अभ्यासीसी। १७।
तरी तुझें समाधान दृढ होय । यास्तव उपाय अभ्यासी हा ।१८।
स्वतांही उत्थान परतां उत्थान । सत्य सत्य जाण नोहे राया। १९।
सुवर्णी सुगंध आणि रुचि जोडे। मग तया पाडें वस्तु कोण॥ २०॥
ऐसें अपरोक्ष ज्ञान प्राप्त झालें । यावरी खलीलें अभ्यासानें ॥२१॥
औषधी खलीतां गुण अधिकाधीक। तेविंचि कौतुक अभ्यासाचें। २२।
अभ्यास ह्मणशी असेल कठीण । पाहें वोळखून अति सोपा॥ २३॥
मागें तुवां कष्ट न होणें ते केले। तैसें नोहे वहिलें सहजीं सहज॥ २४॥
नलगे एकांत नलगे आसन । आवरावें मन हेंही नको ॥ २५ ॥
नको काळ वेळ नको जप ध्यान। सर्वदां स्मरण मात्र व्हावें ॥ २६॥
जरी राया तुज अभ्यास आवडे । तरी तुझीं कोडें सर्व पुरतीं ॥२७॥

ऐसें कुंभकाचें वचन ऐकोनी । राजा लोळे चरणीं प्रेमें स्फुंदे॥२८॥
अगा महाराजा दिनाचा कळवळा । अप्रार्थित झाला संग दैव॥२९॥
त्याहीवरी केला बोध स्वानूभवें । वरुतें अभ्यासावें आज्ञा करितां३०
पूर्ण तृप्ती व्हावी आपुले लेंकुरा । माता घाली करा घांस जेवीं॥३१॥
जेवीं दृढ समाधान माझें व्हावें । यास्तव बोधावें कळवळोनी॥३२॥
बाळकाचें हित माउली जाणत । तेवि आपुलें चित्त दासावरी॥३३॥
तरी स्वामी सांगा अभ्यास कोणता । कठिणही तत्वतां अभ्यासीन३४
तृप्तीवरीतृप्ती मज करूं पहातां । तरी शरणागता चिंता काय॥३५॥
स्वामीचें वचन आह्मांसी प्रमाण । तरी ते सांगा खुण अभ्यासाची ३६
कुंभकानें ऐसा आदर जाणोनी । अभ्यासा लागोनी निवेदीत॥३७॥
प्रथम राया करीं इतुका अभ्यास । क्षणभरी अवकाश नेदीबुद्धी॥३८॥
जगजीव मिथ्या सत्य आत्माराम । निवडूनी वर्ण जाणीले जों॥३९॥
मिथ्यालागी कदां सत्यत्व न यावें । मिथ्यत्व न यावें कदां सत्या॥४०॥
ऐसें या दोहींचें सदां राखें स्मरण । कदां विस्मरण पडोंनेदी॥४१॥
ब्रह्म तेंचि आत्मा एकाचि अभिन्न । यासी भेदभान नाचि व्हावें॥४२॥
अभिन्नची आहे निश्चय अंतरीं । ह्मणसी कोणेपरी भेद होय॥४३॥
तोंचि ऐकें सांगु भेदस्फूर्ती कैसी । गुप्त होय तिसीं वोळखावें॥४४॥
सुखेंदुःखें माझीं कधीं सरतील । निवांत पावेल सुख कधीं ॥४५॥
प्रवृत्तीसरेल निवृत्ती पावेन । केधवां अभिन्न होईन तया ॥ ४६ ॥
ऐसा भाव जरी अंतरीं उद्भवे । हेंचि गा जाणावें भिन्न पडला॥४७॥
सुखदुःख आणि प्रवृत्ती निवृत्ती । कधीं झाली होती आत्मयासी॥४८॥
तयामाजीं मिळू ऐसें जें वाटलें । परोक्षत्व आलें ब्रह्मालागी ॥ ४९॥
सहज आत्मया अब्रह्मत्व आलें । अभिन्ना भाविलें भिन्नरूप॥५०॥
तेवि जगालागी मिथ्यत्वें पहातां । उद्भवे तत्वतां सत्य बुद्धी ॥५१॥
चांगलें वाईट उत्तम मध्यम । भेदें रूप नाम सत्यत्वेंसी ॥ ५२ ॥
ऐसी हे सूक्ष्म न भावितां स्फूर्ती । होय जरी भ्रांती गेली नाहीं॥५३॥

ऐसें द्वैत भान निपटून जावें । तरी अभ्यासावें दृढतर ॥ ५४ ॥
अभ्यासावांचुनी विक्षेप न जाय । यास्तव उपाय अभ्यासाचा॥५५॥
जें जें दिसे सर्व मिथ्या तयेक्षणीं । पहावें अनुदीनीं निदिध्यासें ५६
आपण ब्रह्मआत्मा एकरूपी असे । माझ्याठायीं नसे दृश्य कांहीं५७
जेविं ब्राह्मणानें अंत्यजपहातां । स्मरे अवचिता मी ब्राह्मण ॥५८॥
गृहस्थाश्रमीं त्याणें संन्यास घेतला । पुढें आठवे त्याला स्त्री पुत्रादि५९
तयेक्षणीं तेणें स्मरावें अंतरीं । मी तो सर्वांपरी त्यागी असें॥६०॥
ऐसिया अभ्यासी दृढबुद्धि होय । स्वप्नींही प्रत्यय मी संन्यासी ६१
तेविं ज्ञानियानें असंग मी पूर्ण । दिसे तें तें जाण मिथ्या असे६२
तैसाचि हा ध्यास जागें होतां क्षणीं । राखावा तेथूनि झोंपेवरी ६३
चिरकाळ हा ध्यास लागतां यापरी । मग स्वप्नांतरीं उठे तेंचि ६४
स्वप्नीचिया दृश्या मिथ्या पाहूंलागे । आत्मामीअभंगेंस्फूर्ती उठे६५
इतुकें झाल्यावरी हा विश्वअभिमानी । मरेतत्क्षणीं तोंवरि असे।६६।
विश्वासी सत्यत्व येतां देह खरा । ह्मणत बापडा तुझें माझें ॥६७॥
हाचि अभिमानी विश्वजातीचा । निमतसे साचा अभ्यासें या॥६८॥
परी स्वप्नामाजी मी मी माझें जावें । भासतां स्फुरावें मिथ्या तधीं६९
आपण असंग पूर्ण आत्माराम । ऐसें होतां नाम विश्वगेलें ॥७०॥
जागृतीसहीत स्थूल वोलांडिला । पुन्हादृश्यत्यालाभास नोहे ॥७१॥
ऐसाहा अभ्यास राजा शिखिध्वज । करितां हें सहज दिननिशीं७२
कदांयाचें विस्मरण पडों नेदी । त्या अभ्यासें बुद्धी दृढ झाली ७३
हाचि निदिध्यास स्वप्नीं उठूं लागे । तयेकाळीं सांगे कुंभकासी ७४
ऐकोनी कुंभक रायासी बोलत । निमाला निश्चित देह तुझा॥७५॥
आतां तो तैजस निमाला पाहिजे । तयालागीं कीजे अभ्यासहा ७६
आधीं त्याचें रूप वोळखून पाहें । जोका उठताहे सूक्ष्मत्वें ॥७७॥
देहाचें वर्तणें पूर्वरूप होय । हर्ष खेदद्वय उठती तेणें ॥ ७८ ॥
पुण्य मार्गीं जरी वर्ते शास्त्ररीती । तयेकाळीं चित्तीं हर्ष वाटे॥७९॥

जरी अन्यथात्वें वर्ततां शरीर । तेणें वारंवार खंतीवाटे ॥ ८० ॥
आपण अकर्ता कळोनिही ऐसें । कर्तृत्व घेतसे हर्ष खेदें ॥ ८१ ॥
आणिक मनादिस्फूर्ती हे उठतां । संकोचत ज्ञाता आपुलें ठायीं ८२
मृगजळापरी मिथ्याही असतां । बळें त्यास त्यांत स्थापितसे।८३।
यया विक्षेपाचें निसंतान व्हावें । तरी अभ्यासावें लागे बापा॥८४॥
अंतःकरणीं ज्ञान शक्ती उठतसे । तेचि निघतसे इंद्रियद्वारां॥८५॥
प्राणइंद्रियादिहेचिक्रियाशक्ती । विषयसाधनहोतीरजोगुणीं ॥ ८६ ॥
शब्दादि विषय द्रव्य शक्ती तम । जें का रूपनाम दशाकारें॥८७॥
सत्वगुणें रजो गुणाचिये द्वारा । पडे भोग्यमात्रा तमोगुणी ॥८८॥
गुणें गुणालागीं आदरें सेविलें । तुझें काय गेलें असंगाचें ॥८९॥
अंतःकरणीं स्फुरो संकल्प विकल्प । बुद्धी आपोआप उठो राहो९०
चित्ताचें चिंतन अहंकाराचें कार्य । होवो जावो काय तुज तेणें ९१
चांगुलें वाईट ज्याचे धर्म तया । आत्मयासी राया काय तेणें।९२।
जळतरंगादि उठती निमती । तेणें जिवनाप्रती हानी कीं लाभ।९३।
तेवि या वृत्तीसी पाहे आपुले ठायीं। त्याचे धर्म कांहीं नये माथा९४
मी तरी असंग अकर्ता परिपूर्ण । अहंकारादि भिन्न मजहुनी॥९५॥
वृत्ती उठोमुरोस्पर्शलीहीनमज । येणे रीतीसमजेअभ्यासहा॥ ९६ ॥
सांगितल्यारीतीराजाअभ्यासीत । मीकर्तानुठतकवणेंकाळीं ॥ ९७ ॥
हर्ष खेद आणि वाईट चांगुलें । निपटुनी गेलें अंतरीचें ॥ ९८ ॥
रायासी कुंभकह्मणेतैजसहा । निमालासेपाहासूक्ष्मासह ॥ ९९ ॥
देहद्वयातीत जो तूं आत्माराम । बोलिला निगम सत्यसत्य॥ १५००॥
वसिष्ठें श्रीराम धरुनीयां करीं । भावें मधुरोत्तरीं बोलताती ॥ १ ॥
शिखिध्वजझाला देह द्वयातीत । अभ्यासें पावत स्वानुभवा ॥ २ ॥
होतांही व्यापार दोन्ही अवस्थेचे । विश्व तैजसाचें नाम गेलें ॥ ३ ॥
यापुढें सरावा प्राज्ञ अभिमान । तेंचि निरूपण कुंभक बोले ॥ ४ ॥
अगा राया तुज अभ्यास बोलिजे । परी आधीं समजें प्राज्ञ कैसा।५।

आपण असंग ध्येयध्यात्याविण । अनुभवीं पूर्ण लय साक्षी ॥६॥
वृत्तीकाळीं कळे वृत्तीचा अभाव । लयसाक्षी अनुभव स्वसुखाचा॥७॥
वृत्ती अभाव चिरकाळ झाला । हाचि कळूं आला कवणालागीं ॥८॥
अनुभविलें तें उत्थानीं कळत । जरी नानुभूत कळे कैसें ॥ ९ ॥
तस्मात् ते ठायीं अनुभव झाला । तोचि त्रिपुटीला उद्भवत ॥१०॥
एक अनुभाव्य अनुभवा येतां । तिचा अनुभविता सहजी होय॥११॥
स्वानुभव कळूं आला तोंचि ज्ञान । ज्ञाता ज्ञेय दोन तेणें केले॥१२॥
जाणिलें असतां तेंचि ज्ञान नोहे । न जाणतांज्ञाहे श्रुति ह्मणे ॥१३॥
असो ऐशी त्रिपुटी होणें जें उत्पन्न । तेंचिमुळाज्ञान बोलिजे तें॥१४॥
ज्ञानाज्ञानेंविण असतां असंग । ज्ञाता झाला अंग भिन्न तया ॥१५॥
तोंचि विस्मरण उद्भवलें साचें । मूळ अज्ञानाचें लक्षण तें ॥ १६ ॥
अभिन्न असोनि भिन्नत्वकल्पना । तया मूळज्ञाना ओळखावें ॥१७॥
स्वानुभव सुख स्फुरत अंतरीं । अभिमान धरी तोचि प्राज्ञ ॥१८॥
ऐसीया प्राज्ञाचें निर्मूल नाहीं झालें। तोंवरी बाणलें नवचे ज्ञान१९
तरी राया करीं अभ्यास अंतरीं। तरी निर्विकारी होसी आंगें॥२०॥
जैसें दृश्यभासा मिथ्यत्वें पाहासी। तेंवि त्रिपुटीसी सत्य नमनीं॥२१॥
ज्ञाता तरी कधीं नाहींच जन्मला। रज्जूवरी झाला सर्प जैसा॥२२॥
ज्ञात्याचे अभावीकवणासी ज्ञान । सहजस्फूर्तिज्ञान मावळलें ॥२३॥
ज्ञान ज्ञात्याभावीं ज्ञेय नामसरे । पुढें कांहीं उरे अनिर्वाच्य ॥२४॥
तेंविंच अनुभाव्य त्रिपुटी निमत । त्यापुढें अद्वैत नामेंविण ॥२५॥
ऐसा वृत्तीविण अभ्यास करितां । शनै अभिमान्यतानिजरूपीं॥२६॥
तेविंच जागृती स्वप्नामाजीपाही। साक्ष्यसाक्षी कांहीं भाऊं नको॥२७॥
तेंवि दृश्यद्रष्टा भाऊं नको भिन्न । साध्य साधकपण तेणें रीति॥२८॥
एक ब्रह्म आत्मा परिपूर्ण उरे । द्वैतभाव विरे त्रिपुटीचें ॥ २९ ॥
ऐसें चिरकाळ अभ्यासीतां स्फूर्ति । ज्ञानाची समाप्ती विज्ञानांत॥ ३०॥
कुंभकाचें वाक्य जेणेंजेणें रीती । शिखिध्वज चित्तीं अभ्यासीत॥३१॥

कांहीं काळीं झाली त्रिपुटीची शांति । ज्ञानेविण ज्ञप्तिमात्र उरे ।३२।
हेंचि समाधान प्राज्ञ मावळता । विज्ञान समता सर्वकाळीं ॥ ३३ ॥
कोणतीही उर्मी नाहीं नाहीं उरली । तृप्तीसी पाजिली तृप्तीरामा॥ ३४॥
ऐशी राजियाची निजतृप्ती पाहुनी । कुंभकाचे मनीं हर्ष दाटे॥ ३५॥
शिखिध्वजालागीं दृढ आलिंगुनी । शाबास ह्मणुनी थापटीत॥ ३६॥
पुत्रालागीं जैसें राज्यपद येतां । हर्षे जेविं पिता तेणेंपरी ॥ ३७ ॥
ह्मणे माझा हेतु सर्व सिद्धी गेला । प्राप्त तुझें तुला समाधान॥ ३८॥
मग उभयतां आसनीं बैसोनी । एकमेकां वचनीं स्तविताती॥ ३९॥
तोचिब्रह्मानंद वर्णी कोण वाचे । जेथें बुद्धी वेंचे विचारेसी ॥ ४०॥
असो ऐसा राजा विज्ञान पावला । पुढें प्रसंग झाला तोचि ऐका ४१
शिखिध्वजा करीं धरूनी कुंभकें । बोलत कौतुकें अति हर्षें ॥ ४२॥
तुझें जैसें समाधान बाणलें जें । तें मुखें बोलिजे सप्रतीत ॥ ४३ ॥
माझिया श्रोत्रासी भूक हे अपार । तरि ते वचनमार्गें निववीगा ४४
तेव्हां शिखिध्वजें साष्टांग करोनी । बद्धांजली वचनीं बोलताहे।४५।
अहो महाराजा मज तृप्त केलें । तेनवचें बोलिलें वैखरीसी ॥ ४६॥
अंतःकरणामाजी अर्थ तितुका असे । तोचि परा ऐसे बोलिजेती ।४७।
तयाचा एकांश पश्यंतींत उमटे । त्याहुनी वोहटे मध्यमेसी ॥ ४८॥
तया कोटीगुणें वैखरीसी नये । तरी सांगू काय स्थिती कैसी॥ ४९॥
तथापी निवेदूं गुरुचरणाशी । ह्मणुनी वेगेसी बोलताहे ॥ ५० ॥
एक आत्मा ब्रह्म परिपूर्ण असे । भेदभान नसे कवणें काळीं॥ ५१॥
उत्पत्ती कीं स्थिती प्रलय जागृती । स्वप्नादि सुषुप्ती सर्वावस्था।५२।
अवस्था ह्या कदां न होती उत्पन्न । जैसा परिपूर्ण तैसा आत्मा ५३
निर्विकारीं विकारचि झाला नाहीं । नामादि सर्वही अहंकारादि ५४
अज्ञानचि नसतां विक्षेप कोठून । तरी होय ज्ञान कवणालागीं ।५५।
बंधमोक्ष शब्द वाउगा आरोप । संकल्प विकल्प नाहीं नाहीं॥ ५६॥
संशय न होतां कैचें समाधान । समाधी उत्थान कोठें आहे ॥ ५७॥

आत्मरूपीं आत्मा नवें नाहीं दिलें । आधींच संचलें जैसें तैसें।५८।
अहंकारादि भ्रममुळीं नाहीं झालें । ज्ञानें तें नाशीलें कवणेपरी ५९
आहों तैसें आहों आप आपणांत । दुजा अनुभवित कोण मज ६०
वाणूं जातां नये अनुभवानये । तेंचि बोलताये कवणेपरी ॥ ६१ ॥
आतां कर्तव्यता कोणती असेना । पावणें आपणा उरलें नाहीं ६२
नाहीं लोकजन नाहीं जन्ममरण । पाप अथवा पुण्य नाहीं नाहीं६३
अमुक निषेध अमुक हा विधी । मज नाहीं कधीं स्पर्शलाचि ।६४।
आतां जावो देहो चिरकाळ राहो । तुटला संदेहो स्वामीकृपें ॥६५॥
जैसें प्रारब्धाचें वर्तणें देहाचें । वर्तो सुखेंवेंचे माझें कृत्य ॥ ६६ ॥
संशयाचा घोट स्वामी भरियेला । पूर्णासी लादला ठावपूर्ण ।६७।
असंगाचा संग तोडियेला स्वामी । मावळली ऊर्मी परिपूर्ण ।६८।
अहो धन्यशास्त्र धन्य गुरुराया । धन्यसुखायया उपमा नाहीं ६९
धन्य नरदेहो धन्य तें साधन । श्रवण मनन धन्य धन्य ॥ ७० ॥
धन्य धन्य ज्ञान धन्य हा सुकाळ । वाचेनें बरळ बोलूं काय ।७१।
ऐसें बोलोनियां चरण वंदित । प्रदक्षिणा करित वारंवार ॥ ७२ ॥
ऐसें राजियाचें पूर्ण समाधान । कुंभकेंजाणुन आलिंगिलें ॥७३॥
रायासी कडिये घेऊनी नाचत । चुंबनही देत वारंवार ॥ ७४ ॥
धन्य धन्य राया राजचूडामणी । केलीसे धुळधानी भवभयाची ७५
आतां तुझा तूंचि गुरु परिपूर्ण । गुरुशिष्य दोन कोठें राया ।७६।
एक आत्मा पूर्ण नामरूपेंविण । पावली कीं खुण तुझी तुज ।७७।
आह्मीं तुझ्यापुढें प्रतिज्ञा जे केली । सर्व सिद्धी गेली अनायासें ७८
आतां तुझें झालों दृढसमाधान । झालेंकीं उत्तीर्ण आह्मी राया ७९
ऐकुनी शिखिध्वजें वचन कुंभकाचें । बोलतसे वाचे करुणोत्तरी ८०
अहो महाराजा मज निरवूनी । संचारा लागुनी जाऊं पाहतां ८१
दिनानिशीं मज सवे लावुनीयां । आतां अंतर पायां पडूं पाहे ८२
मज कैसें कंठे एकटें यावनीं । तरी उपेक्षुनी जाऊं नका ॥ ८३ ॥

अहो स्वामीराया हा देह चरणीं । पडावा अनुदिनी इच्छा माझी ८४
तरी हा प्रसाद अर्पावा दीनासी । अमृतवचनेसी निववावें ॥ ८५॥
ऐसें प्रार्थुनीयां चरणीं लोळत । वारंवार स्तवित बद्धांजुली । ८६ ।
कुंभकें जाणुनी रायाआलिंगीलें । आश्वासन दिधलें ह्मणती नाभी८७
राजा सर्वथाही तुजला सोडून । नचि जाऊं क्षणभरी दुरी ॥ ८८॥
तुजऐसा आत्मा ब्रह्मांड भुवनीं । न देखों नयनीं मित्र दुजा ।८९।
काय आह्मा काज असें तें करावें । सांडूनीया जावें तुजलागी ९०
आह्मासीही तुजवांचुनी कंठेना । अमुच्याही मना आवडी ऐसी ९१
तूंचि आमुचा मित्र तूंचि कुळगोत्र । तूंचि पुत्रकलत्र आणि भर्ता९२
तुजला मी जैसा मजला तूं तैसा । येथें भाव सहसा दुजा नाहीं।९३।
ऐकतां रायासी परमानंद झाला । माझिया सुखाला जोडा नाहीं९४
मग एकमेकांलागी आलिंगीती । निवांत राहती गुंफेमाजी ॥९५॥
स्नानपान आहार विहार भाषण । उभयांसी शयन एकासनीं ९६
उभयांचा देह भिन्न मात्र दिसे । परी व्यापार असे एकरूप । ९७ ।
एवं ऐसे रामा तेचि उभयतां । राहिले तत्वतां तया वनीं ॥ ९८ ॥
दृढ समाधान दोघांसी परिपूर्ण । कांहीं कर्तेपण आढळेना ॥९९॥
वेद ह्मणे ब्रह्मनिजांगें परिपूर्ण । ब्रह्मविद्लक्षण तया नाहीं ।१६००।
अगा रामराया उभयतां मिथुन । पुढें निरूपण ऐकें त्यांचें ॥ १ ॥
कुंभकाच्या रूपें चुडाल सुंदरी । विचार अंतरीं करिती झाली ॥ २॥
ह्मणे राजियाचें समाधान झालें । तेंचि प्रगटलें वैखरीसी ॥ ३ ॥
परि पुन्हां राया कसुनीया पाहों । झाला निःसंदेहो किंवा नाहीं।४।
वस्तुतंत्र असतां कर्तृतंत्र होय । कीं राहे अद्वय परिपूर्ण ॥ ५ ॥
सर्व जगदाचा निश्चय मिथ्यारूप । कीं होय संकल्प सत्यत्वाचा॥ ६॥
याचि हेतु पाहुं मागुती कसुनी । स्फूर्ति होय मनीं कैसी राया॥७॥
येणें रीती भाव अंतरीं ठेवून । करिती झाली यत्न छळण्याचा॥८॥
एके दिनीं दोघे गुंफेमाजी असतां । कल्पितसे चित्ता कुंभकतो॥९॥

तया इच्छेसरिसे इंद्रादिक देव । मिळे समुदाय गुंफेपुढें ॥ १० ॥
इंद्र चंद्र सूर्य वरुण कुबेर । यमादि पितर आर्यमादि ॥ ११ ॥
आपुलाले वहनीं बैसूनी पातले । गंधर्व मिळाले अप्सरादी ॥१२॥
असंख्य विमानें मिळलीं त्यावनीं । ऋषी आदिकरुनी तेहि आले १३
शिखिध्वजा करीं धरुनी कुंभक । ह्मणे पाहें कौतुक काय राया १४
इंद्रादिक देव तुझे भेटी आले । राया सत्कारिलें पाहिजे त्वां ।१५।
आल्याचें आतिथ्य आश्रमीं घडावें । फळमुळें पुजावें यथासांग १६
बहु बरें ह्मणुनी बाह्यदेशीं आला । वंदूनी राहिला बद्धांजुळी ।१७।
यावें यावें स्वामी आश्रम आपुला । ह्मणे धन्य झाला सुदीन हा१८
सर्वही ते देव स्वस्ववाहनींहुनी । आले उतरोनी रायाजवळी ।१९।
रायें आसनादि अर्घ्यपाद्यपूजा । अर्पूनीया वोजा बैसवीले ॥२०॥
पृथक् पृथक् क्षेम सर्वांसी पुसोनी । परामर्षकरुनी प्रार्थीतसे॥२१॥
नृत्य तानमान अप्सरा गाताती । सर्वांची संपत्ती तेथें आली ।२२।
परिराजाचिया मनीं नाहीं भाव । मी मानवी देव हे असती॥२३॥
एक आत्माराम परिपूर्ण विलसे । नामरूप असे कोठें येथें ॥२४॥
असो स्वतां इंद्रें रायासी धरोनी । बैसवी आसनीं आपणापैं॥२५॥
धन्य राजेश्वर राज्यादि संपत्ती । त्यागुनीया प्रती वना येसी॥२६॥
जन्माचें सार्थक तुंवा केलें राया । परलोक साधाया कष्टलासी॥२७॥
धन्य तुझें पुण्य उचंबळे गगनीं । यास्तव दर्शनीं आलों आह्मी॥२८॥
तुह्मा ऐसा संग आह्मांकैंचा जोडे । नसे दुजें पाडे आमच्या भाग्या२९
सर्वही मिळेल परि संतसंग । दुर्लभ हें जग धुंडाळीतां ॥ ३० ॥
तरी राया आमुचा मनोरथ पूर्ण । करावा येऊन स्वर्गीं रहा ॥३१॥
वारंवार आह्मां दर्शन घडेल । सुकाळ होईल आनंदाचा ॥ ३२ ॥
स्वर्गाचियेठायीं जरामरण नाहीं । भोगिजे सर्वही सुखसदां ॥३३॥
तरी आतां यया विमानीं बैसावें । आह्मांसह भोगावें स्वर्गसुख॥३४॥
ऐकोनी वृत्तांत शिखिध्वज राजा । बोलतसे वोजा नम्रपणीं ॥३५॥

अहो स्वामीराया आपण आज्ञापिलें। तें सर्व पावलें मजलागी॥ ३६॥
आपलें संनिधचि कोठेंही असतां। निजकृपे परता लाभ नाहीं॥ ३७॥
मज स्वर्गभोगा काय असे काज। स्वामीनें मज निज माझें दिधलें ३८
देहची असावा तरी सुख व्हावा। शून्य पडिलें नांवारूपावरी॥ ३९॥
कोठें आहे स्वर्ग कोठें आहे नर्क। वाउगें कौतुक कल्पनेचें ॥ ४०॥
तृणापासूनीया सत्यलोकावरी। माझिये अंतरीं इच्छा नाहीं ॥ ४१॥
स्वामिचियाकृपें साध्य तें लाधलें। अप्राप्य राहिलें कोण आतां ४२
ऐसें राजियाचें वचन ऐकतां। इंद्रासी तत्वतां हर्ष झाला ॥ ४३॥
ह्मणे राजा तुज कांहीं इच्छा नाहीं। झालासी विदेही आत्मरूप ४४
धन्य तुझें भाग्य काय म्यां वर्णावें। कुंभकें बोधावें येउनीयां॥ ४५॥
धन्यगा कुंभका रायापूर्ण केलें। स्वरूपीं मिळविलें येचि देहीं॥ ४६॥
आह्मीं राजियाचें मन हें पाहिलें।निश्चयें दृढ झालें चळे कैसें॥ ४७॥
आतां आह्मी जातोंआपुलालेभुवना।पुसोनीत्याक्षणांजातेझाले॥ ४८॥
देव सर्व अंतर्धानातें पावतां। तेथें उभयतां मात्र राहती ॥ ४९॥
कुंभक विचारी ह्मणे राजियाची। कल्पांतेंसीसाचीइच्छानोहे॥ ५०॥
आणिक कुंभक ह्मणे राजियासी। हिंडवूं लोकांसी स्वर्गादिक ॥ ५१॥
सर्वही संपत्ती अथवा विपत्ती। थोर सान पंक्ती दावूं वेगीं ॥ ५२॥
यास्तव कल्पिलें सुंदर विमान। राजया लागून दावितसे ॥ ५३॥
यया विमानांत बैसूनी आपण। त्रैलोकीं भ्रमण करूं राया ॥ ५४॥
बहु बरें ह्मणे शिखिध्वजराजा। बैसताती वोजा तया माझी॥ ५५॥
नवखंडा आणि सप्तद्वीपा भूमी। दावी अनुक्रमी राजियासी ॥ ५६॥
सप्तही पाताळें स्वर्गादि भुवनें। वैकुंठादि स्थानें दाखवीत ॥ ५७॥
जनो लोक आदि तेथील रहिवासी। दावितसे रायासी सानथोर ५८
हे पाहे मानव दैत्य पाहे राजा। येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ५९॥
पाहे नीच योनी उत्तम हे राजा। येरु ह्मणे दुजा भाव नाहीं॥ ६०॥
संपन्न दुर्बल मध्यम हे राजा। येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६१॥

हे देव थोरले धाकुटे हे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६२ ॥
हे नाग हे दैत्य यक्ष पाहे राजा । येरू ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६३ ॥
हे किती सुंदर विरुप हे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६४ ॥
ह्या स्त्रिया कुमारी तरुणी पाहे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६५ ॥
हा विद्वान थोर मूर्ख पाहे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६६ ॥
पंडित चतुर कुशळ पाहे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६७ ॥
हीं बाळें हा तरुण वृद्ध पाहे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६८ ॥
हा स्वर्ग हा नर्क भोगिताति राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ६९ ॥
हा पापी पुण्यात्मा पाहे पाहे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ७० ॥
हे पितर भूत गंधर्व हे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ७१ ॥
स्त्री पुरुषाची क्रीडा नेत्रीं पाहे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ७२ ॥
हें सुख हें दुःख कैसें पाहे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ७३ ॥
हा ब्रह्मा हा विष्णु सदाशीव राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ७४ ॥
हा सिद्ध हा बद्ध अज्ञानी हे राजा । येरु ह्मणे दुजा भाव नाहीं ॥ ७५ ॥
कीटकापासूनी ब्रह्मादिकांवरी । दावितां निर्धारी भाव एक ॥ ७६ ॥
हें सुंदर स्थळ येथेंचि रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ७७ ॥
न राहुं पैं येथें आणि त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ७८ ॥
पुण्यक्षेत्र थोर येथेंचि रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ७९ ॥
न राहुं पैं येथें आणि त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८० ॥
हें पाहे कुग्राम येथेंचि रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८१ ॥
न राहुं पैं येथें आणि त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८२ ॥
सुख अति पाताळीं तरी येथें रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८३ ॥
कासयाचें सुख अति त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८४ ॥
पाहा यमलोक येथेंचि रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८५ ॥
नर्काची दुर्गंधी तरी त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८६ ॥
पाहे इंद्रलोक येथेंचि रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥ ८७ ॥

कोण राहे येथें अति त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥८८॥
हा पितर लोक येथेंचि रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ॥८९॥
कोण राहे येथें अति त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९०॥
कैलास वैकुंठीं सत्यलोकीं रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९१॥
कोण राहे येथें अति त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९२॥
जनो लोक आदि गोलोकीं रहावे । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज ९३॥
कोण राहे येथें अति त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९४॥
हा असे सुसंग तरी येथें रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९५॥
काय करणें संग अति त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९६॥
हा पाहे दुःसंग यथामार्जी रहावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९७॥
त्यागुनी दुःसंग अति त्वरा जावें । ह्मणे बहु बरवें शिखिध्वज॥९८॥
कोणता आग्रह शिखिध्वजा नाहीं । मगआलेलवलाही गुंफेमाजी॥९९॥
कुंभक ह्मणत वेदांचा सिद्धांत । पावला निभ्रांत शिखिध्वजा१७००
अगा रामराया कुंभकाच्या कृपें । समाधान सोपें झालें राया॥१॥
याची नांवें समाधान बोलिजेत । समाधी निश्चीत परिपूर्ण ॥२॥
असो यथापुढें कुंभक विचारी । आणखी निर्धारी कसी लावूं॥३॥
एकांतांचे ठायीं स्त्रियांसी मीनतां । चित्ताची दढता पाहूं कैसी॥४॥
तरी आपणाचि स्त्रीरूप धरुनी । एकत्र शयनीं प्रवर्तावें ॥ ५ ॥
ऐसा मनीं हेतु टेवूनी कुंभकें । तें ऐके कौतुकें काय करी ॥ ६ ॥
एकेदिनीं उषःकाळीं उठोनिया । स्नानें करूनीया बैसताती॥ ७ ॥
थापटूनी राया कुंभक बोलत । ऐकावें कौतुक प्राणसखया ॥८॥
आजिचिये दिनीं सत्यलोकामाजी । मिळेल सहजीं सुरसभा ॥९॥
इंद्रादिक देव पिता आर्यमादि । अजान देवादी गंधर्वही ॥१०॥
आप्सरा किन्नर आणि ऋषेश्वर । सभा हे साचार मीने माजीं॥११॥
नारदुही पिता तया समाजांत । तरी आह्मां निश्चित जाणे लागे॥१२॥
प्रसंगीं मी जरी नसतांचि तेथें । सावित्रीचा नाथ पुसेलची ॥१३॥

तरी आतां राया मज अवश्यक । त्याठायां निष्टंक जाणें लागे॥ १४॥
आजची मागुती येईन लवलाहे। तों काळ तूं राहें स्वस्थ राया॥ १५॥
ऐकोनीयां राजा करद्वय जोडोनी । चरण वंदोनी प्रार्थीतसे॥ १६॥
स्वामीविण मज घडी युगासम । तेथें चार याम जाती कैसे ॥ १७॥
नजा जरी ह्मणो तरी तुह्मां जाणें । ब्रह्म सभे उणें स्वामीवीण॥ १८॥
तरी सत्वराचि परतोनी यावें । धेनु जैसी धावें वत्सासाठीं ॥ १९॥
कुंभक मागुती बोले रायालागी । येत असो वेगीं जावोनीया॥ २०॥
तुजविण राया आह्मांही कंठेना । मागील चरणां येत असों २१॥
ऐसें बोलोनीया गगनीं उडाला । त्वरेसी चालला उत्तर पंथें॥ २२॥
अंतराळीं जातां राजा अवलोकीत। स्तब्धत्वें राहात नेत्रपातीं॥ २३॥
दिसत जो होता देह कुंभकाचा। तो न दिसे साचा दूरी जातां॥ २४॥
परि तया दिशेकडेचि पाहात । दृष्टि सहित चित्त स्थिर झालें॥ २५॥
इकडे चुडाल दक्षिणे परतोनी । आली निजभुवनीं मनोवेगें॥ २६॥
कपाटें उघडूनी प्रधानापाचारी । राज्यादि निर्धारी अवलोकीत॥ २७॥
चार याम दिन क्रमोनिया तेथें । मागुती बैसत खोलीमाजी॥ २८॥
तैसीच चालली रायाचे भेटीसी। इकडे रायासी अति उत्कंठा॥ २९॥
बैसला आसनीं दृष्टी उत्तरेसी। आठवी स्वामीसी केव्हां येती॥ ३०॥
तंव अकस्मात येत अंतराळीं । देखे नेत्र कमळीं शिखिध्वज॥ ३१॥
आला आला स्वामी कैवारी दिनाचा। उठोनियां साचा टाळी पिटी ३२
साष्टांग घालूनी राहे बद्धांजळी । तव ते पातली गुरुमाय ॥ ३३॥
अर्घ्यपाद्यादिक आसन देउनी । चरणवंदोनी बैसवीत ॥ ३४ ॥
राजाही बैसोनी मुख अवलोकीत । तोदेखे विपरीत अन्यथात्वें॥ ३५॥
अति मुखी म्लानी शरीर शोभा लोपे । हर्ष नाहीं अल्प चिंतामनीं ३६
ऐसी कुंभकाची अवस्था पाहोनी। विनवी करजोडुनी स्वामिलागी ३७
अहो स्वामीराया अघटीत झालें । श्रीमुख कोमेलें कांहो आजी। ३८।
सूर्यासीकाळीमा अग्नीसी बोळंबा । किंवा मणीस्तंभा कीडलागे॥ ३९॥

वायु वेगें कैसा मेरु हा चंचळ । माखिलें काजळ आकाशासी॥४०॥
कुबेरा लागली दरिद्राची चिंता । आंधारें सविता निर्बुजला ॥४१॥
नाहीं ऐकिलें नाहींचि देखिलें । आजि ओढवलें तेंचि कैसें ॥४२॥
रायाचें वचन सर्वही ऐकुनी । कुंभकाचे नयनीं अश्रु आले ॥४३॥
फुटे दाटोनिया राजयाचे कंठीं । घालोनिया मिठी बोलतसे ॥४४॥
ह्मणे राया बहु झालें कीं वोखटें । पूर्वकर्म खोटें वोढवलें ॥४५॥
धन्यगा प्रारब्धा ह्मणोनी लोळत । बुडालों निश्चित दुःखामाजी।४६।
मृत्यू जरी होता तरी बरें होतें । चित्त लाजवीते वांचोनिया ॥४७॥
तेव्हां शिखिध्वज उठवुनी बैसवी । सप्रेमें विनवी बैसोनीया ॥४८॥
निजरूपीं कधीं सुखदुःख उद्भवें । हर्षशोक व्हावे कवण परी॥४९॥
तथापि वर्तलें सर्व सांगा मज । काय झालें आज आज्ञापावें॥५०॥
मग तो कुंभक रायासी बोलत । जाहला वृत्तांत वोखटा जो॥५१॥
सत्यलोकाहूनी येतां अंतराळीं। पाहे नेत्र सकळीं दुर्वासातें ॥५२॥
आह्मां उभयतांच्यामध्यें मेघ आला । अंधकनेत्राला दिसूंलागे।५३।
कर्मा ऐसी बुद्धी मज प्राप्त झाली । सहजी रळी केली मीं कीं तेथें५४
जारस्त्रीचेपरी जाहला लंपट । काय तुमचा हेत आहे सांगा ॥५५॥
ऐसें माझें वचन ऐकुनी मुनीनें। कोपें शाप देणें मजलागी ॥५६॥
कोपिष्ट ते मुनी मजनिर्भर्त्सुनी । बोलिले वचनीं अनावर ॥ ५७ ॥
आह्मालागी स्त्रीची देसी तूं उपमा । तरी तूं अधमा स्त्रीची होय५८
दारुण हा शाप ऐकतांचि साचा । तेव्हां दुर्वासाच्या सन्निध गेलों५९
चरण वंदोनी बहु प्रार्थियेलें । नेणतां बोलिलें क्षमा करा ॥ ६० ॥
प्रार्थना ऐकोनि दुर्वास तुष्टले । मग बोलियेले कृपालुत्वें ॥ ६१ ॥
दिवसा पुरुषरूप रात्रीं नारी होसी । हेंगा कल्पांतेसी न चुकेची६२
ऐसें बोलोनीया दुर्वास पैं गेले । माझें येणें झालें तुझ्या भेटी।६३।
अगा शिखिध्वजा स्त्रीचा देह कांहीं । स्वतंत्र हा नाहीं अथवा शुद्ध६४
अशौचाची खाणी वेदासी विन्मुख। मोह ममता दुःख रूप सदा।६५।

कर्म धर्म कैचें अशौचाचे ठायीं । ब्रह्महत्या तेही जेथें वसे ॥६६॥
ऐसी निंद्य योनी मज ओढवली । लोळणी घातली अति खेदें ६७
तेव्हां शिखिध्वज वंदोनी विनवी । होणारें बरवी चुकतीना ॥६८॥
न होणार जें का कदाकाळीं नोहे । येथें शोकी व्हावें कासयासी६९
आत्मरूपीं स्त्रीकीं पुरुष भाव नाहीं । असे निःसंदेही एकरूप ७०
पुरुषाचा तो आत्माआत्मीकायस्त्रिची।नहोतांआत्म्याची हानीकाय७१
देहादिक अवघे मिथ्याचि विकार। वाईट सुंदर ज्याचें तया ॥७२॥
उत्तम पुरुषाचा देह कल्पियेला । आत्मासुखावला तेणें न वचे ७३
अधमा स्त्री देह कल्पियेला तरी । आत्म्यालागी तरी हानी काय७४
कर्म धर्म अवघें देहासी लागलें। तेथें काय गेलें आत्मयाचें ॥७५॥
आत्मा यानें जरी देहादीक व्हावें । तरीच ह्मणावें सुंदर खोटें।७६।
आपण आत्मरूप आहे तैसा आहे । राहो जावो देहे देहा सवें ७७
आपणाचि स्वामी मज उपदेशीलें । उत्थान बोलिलें गुप्त रूपें।७८।
असो गुरुराया तुह्मी निर्विकार । कोणता विकार तुह्मवेची ॥ ७९ ॥
आपुल्या कृपेनें निश्चय बाणला । न जाय ढळला कल्पांतींही।८०।
दासाचा संशय नाहीं उरूं दिला। तरी मग उरला आपण कैसा८१
मज पूर्ण ठावें स्वामीचिये ठायीं । जन्मलाची नाहीं विकार हा ८२
परि माझा निश्चय स्वामीनीं पाहिला । खेद हा दाविला वरी वरी८३
ऐका स्वामीराया भलतें घडो देहा। परि निश्चय हा न ढळो कदां८४
ऐसें बोलोनीया चरण धरियेले । कुंभकें दिधलें आलिंगन ॥८५॥
कुंभक विचारी आपुले अंतरा । निश्चय हा पुरा राया झाला॥८६॥
परी वरी वरी आपुले स्वभाव । दावावे अपूर्व रायालागीं ॥ ८७ ॥
अगा शिखिध्वजा सत्य बोलिलासी। परि मज चित्तासी खंती वाटे ८८
पाहें पाहें राया सूर्य अस्तमाना । आला असे जाणा अर्ध बिंबी८९
पाहें माझी चर्या पुरुषाची लोपत । स्त्रीचे अंकुरत अवयव हे।९०।
जटा मस्तकींची पाहें वेणी झाली। कानांत शोभली बाळी बुगडी९१

मिशा दाढी गेली नथ शोभे नाकीं । झाली एकाएकीं लज्जीत ती९२
कंठीचें भूषण आंगीची कांचोळी । दावी नेत्रकमळीं राजियासी९३
सुंदर साडीचा पदर सरसावी । लाजोनी लोपवी पयोधर ॥ ९४ ॥
अति सान माझ्या उरुजंघाजवळ । हस्तकीं कोमळ शोभताती॥९५॥
पुरुषाची आकृती सर्वगेली राया।नखशिख शापेंया स्त्री झालें कीं९६
ऐकें रामा ऐसी चुडाल सुंदरी । स्त्रीचा वेष धरी अनुपम्य ॥९७॥
स्वर्गांगना जीच्या स्वरूपा पाहूनी।लज्जीत होऊनी वना जाती॥९८॥
त्याहीवरी वस्त्र अलंकारयुक्त । तरुण अत्यंत बैसलीसे ॥ ९९ ॥
परी राजा निज वेदाचें पावला । कांहीं संकोचला नाहीं मनीं१८००
रघुनाथाप्रति वसिष्ठ बोलत । चुडाल धरीत स्त्रीचा वेष ॥ १ ॥
परम सुंदर लावण्याची खाणी । आकर्ण नयनीं बैसलीसे ॥ २ ॥
तिचें नाम रामा असे मदनिका । जे का ब्रह्मादिका पैजा जिंके॥ ३॥
असो ऐसी मदनिका रायापुढें । बैसलीसे कोडें राया बोले ॥ ४ ॥
होणार तें झालें राया मजलागी । परि तुझी सलगी मजबहु ॥ ५ ॥
तुज सोडुनीया क्षण एक जमेना । स्वर्गादि भुवना वोस वाटे ॥६॥
येथेंचि राहतां स्त्रीचा देह माझा । पुरुषदेह तुझा आणि एकांत॥७॥
प्रतिदिनीं आपुलें शयन एकासनीं । आजि पृथकासनीं निद्रावदे।८।
अग्निकुंडासम बोलताती नारी । घृतकुंभापरी पुरुषदेह ॥ ९ ॥
उभयतां जरी मिनता एकत्र । सुटती पाझर निश्चयेसी ॥ १० ॥
तरी आतां राया नसुचे उपाय । प्रसंगासी काय करणें राया॥११॥
ऐसें मदनिकेचें वचन ऐकोनी । राजा कर जोडूनी बोलतसे ॥१२॥
एक गुरु आत्मा परिपूर्ण संचला । नामरूपा झाला भेदनवचे॥१३॥
मृगजळापरी व्यर्थ दृश्य भास । दिसत तयास मिथ्यत्वचि ॥१४॥
भिंतीवरी जैसें स्त्रीपुरुष काढिलें।भोग्य भोक्ता झालें कैंचे तेथें॥१५॥
भिन्न भास दिसे परि अवघी भिंती।असे तरी व्यक्ती कोठें दुजी १६
तेवीं स्त्रीपुरुषाचे दिसणेंचि मात्र । आत्मा तो चिन्मात्र एकरूप।१७।

माझा तो निश्चय गुरुरूप पाहतां । विकार तत्वता होय कैसा॥ १८॥
गुरुविण मज दुजा भाव नाहीं । उद्भवे कामही तेथें कैसा ॥ १९॥
मातेच्या अचळीं बाळ जैसा घुसतां । कायतेथेंपाहतांकामबुद्धी॥ २०॥
तैसा गुरुमाये वोसंगा निघोनि । प्रवर्तेन शयनीं सुखरूप ॥२१॥
मी पुरुषबुद्धी मजलागी झाली । तरी सटवली ब्रह्मबुद्धी ॥ २२॥
पुरुषत्व नसतां स्त्री कोण अपेक्षी । स्त्रीविण निरीक्षी काम कैसा २३
आपणचि सर्वांवरी बिंदु घाला । तरी नांवरूपाला उद्भव कैंचा। २४।
तरी आतां स्वामी मजविशीं संशय । कदां आणू नये भलतेठायीं २५
ऐसे राजियाचे बोल निश्चयाचे । ऐकोनिया साचे हर्षे मनीं॥ २६॥
धन्यराया तुझी दृढबुद्धी झाली । द्वैताद्वैत भूली गेली तुझी ॥ २७॥
मग एकमेकां आलिंगुनी प्रीति । शयन करिती एकत्रची ॥ २८ ॥
परी रायालागी विकारचिन्ह्ने । आत्मरूप आहे निश्चयज्याचा॥ २९॥
प्रातःकाळ होतां कुंभक शोभत । स्नानेंही सारीत उभयतां ॥ ३०॥
दिवसा कुंभक रात्रीं मदनिका । होऊन कौतुका राहातसे ॥ ३१ ॥
परी उभयतांचें एकत्र शयन । रात्रीं किंवा दिन एकरूप ॥ ३२ ॥
ऐसेंचि त्या वनीं षण्मास लोटती । परी राजा चित्तीं निश्चळची ३३
लावण्य पद्मिणी तारुण्यही अति । त्यावरी एकांतीं एका शयनीं॥ ३४॥
ऐसें मिनतांचि कामचिनुद्भवे । तयासी ह्मणावें नर कैसे ॥ ३५ ॥
शंकर जरी ह्मणों तरी मोहनीसीं । भुलला वेगेसीं वीर्य द्रवलें॥ ३६॥
सरस्वती पाहतां ब्रह्माही भूलला । विष्णुही लागला वृंदेमागें॥ ३७॥
तरी शिखिध्वजा कोणती उपमा । सांगे देऊं रामा भूमंडळीं॥ ३८॥
असो शिखिध्वज पूर्णसमाधानी । देहबुद्धी स्वप्नीं नयेज्याच्या॥ ३९॥
कुंभक विचारी आपुले मानसीं । विकार रायासी नोहे कदां॥ ४०॥
याच्यामनोवृत्तीसर्वस्वीसीधाल्या । धांवाहीबुडाल्याइंद्रियांच्या॥ ४१॥
विषयाचीस्फूर्तिकिमपीअसेना । परी आणिकजाणाछळूंयासी॥ ४२॥
विषय न भोगितां राहे समाधान । हेंहि असें उणें ज्ञानियासी॥ ४३॥

नपूसंका जरी होय इंद्रिय दमन । तरी परमधाम नपवेचि ॥४४॥
आंधळा न देखे बहिरा न ऐके । तया साधूनिकें ह्मणों नये॥४५॥
केवळ जो मूढ त्या नाहीं संकल्प । तरी तो निर्विकल्प ह्मणों नये॥४६॥
तस्मात रायासी विषय भोग न घडे । यास्तव उघडे समाधान॥४७॥
विषयहि भोगितां समाधान राहवें । तयासी ह्मणावें नित्य मुक्त॥४८॥
आजयासीविषयाचीप्राप्ती नाहीं । यास्तवकदाहीविकारनोहे ॥४९॥
जरी प्रारब्धानें विषय भोग घडती । तेव्हां या विकृती होईलची॥५०॥
अहंकाराचें कर्म आपुले माथा घेणें । तयासी बोलणें उत्थानची॥५१॥
चिदचिद्ग्रंथी एकदां तूटली । ज्ञान नव्हे झाली जरी एक ॥५२॥
देहादिकांलागी घडो भलतेसें । समाधान जैसें तैसें रहावें ॥५३॥
याचि नांवें ज्ञान ग्रंथीचें भेदन । पुन्हां एक होणें नव्हे कदां॥५४॥
यास्तव रायासी आतां लग्न लावूं । अंतरींचें घेऊं हार्द कैसें॥५५॥
मीमाझेंवाटतेंकींमीकर्ता भोक्ता । आधींपाहुंआतांवृत्तीकैसी ॥५६॥
येणें रीति हेतू अंतरीं ठेवुनी । कुंभक त्या वनीं करी काय ॥५७॥
उभयतां एकेदिनीं परमानंदें । बैसती स्वच्छंदें चर्चा करिती॥५८॥
कुंभकें रायाच्या प्रेमें हस्ताधरुनी । बोलत हांसोनी परमादरें॥५९॥
ऐकें राजेश्वरा अंतरींचा हेतू । गुह्य परी मातु तुजसी कीजे ॥६०॥
रात्रीं स्त्रीचा देह मज प्राप्त होय । तेव्हांचा समय मीच जाणें॥६१॥
कामज्वरें मज सुखें निद्रानये । किती मनोदय आवरावे ॥ ६२ ॥
ऐसा मज रोग अंतरीं लागला । औषध तयाला मिळे कैसें॥६३॥
वृक्षाचे कोठारीं अग्नि जरी राहे । तरी हिरवा राहे कोठोनीयां॥६४॥
तैसा माझे जिवीं काम हा झोंबला । तरीसुखमजला बाह्य कैचें॥६५॥
पुरुषाचा संग मज केव्हां प्राप्त । मनोरथ तृप्त होय कधीं ॥६६॥
ऐसें कृत्रिमाचें एकोनी वचन । शिखिध्वज ह्मणे अघटीत ॥६७॥
अहो गुरुराया आपण असंग । स्त्री पुरुषाचें सोंग तेथें कैसें॥६८॥
कासयाचा काम पूर्ण आत्माराम । वाउगा संभ्रम वरींदावा॥६९॥

माझें धैर्य पाहतां कसीं लावुनीयां । एऱ्हवीं भ्रमाया ठाव कैसा ७०
आपुलिया कृपें मज परम तृप्ती । झालीसे त्याप्रती नाशनाव्हे ।७१।
अकृत्रिम सुख आपुलें जाणतां । अन्यकृत्रिमता वांच्छि कोण॥७२॥
सिद्धान्न सांडोनी गंधर्व नगरीं । मागों मधुकरी कोण जाय॥७३॥
बोलत कुंभक राया तुझे बोल । वाटताती फोल मज आतां ॥७४॥
जयालागी सर्पदंश होतांक्षणी । गोडही असोनी कडू लागे ॥७५॥
तैसा कामव्याळ मजला झोंबत । तेणें वचनामृत तुझें कडू ॥७६॥
मज आतां पुरुषाविण रात्रींमाजीं । क्षणएक शेजीं सुख नोहे॥७७॥
मागुती तो राजा कुंभका विनवी । इच्छाहीपुरवावी स्वामीराया ।७८।
ब्रह्मविदांलागी सर्व करणें योग्य । तयासी अयोग्य कोण ह्मणे॥७९॥
रायाचें वचन ऐकोनी कुंभकें । बोलतसे निकें हांसोनीया ॥ ८० ॥
मज व्यभिचार नावडेचि राया । तरी लावूनीया लग्न रहावें ॥८१॥
रात्रीमाजी नारी होणें तो न चुके। तरी लग्न निकें लावू राया ॥८२॥
प्रारब्धाचा भोग भोगुनी सारावा । अवरिता तुटावा कोणेपरी॥८३॥
तेव्हां शिखिध्वज बहुबरें ह्मणे । आवडे तैसें करणें स्वामीराया॥८४॥
देव अथवा ऋषी पितर कीं यक्ष । जो आवडेदक्ष तोची वरा॥८५॥
परि दिवसा चारप्रहर मजपाशीं । रहावें स्वामीसी प्रार्थीतसें॥८६॥
रात्रिचिया ठायीं इच्छा पूर्ण करा । जाउनीया वरा पुरुषालागीं।८७।
अथवा पुरुष येथेंचि आणावा । उभयतांची सेवा मज घडे॥८८॥
रायाचें वचन कुंभक ऐकोनी । बोलती हांसोनी करुणोत्तरें ॥८९॥
तुझा माझा राया चिरकाळ वास । एकत्र मानस मनामिळे ॥९०॥
तुझा हा वियोग क्षणएक मजला । होतां मृत्यु वहिला बरा वाटे॥९१॥
अन्य पुरुषाशीं लग्न जरी लावूं । तरी राया राहुं स्वतंत्र न ॥९२॥
हे आज्ञाशिरीं मज मान्य होय । तुझा वियोग साहे कैसा राया॥९३॥
तरी माझा मनोधर्म अवधारी । तूंचि राया वरीं मजलागीं ॥९४॥
ऐसें कुंभकाचें वचन मुखांतून । निघतां कैसें जाण झालें राया॥९५॥

मस्तकीं पर्वत पडे एकाएकीं । वज्रधार निकीं पडली किंवा॥९६॥
मुद्गल प्रहारें जेविं मूर्छा येत । तेविं निचेष्टित राजा झाला ॥९७॥
सर्पाचे दंशनीं जेविं आजा स्तब्ध । तेविं राजा मुग्ध झाला असे॥९८॥
वेद ब्राह्मणांच्या साक्षी लग्न झालें। राजीया कळलें नाहीं रामा॥९९॥
श्रीरामा सगुणा अगा मेघःशामा। शिखिध्वज नामा स्तब्ध होतां१९००
तेव्हां मदनिका बोलत रायासी । विस्मय तुह्मासी कांहो झाला॥१॥
तेवेळीं रायानें उश्वास टाकोनी । सद्गद होउनी चरणा लागे ॥२॥
अघटीत ऐसें मागें झालें नाहीं। पुढें सर्वथाही न घडेचि ॥ ३ ॥
गुरुमाय तूं माझी मी तुझें बालक । तेथें हा कुतर्क न बोढवो ॥४॥
न होणार ऐशी आज्ञा करूं नये । याहीहून होय मृत्युबरा ॥ ५ ॥
तरी स्वामी मज कृपा ऐसी करा । अन्याय लेंकुरा न घडावा ॥६॥
आपुलीही इच्छा पूर्ण करून घ्यावी। दासालागीं द्यावी चरणसेवा॥७॥
ऐसें बोलोनीया चरण धरियेले । इतुकें क्षमा केलें पाहिजे हें ॥८॥
कुंभक रायासी उठवूनी ह्मणे । तुजला भ्रमानें वेडें केलें ॥ ९ ॥
गुरुकाय कराया साडेतीन हातांचा । तूंही शरीराचा अंकित होसी१०
आत्मारूपी कोठें गुरुशिष्यपणा । एक परिपूर्ण सदोदित ॥११॥
आपण अद्वय असोनी भ्रमला । या अज्ञानें आला जीवित्वासि १२
जें जें करणें घडे उपाधीच्या योगें । तें कर्तृत्व वेगें माथाघेत॥१३॥
तया अभिमानें जें जें कर्म झालें । क्षणक्षणा सांचलें संचीत तें।१४।
त्यांतून ज्याक्षणीं जे विभाग आले । प्रारब्धठेविलें तया नांव॥१५॥
वर्तमानीं घडे जें जें कांहीं करणें । तया क्रियमाण बोलिजे तें।१६।
आपण असंग गुरुकृपें ज्ञान । होतां परिपूर्ण संचित जळे ॥१७॥
अकर्ता आपण निःसंशय कळतां। मारितसे लाथा क्रियमाणा॥१८॥
परितें प्रारब्ध उरलें देहासी । भोग घडतां त्याशीं नाशहोय ॥१९॥
तया प्रारब्धासिभोगिल्यावांचून । कल्पांतींहीजाणनाशनोहे ॥२०॥
वाईट कीं भलें प्रारब्ध न ह्मणे । बळें भोग देणें जिवालागीं॥२१॥

ज्ञाता कीं अज्ञान प्रारब्ध न ह्मणे । बळें भोग देणें जिवालागी॥ २ २॥
पाप किंवा पुण्य प्रारब्ध न ह्मणे । बळें भोग देणें जिवालागी॥ २ ३॥
पाहे मज स्त्रीचा वेषप्राप्तझाला । प्रारब्धाचाघाला न कळेतुज॥ २ ४॥
राज्यत्यागुनी तूं वनीं खाशी पाला । प्रारब्धाचाघाला न कळेतुज।२५।
पूर्ण विष्णुपरी वृंदेशींरतला । प्रारब्धाचाघाला न कळे तुज ॥२६॥
मोहनिसी पाहुनी शिववीर्य द्रवला। प्रारब्धाचाघाला न कळे तुज।२७।
ब्रह्मदेव आंगें कन्येसी रमला । प्रारब्धाचाघाला न कळे तुज ।२८।
ज्ञानी अज्ञानासी प्रारब्धसमान । परिविलक्षण एक आहे ॥२९॥
अहंकर्तेपणें होय हर्षशोक । तेणेंचि बाधक अज्ञानासी ॥ ३० ॥
न घडे जें तेंही देहासी घडतां । आपण अकर्ता पूर्ण बोधे ॥ ३१ ॥
ज्ञानीयासी कदां हर्ष शोक नाहीं । भोगितसे पाहींप्राप्तभोग ॥३२॥
ऐसें हें प्रारब्ध अनावरजगीं । तरी मौनें भोगीं आला भोग ॥ ३३॥
जरी तूं आग्रह धरिसी मानसीं । क्रियमाणा होसी अधिकारी ।३४।
नको मज निंदा ऐसेंजें वांछिसी । होणार तुजसी न सोडिगा ।३५।
होणार अचुक होउनी जाईल । खरिखरी उरेल मात्र बुद्धी ॥३६॥
तोंचि क्रियमाण कर्तृत्व अभिमान । होतां जरी ज्ञान मावळलें ।३७।
तरी आतां राया मीकर्तासांडोन । भोगीं प्राप्तपूर्ण आग्रह टाकी॥ ३८॥
आणिकतुजलासमाधानबोलूं । तें ऐकें निश्चळु होउनिया ॥ ३९ ॥
ईश्वरें जितुकें निर्मियलें द्वैत । तेंचि अबाधीत असे राया ॥ ४० ॥
जीवें तयावरी नामादि कल्पुनी । पडिला बंधनीं जन्मे मरे ॥४१॥
एका स्त्रीच्याठायीं बाप ह्मणे कन्या । पुत्र ह्मणे मान्य माता माझी ४२
भ्राता ह्मणे भगिनी भर्ता ह्मणे पत्नी । दीर तो वहिनी ह्मणतसे ४३
परि पाहें राया स्त्री तो एकरूप । होतांही संकल्प दुजी नोहे ।४४।
ऐसी जीव सृष्टी बंधासी कारण । याचें जें हनन मुक्ती तेचि ।४५।
तोविंच गुरु शिष्य जीवाचे भाविले । हेंही समुळ गेलें पाहिजे कीं ४६
कैंचा स्त्रीपुरुष भाव सांडीं राया । आज्ञेसी माझिया मान देईं ४७

कैंचा गुरु शिष्य सांडीं सांडीं राया । आज्ञेमीमाझिया मान देईं ४८
कैंचा बंधमोक्ष भाव सांडीं राया । आज्ञेसीमाझिया मान देईं ।४९।
कैंचा भोक्ता भोग्य भाव सांडीं राया । आज्ञेसीमाझिया मान देईं ५०
गुरुसेवा तेंचि आज्ञेचें पालन । आतां नेदी वचन कांहीं एक ।५१।
ऐसें निकर्षाचें वचन ऐकतां । रायाचिया चित्ता सांकडेंची ॥५२॥
बरें ह्मणोतरी सद्गुरुचेठायीं । विषयबुद्धी कांहीं योग्य नव्हे ॥५३॥
जरी ह्मणो नाहीं आज्ञा उल्लंघन । होतां गुरुजन सटावले ॥ ५४ ॥
ऐसें जाणोनिया शिखिध्वजराजा । ह्मणे महाराजा आज्ञास्वामी ।५५।
मजविषयाची कांहीं चाड नाहीं । गुरु आज्ञा पाहीं मान्य असे ।५६।
स्त्रीपुरुषाची रति मज ठावी नाहीं । गुरु आज्ञा पाहीं मान्य असे ५७
अद्वैताच्या ठायीं द्वैत भाव नाहीं । गुरु आज्ञा पाहीं मान्य असे ५८
तेवेळे कुंभक ह्मणे मुहुर्त आजी । लग्न लावूं सहजीं यथायुक्त ।५९।
लग्नाची सामुग्री जे जे कल्पियेली । ते ते सिद्धझाली ततत्क्षणीं ।६०।
ऋषीगण सर्व तयेठायीं मिळती । भोवलें घालीती हाळदीचें ।६१।
अस्तमान होतां झाली मदनिका । हाळदी कौतुका शोभतसे ।६२।
गुरुशिष्य द्वैत अंत्रपाठ धरिला । सेव्यसेवक झाला दोहींकडे ।६३।
महावाक्यध्वनीं मंगळ अष्टकें । बोभाटती निके उपनिषद ॥६४॥
गुरु शिष्य ऐक्य बाणतां प्रतीती । फिटला निश्चिती अंत्रपाठ ६५
मंगळामंगळ वाद्यघोष होती । लाहे जीवन्मुक्ति सुख जीवा ॥६६॥
अपरोक्ष ज्ञान झालें पाणीग्रहण । शब्द झाला शून्य परासहित ।६७।
निजतृप्ती झालें पूर्ण संतर्पण । याचकां निजधन सर्व ब्रह्म ॥६८॥
असो ऐसा झाला लग्नाचा सोहळा । द्विजादिकमेळा भुवनाजाय६९
उभयतां वधुवरें मात्र शोभताती । परी राजाचित्तीं दृढ असे॥७०॥
एक परिपूर्ण ब्रह्म आत्माराम । तेथें कैसा काम उद्भवेल ॥ ७१ ॥
कदाचित् द्वैतभाव उपजला । पाहे श्रीगुरुला आपण शिष्य ॥७२॥
परि हीं स्त्री असे मी एकपुरुष । हा भाव निःशेष स्वप्नीं नाहीं७३

मदनिका ह्मणे आतां बरें झालें । मोहीन वहिलें राजयासी ॥७४॥
स्त्रियांचे स्वभावविकार दुष्टांचे । लाघववचनाचें दाखवितसे ॥७५॥
ह्मणे प्राणसखया मी तों असे दासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी॥७६॥
चरण झाडीन आपुलिया केशीं । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥७७॥
चरण तळहातीं मृदूया करेसी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥ ७८ ॥
चला स्वामीराया प्रवर्तू शयनासीं । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥७९॥
वस्त्र अलंकार शोभा दावी त्यासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥८०॥
कटाक्षाचे बाण खोची अंतरासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥८१॥
कंठीं हात घाली चुंबीत मुखासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥८२
उरावरी हस्त ठेवितां वेगेंसी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥ ८३ ॥
ऊराऊर लावी आलिंगी रायासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥८४॥
प्रवर्तावें संगा ह्मणत रायासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥ ८५ ॥
मज काम जाळी करुणा नये कैसी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ।८६।
वस्त्रादि त्यागुनी नग्न होत निसीं । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥८७॥
मदनिका अंगें आपण भोगी त्यासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी।८८।
मी कीं कामी असें तूं राया उदासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ।८९।
दिव्य शेजेवरीं दावितां विलास । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥९०॥
प्रवर्तितां रती आंगाचे संगासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥ ९१ ॥
वस्त्र अलंकार लेववी रायासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥ ९२ ॥
राज उपचार दावित विलासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥ ९३ ॥
चंदन सुगंध अर्पित हारासी । राजाचे मानसीं गुरुबुद्धी ॥ ९४ ॥
असो ऐसी रात्री लोटलीयावरी । मदनिकासुंदरी कुंभक होय ।९५।
स्नान करोनिया तिलक लाविती । चारी प्रहर करिती विहार हा॥९६।
पुन्हा रात्रीमाजी होउनी मदनिका । विलास कौतुका दावितसे ।९७।
एवं सहामास प्रतिदिनीं ऐसें । भावें मोहितसे राजियासी ॥ ९८ ॥
परि राजाराम वेचाचा मथितार्थ । पावला समर्थ एकरूप ॥ ९९ ॥

अद्वैताचे बोधें दृढ निर्विकल्प । उत्थानविकल्प नव्हे कदां ।२०००।
जरी नामरूपीं केव्हां झाली स्फूर्ती । गुरुशिष्यव्यक्ती दोनदेखों ॥ १ ॥
वयापरतें स्त्री कींपुरुष भान नाहीं । अवस्थेसी तीहीं एकरूप ॥ २ ॥
हें हें माझें माझें हा हा मी अमुक । गेलें वृथात्मक व्यापारींही ॥ ३ ॥
शुभाशुभघडतां कीर्ति किंवा भोक्ता । नाठवे तत्वतां कवणे काळीं ४
ध्यानीं कीं चिंतनीं श्रवणीं मननीं । नव्हे भिन्नपणीं त्रिपुटीरूप ॥५॥
असो ऐसा राजा पूर्ण समाधान ॥ चुडाल आपण परिक्षीत ॥ ६ ॥
ह्मणे मी ययासीं लग्नही लाविलें । कामादि दाविले विकारही ॥ ७ ॥
परी आतां रायासमोर आपण । रत होऊं जाण परपुरुषासीं ॥ ८ ॥
तेव्हां याचे चित्तीं होईल उत्थान । किंवा समाधान राहतें पाहूं ॥९॥
कुंभकतो गुरुशिष्य शिखिध्वज । सायंकाळींसहज जातीदोघे ॥१०॥
बहिर्जळीं संध्याव्हावी सायंकाळीं । आलें आंतयेवेळीं नदीतीरीं ।११।
हस्त पादादीक दोघे प्रक्षाळूनी । भस्म विलेपनीं शोभताती ॥ १२ ॥
कुंभकानें क्रिया त्वरें आटोपुनी । रायासीं वचन बोलतसे ॥ १३ ॥
आह्मी पुढें जातों मागोनि तूंयेई । तैसाचीतेसमयीं फिरस्ताझाला १४
एका जाळीं माजीं पुरुषनिर्मिंगला । आपण घेतला स्त्रीचा वेष ।१५।
दिव्य तोपुरुष दिव्य मदनिका । विलास कौतुका भोगिताती ।१६।
रायाच्या मार्गांत सहज दृष्टी पडे । ऐसे स्थळीं कोडेंक्रीडताती ।१७।
इकडे शिखिध्वजें क्रिया ते सारोनी । पादुका चरणीं तुंबाकरीं ।१८।
गुंफेमाजीजातांमध्येंजाळीमाजी । क्रीडतीतेथेंसहजींदृष्टीगेली ॥१९॥
मदनिकेचीतेव्हांदृष्टादृष्ट झाली । तेक्षणीं दाविली संकोचता ॥२०॥
परि राजियाचे मनीं दुजा भाव । नाहीं सर्वथैव आला रामा ॥ २१ ॥
परकी स्वकीय अवघा आत्माराम । मीतोऐसेंनाम कोठेंदोन ॥२२॥
स्त्रीअथवापुरुषभाव आत्मारामीं । नसतांतयानेमीं रती कोण । २३ ।
परी राजाभावी आपुलेमनांत । माझी दृष्टी त्वरित पडली असे॥ २४॥
णें उभयतां मनीं संकोचती । करिती समाप्ती विलासाची ॥२५॥

मनवांच्छापूर्णनहोतां स्वामीची । तरीमाझीसाची सेवा कैसी॥ २६॥
यास्तव प्रार्थना करितसे राजा । अहो महाराजा शंकूनका ॥ २७॥
जेणेरीती तृप्तीहोईल स्वामीची । तेचि पुरवा साची यथासांग।२८।
मीतो देखियेलें ऐसें न मानावें । जातसे स्वभावें बोलून ऐसें २९॥
गुंफेपुढें बैसे निवांत ते स्थानीं। विकारही मनीं नोहे राया ॥ ३०॥
इकडे मदनिका सोंग विसर्जून । आली लज्जितमन रायापुढें ॥ ३१॥
मुखालागीं ग्लानी उभी अधोमुखीं । भूमीपदनखीं उकरीत ॥ ३२॥
रायें तें पाहून विनविता झाला । स्वामी कांहोआलाअतित्वरा। ३३।
मज संकोचुनी सुख विसर्जिलें। दूषण घडलें मज तेणें ॥ ३४ ॥
मातापित्यापुढें बाळक असतां । न संकोचे माता क्रीडतांही॥ ३५॥
तेविं मी पतित स्वामीचा अंकित। असतां अघटित केलें कैसें॥ ३६॥
तेव्हां मदनिका स्त्रियांचे स्वभाव । दावीतगौरवकरोनियां ॥ ३७ ॥
नेत्रीं अश्रुधारा स्फुंदस्फुंद रडे । जोडितसंकोडें हात दोन्हीं ॥ ३८॥
अहोस्वामीराया या देहाच्यानाथा । अपराधिसमर्थाथोरमीकीं॥ ३९॥
हादेहअर्पिलास्वामीच्याचरणीं । परी मी पापिणीदुष्टबुद्धी ॥ ४० ॥
स्त्रियांचे स्वभाव अतिदुष्टजनीं । क्षणएकस्थानीं स्थिरनोहे ॥ ४१ ॥
वोढःळजेंगुरूअतिचारा असतां । परिहिरवेंपाहतांधांवेतिकडे ॥ ४२ ॥
तेवींचम्याकेलेंपुरुषींसोकलें । अन्यायी मीझालेंथोरराया ॥ ४३ ॥
ऐसी मीअपराधीअतिदुराचारी । तरीमजानिर्धारीदंडकीजे ॥ ४४ ॥
राजनितीरायातुह्मासर्व ठावी । कोणालागीद्यावीकायाशिक्षा ॥ ४५ ॥
अपराधीयासी दंड न करितां । येतउणीवता न्यायालागीं ॥४६॥
न्याय संरक्षून मज दंड करा। पुनः दुराचारा न प्रवर्तें ॥ ४७ ॥
ऐशापरीदंडस्वामीनीयोजावा । मदनिकास्वभावाऐसीबोले ॥ ४८ ॥
यारीतीवचनरायानेंऐकतां । गजबजिलाचित्ता आपुलेठायीं ॥४९॥
ह्मणे महाराजाकायहें बोलणें । ऐसें म्याश्रवणें ऐको नये ॥ ५० ॥
गुरुनिंदाजरीऐकिलीपरमुखें । ओतावें रसतिखें तप्तश्रवणीं ॥ ५१ ॥

जेणेंनिंदाकेलीतयापुन्हानयनीं । पाहुंनये स्वप्नींकल्पांतींही ॥ ५२ ॥
आपणा अपराधी ह्मणवितांकैसें । मीचस्वामीअसेदंडायोग्य ॥५३॥
स्वामीचीयेठायींकोठेंदेहस्फूर्ति । स्त्रीकिंपुरुषव्यक्तिअसेतरी ॥ ५४ ॥
द्वैतेविण असेसंपूर्ण आत्माराम । तेथें कैचाकामयोग्यभोक्ता ॥५५॥
स्वामिचियाकृपें माझें सर्व द्वैत । गेलोंचि निश्चित मनासहित ॥५६॥
मन मावळतां कामकैचाउरे । स्त्रीपुरुष विकारें तेथें कोठें ॥ ५७ ॥
कामाभावींकैचाउद्भवेलक्रोध । क्रोधेविण अशुद्धमोहोकोठें ॥ ५८ ॥
मोहोविणकदांबुद्धीनाशनोहे । बुद्धीचानिश्चयें नाशनाहीं ॥ ५९ ॥
ऐसापूर्ण बोधमजभूमीपेरिला । तोचि टवटविला अनावर ॥ ६० ॥
त्याहि वरी उपदेश पाणी दिलें । तेणें सरसावले दृढतर ॥ ६१ ॥
आणिकत्यावरी हलवुनी पाहिलें । कसुनिया केलें बळकट ॥६२॥
अजुनियाइच्छास्वामी जैसीअसे । करा तैसेंतैसें अंकितासी ॥६३॥
अंतरीचाभावमाझियास्वामीसी । ठावाचिदिनानिशीं ज्ञानदृष्टी ॥६४॥
मुंगीचेंअंतरठाउकें महाराजा । तरी काय माझा भावनकळे ॥६५॥
परीपुन्हामजनव्हावें उत्थान । याहेतुकृपेनें खलुनी पाहतां ॥ ६६ ॥
तरी स्वामी मजलागी दंडकरा । बोलेनउत्तरा तैसा तैसा ॥ ६७ ॥
गुरुवांचुनीयां देखती नयन । तरी जावो फुटोन तेचिवेळे ॥ ६८ ॥
गुरुभजनाविण जिव्हाशब्दकरी । तेसमयींझडकरीझडूनीजावो॥६९।
गुरुपदाविण अन्यासी वंदन । तरी शतचूर्ण मस्तकही ॥ ७० ॥
असो बहु काय गुरुविण स्फुर्ती । होय शतगणति गुरुहत्या ॥७१॥
ऐसें निष्कर्षाचें रायाचें बोलणें । द्रवली असे तेणें गुरुमाय ॥७२॥
गंहिवर दाटला ह्मणे धन्य राजा । पावलासे निजा चलनारहित॥७३॥
आतां कोठवरी याचा अंत पाहों । झाला निःसंदेहो कल्पकोटी।७४।
मग मदनिकेचा वेष टाकुनीया । चूडाल होउनीया राहे उभी।७५।
एकाएकीं रायें चुडाळ देखिली । सहज उभी ठेली हास्यवदना।७६।
राजा संकोचला आपुले चित्तांत । ह्मणे कैसी दिसत राज्ञी मज।७७।

किंवास्वप्नामार्जीबहुतां दिवसां आली । ह्मणों जरी, लागलीझोंपकोठें७८
डोळे चोळोनियां अंगमोडा देत । ह्मणे मी जागृत असें खरा॥ ८९॥
स्वप्नींचे पदार्थ दिसोनी नासती । हे तों दिसे व्यक्ती चिरकाळ॥ ८०॥
परी हे चुडाल येथें कैसी आली । अरण्यांतठेली एकटी कैची ॥ ८१॥
कोठें तो कुंभक कोठें मदनिका । जेणें मजानिका बोध केला ॥ ८२॥
किंवा स्वामीनेंची चुडालेचें रूप । धरुनी धैर्य अल्प माझें पहाती। ८३।
ऐसा राजा होय चित्तीं साशंकीत । चुडाल बोलत रायाप्रती ॥ ८४॥
अगा राजेश्वरा अगा प्राणनाथा । साशंकीत होतां कासयासी॥ ८५॥
चुडाल मी खरी धर्मपत्नी आपुली । नोहे स्वप्नभूली अथवा खोटें८६
तयेकाळीं राजा बोलत प्रीतीनें । कैसें झालें येणें तुझें येथें ॥ ८७॥
बहु दुरिच्यादुरीं आणि दुर्धरवनीं । चालत चरणीं येसी कैसी । ८८।
उष्णवारा तुज नाहीं स्पर्शियेला । दुर्धर वनाला येसी कैसी ॥ ८९॥
मग ते सुंदरी जाहली बोलती । राया तुजप्रती स्मरतें काय ॥ ९०॥
बहु राया तुज सदनीं उपदेशीलें । तें तुज मानलें नाहीं चित्ता॥ ९१॥
मज उपेक्षुनी वन सेवियेलें । तेव्हां मीचि केलें योगाभ्यसन ॥ ९२॥
तुजसाठीं राया ब्रह्मांड शोधिलें । तुज पाहूं गेलें गुप्त रूपें ॥ ९३॥
मग कुंभकाचा वेष म्यां घेउनी । बोधिलें निर्वाणीं स्वात्मबोधें ९४
इंद्रादिकदेव मीच झालें आंगें । ब्रह्मांडही वेगें दाखविलें ॥ ९५ ॥
मदनिकाहोऊनीकसोटीपाहिली । पुरुषव्यक्तिधरिलीम्यांचिराया । ९६।
तुझें अतिदृढपाहतांसमाधान । आपुलेंस्वरूपजाणपगटविलें ॥ ९७॥
ऐसें चुडालेचें उत्तर ऐकिलें । नमुनी घेतलें अंकावरी ॥ ९८ ॥
वेदराय ह्मणे धन्य गुरुशिष्य । झाले एकरस ब्रह्मानंदीं ॥ ९९ ॥
चुडालिकेलागीं राजा शिखिध्वज । स्तवीत सहज मधुरोत्तरीं २१००
धन्य गुणसरिते थोर कष्टोनीयां । तारिलें दीना या भवसागरीं ॥ १॥
धर्मत्रयींमाजी पत्नीयोगें पडिजे । तें तुंवा काढिजे नवल हें ॥ २ ॥
भवारण्यामाजी तस्करें लुटीजे ॥ तें तुवां रक्षिजे नवल हें ॥ ३ ॥

अज्ञान शत्रुच्या मुखीं सांपडलों । तों तुवां सोडिलें ज्ञानद्वारां ॥४॥
प्रवृत्तीच्याडोहींवाहतमीहोतों । थडी काढिजे तो निवृत्तीच्या ॥५॥
धन्य गुरुमाते कोणेकोणे परी । उपदेशिलें तरी स्वात्मबोधें ॥ ६ ॥
कैसेंकैसें मज अभ्यासें घालोनी । सोडिलें खलूनी हळू हळू ॥ ७ ॥
काय माझा अधिकार ज्ञानालागीं । तो तुवां निजांगीं ब्रह्म केला।८।
सदा लुलु करी तया तृप्त केलें । समाधान दिलें अढळ जें ॥ ९ ॥
तुझिया उपकारा काय उतराई । अर्पितांही पायीं जीव थोडा ।१०।
तुजवरुनिया देहाची कुरवंडी । करितां परवडी उत्तीर्ण नव्हे ॥११॥
देहाच्यापादुकाचरणींलेववितां । नव्हेउत्तीर्णतांकल्पांतींहीं ॥ १२ ॥
मातापिताबंधुमित्रादिस्वजनीं । तारितीनाकोणीं भवडोहीं ॥ १३ ॥
कोणती उपमा तुजलागीं देणें । कदां जें न होणें तेंचि केलें ।१४।
तूंचि मातापिता तूंचि कांतासुता । बंधू तूंचि आतां गुरुराज ॥१५॥
नमो नमो नमो पुन्हा पुन्हा नमन । यापरतें स्तवन करूं नेणें।१६।
ऐके गुणसरितें तुज अव्हेरून । सेविलें म्यां वन मूढमती ॥ १७ ॥
परि तूं कृपाळू उडी घालुनीया । काढिलें उपाया उपदेशूनी ॥१८॥
वक्रदृष्टी अथवा केलें दुर्भाषण । तें तें कृपा करून क्षमा करीं॥१९॥
नकळतां किंवा कळुनी घडलें । तें तें क्षमा केलें पाहिजे वो ।।२०।।
आतां तुझे पायीं देह समर्पिला । हें नोहे पहिला तुझा तूंचि ॥२१॥
ऐसा ब्रह्मानंद राजा पावुनीया । वारंवार पायां वंदीतसे ॥ २२ ॥
यापुढें चुडाल रायासी प्रार्थीत । धन्य तूं बाणत स्वानुभव ॥२३॥
साधन विश्वास सर्व फळा आलें । सदृढचि झालें समाधान ॥२४॥
माझा उपकार थोरसा मानसी । नूतन तुजसी काय दिल्हें ॥२५॥
पहिलाची असंग अससी परिपूर्ण । तया नजाणून संगी होसी ।२६।
तेंचि ज्ञानद्वारा अज्ञान फेडिलें । तेव्हांचि देखिलें असंगासी ॥२७॥
चरणाचाकांटा स्वहस्तें काढिला । उपकारी झाला कोण कोणा २८
तैसा तुजमज भेद नासी राया । येथें उपकारीया कोणकोणा ॥२९॥

परमार्थीतरी तुजमज ऐक्यता । स्वरूपीं अखंडिता भेद कोठें ।३०।
प्रवृत्तीच्याठायीं तरी मी अर्धा देहो । कासया संदेहो भिन्नत्वाचा ३१
असो तुज राया पावलें कीं निज । द्वैताची गजबज विराली कीं ३२
ऐसें ऐकतांचि राजा चरण धरी । नेत्रोदकीं करी अभिषेक ॥ ३३ ॥
चुडालिकेलागीं घेउनी कडीये । नाचतसे राय ब्रह्मानंदीं ॥ ३४ ॥
गुरुशिष्यऐक्यता लग्न होतें झालें । धेंडेनाचविले आजि रामा ॥३५॥
असो चुडालिका हांसोनीबोलत । आतांराया हेत कैसा असे ॥३६॥
तेव्हां राजा बोले कासयाचाहेत । पूर्ण सर्वभरित परमात्मा ॥ ३७ ॥
आतांदेहपडो वर्तो जनींविजनीं । भोगीं कीं स्मशानीं सारिखाचि ३८
तेव्हां चुडालिकाह्मणे रायालागीं । चला लागवेगीं निजनगरा॥३९॥
पूर्वरीतीं आपुलें राज्य चालवावें । प्रारब्ध सारावें भोगोनीयां ।४०।
बहुबरें ह्मणे राजा शिखिध्वज । परि असे सहज विनंती एक ॥४१॥
तुझा माझा कदां वियोग नसावा । संयोग असावा सर्वदाही ॥४२॥
आहार विहार आसन शयन । जन कीं विजन एकेठायीं ॥ ४३ ॥
आणिक प्रार्थना राज्यावरीजातां । एकत्रपाहतां हांसतीलोक ।४४।
ऐसें ऐकुनीया चुडाल हांसत । राया सांगे त्वरित उणें काय ।४५।
कल्पितांचि सेना असंख्य दाटली । सर्व उभी ठेली चातुरंग ।४६।
राज उपचार वस्त्र अलंकार । छत्रादि चामर सिंहासन ॥ ४७ ॥
कोट्यावधी वेत्रपाणी धांवताती । गजरथ पदाती शामकर्ण ॥४८॥
राया आतां व्हावें सुखासनीं स्वार । लागले गजर वाद्यघोष ।४९।
उभयतां एके वहनीं आरूढती । सेना सभोंवतीं चालतसे ॥ ५० ॥
असो ऐसे आले नगराजवळी । वार्ता श्रुत झाली प्रधानासी ॥५१॥
तेणें सर्व सेना सिद्ध करोनीया । शिखिध्वजराया आडवे आले ५२
वंदोनी उभयांसी जयजयकारकरिती । सर्वही अर्पिती उपायनें ।५३।
बहु आनंदोनी प्रवेशती नगरीं । मिरवत गजरीं मार्गे जाती ॥५४॥
नगरी शृंगारिली सर्व नगर नारी । ओंवाळती करीं कनकारत्या ५५

असो उभयतां सभेसी पातले । आसनीं बैसले परमानंदें ॥ ५६ ॥
देशोदेशींचेही राजे भेटी येती । अमोल्य अर्पिती उपायनें ॥५७॥
तेविंच रायानें सर्व गौरविले । प्रजेलागीं केलें सुखरूप ॥ ५८ ॥
असो पुढें ऐसें राज्य चालविती । उभयतांची स्थिति एकरूप ।५९।
सभेचिया ठायीं अथवा उपवनीं । भुवनीं कीं शयनीं उभयतां ।६०।
शिखिध्वजा कदां आमची पट्टराणी । नठावेचि स्वप्नीं क्रीडतांही।६१।
सर्व गुरु ह्मणे जडचंचळ नेणें । माझा चुडाल होणें गुरु मुख्य।६२।
असो ऐसें रामा दहासहस्र वर्षें । चालत संतोषें राज्यभार ॥६३॥
पुढें उभयतांनीं देह विसर्जुनी । पावले निर्वाणी परब्रह्मीं ॥ ६४ ॥
ऐसा इतिहास तुज सांगितला । ऐसा निश्चय केला पाहिजे त्वां ६५
कैचीगा समाधी कैचें हें उत्थान । ज्ञानाज्ञानेंवीण परब्रह्म ॥ ६६ ॥
जग जीव शीव कोठें असे भ्रम । कोठें रूप नाम तुझे ठायीं ॥६७॥
साखरेचें केलें जैसें वृंदावन । कैचें कडूपण असे येथें ॥ ६८ ॥
तैसा तूं परमात्मा सच्चिद्घन रामा । सर्व रूपनामा भेद नाहीं।६९।
आतां संपादावें अवताराचें कृत्य । किरणेंसि आदित्य शोभे जैसा ७०
दुष्ट संहारावे सज्जन पाळावे । शक्तीचें स्वभावें कार्य समजे ॥७१॥
जळांत पद्मिणी तेवीं व्यवहारांत । कीं जगकर्मांत सहस्रकर ॥७२॥
अंतर निष्कर्मी बाहेर सकामी । वर्तावें स्वधर्मीं लोकांसाठीं ॥७३॥
अंतरीं उदास बाह्य सर्व भोगी । वर्तावें या जगीं लोकां ऐसें॥७४॥
वसिष्ठाच्या मुखें पावली निजखुण । साष्टांगें वंदून वरें ह्मणे॥७५॥
ऐसें चुडालीका आख्यान बोलिलें । वसिष्ठें तें केलें निरूपण॥७६॥
तोचि संस्कृताचा अर्थ प्राकृतांत । काढिला संकेत यथामती॥७७॥
तेथें जैसा जैसा असे इतिहास । त्या रीती वाचेस बोलियेले॥७८॥
मुळांत जें नाहीं तें बोलिलें असतां । तरि तेंहि तत्त्वतां क्षमाकीजे७९
अथवाकांहींआशयराहिलाअसतां । तरितेंहितत्त्वतां क्षमाकीजे॥८०॥
श्लोकार्थपदाचीटीकानाहींकेली । कथाजेऐकिलीलिहिलीमात्र ॥८१॥

वाहिली ती गंगा राहिलें तें तीर्थ ।येणें रीती अर्थ अवलोकावा॥८२॥
प्राकृत बोलणें वेदाचें संमत । नाहींच संकेत अन्य दुजा॥ ८३ ॥
अन्यशास्त्राहोयसहजीं खंडन । होतां प्रतिपादन वेदांताचें॥ ८४ ॥
वेदांत हा शुद्धकैसा ओळखावा । तरी अवधारावा निश्चयेसीं॥८५॥
साध्य साधकता दोहींचासंबंध । ब्रह्म शुद्धबुद्ध साध्यरूप॥ ८६ ॥
साधक मुमुक्षु ब्रह्म जाणूं जाय । तोचि एक होय अधिकारी॥८७॥
चतुष्टय जेथें साधनें उमटती । तेचि या वेदांतीं अधिकारी ॥८८॥
अधिकारेंविण श्रवणकरितां । त्या कदां मुक्तता नव्हे नव्हे ॥८९॥
असो वेदांताचें मुख्य रूप कोण । अभेदवर्णन ब्रह्म आत्मा॥९०॥
ब्रह्मप्रत्यगात्मा प्रत्यगात्माब्रह्म । हा विषयपरम वेदांताचा ॥९१॥
ऐशी या विषयाचें ज्ञानसाधकास । होताकायत्यास फळऐका॥९२॥
दुःखसर्व नासे अज्ञानचिजातां । सुखरूपतत्वतां आत्माउरे ॥९३॥
शोकाचें निरसनसुखप्राप्तहोणें । मोक्षाचीं लक्षणें दोहींपरी॥ ९४ ॥
एवं विषय हा मोक्षप्रयोजन । संबंधही जाण अधिकारी ॥ ९५ ॥
ऐसा चतुष्टय अनुबंध जेथें । वोळखावा अर्थ वेदांताचा ॥ ९६ ॥
उपक्रमउपसंहार असावा । मोक्षरूपव्हावा अर्थवाद ॥ ९७ ॥
अभ्यासाच्यायुक्ती आणितदृष्टांत । असावेनिश्चित सर्वसाम्य॥९८॥
मोक्षरूपहोणें लाहेजीवन्मुक्ती । सध्यांहेप्रतीति हेचिदेहीं ॥ ९९ ॥
इतुकीं लक्षणें येथें असतीपहा । ह्मणुनी वेदांत हा वोळखीजे॥ २२००॥
वेदापरतेंदुजें प्रमाण असेना । धन्यहोती जाणा श्रोतेवक्ते॥ २२०१॥

॥ इति श्रीचुडालाऽख्यान संपूर्णम् ॥

॥ शतकें २२ ॥

# अनुभविक स्फुट अभंग.

स्वप्नींचें निधनें भरूनिया लाहे ॥ भला वेव्हार करूं पाहसी ॥ मुद्दलुचि नाहीं तेथें कळांतर कैचें ॥ धरणें अधरणें घेतासी ॥ लटिकियासाठीं संसार दवडोनि ॥ ठकूनि ठकलासी रया ॥ १ ॥ कवणा नागवितोकां नागवसी ॥ वेडावलेपणें ठकसील तूंचि ॥ चोरूनि तुझें त्वांचि नेलें ॥ आतां गाऱ्हाणें कवणा देसीरया ॥ ध्रु० ॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश ॥ हे सहज परमगुण अंशा अंशा आले ॥ येणेंचि कष्टें वेव्हार करितां ॥ कोठें काय सांठविलें विचारूनि पाहे ॥ तुझें त्वांचि नेलें आतां तुजमाजीं हारपलेंरया ॥ २ ॥ पुत्रकलत्र संपत्ति देखोनि संतोष मानिसी घडियेकामाजीं नासोनि जाईल ॥ जैसें कां अभ्रआकाशीं ॥ बापरखुमादेवीवरु विठ्ठलुचि हृदयीं ॥ असतां कां नाडलासीरया ॥ ३ ॥

कापुराया अग्नि स्नेह जाला ॥ मी नाहीं तेथें काय उरला ॥ १ ॥ मीना तेथें कवनियेठायीं ॥ देखत देखत पाहीं भुललासी ॥ ध्रु० ॥ बापरखुमादेवीवर विठ्ठलीं खूण ॥ जाणते जाणती ते अनुभवियें ॥ २ ॥

प्रपंचाचें जगड्‌वाळ दुस्तर जरी मानिसी ॥ त्याग करूनि केउता जासी ॥ जेंजें त्यागिलें तेंतें तुजमाजीं त्यागिलें ॥ तें काय सांग आह्मासी ॥ तुझें तुजाचिमाजीं प्रपंचेसि तूं सर्वांमाजीं वर्तसी ॥ ऐसें जाणोनिया कां विटंबिसी ॥ बापा टाकूनी केउता जाशीरया ॥ १ ॥ मनेंसि विचारीं ॥ निर्धारूनि योग करी ॥ तुझें तुजमाजीं अरे आतां विचारीं बापा ॥ अरी मित्रसम होऊनि मनें हें शुद्ध होय ॥ तेंचि तूं होऊनि राहे जाणबापा ॥ ध्रु० ॥ बाह्य त्यागिसी तरी तो त्यागुचि नव्हे ॥ पालटिसी तरी विटंबना ॥ धरिसि तरीचि तोबंधुमोक्ष मागताहे जडपणा ॥ तरी गेलीया जडेतो मोक्षचि नव्हे ॥ साचा चुकलासि उगाणा ॥ वृत्तिशून्याकारें अवलोकितां तंव तेण नव्हे तुज

वस्तु ज्ञान ॥ ऐसें जाणोनिकां शिणसीरे बापा ॥ हेंचि धरुनि राहे निजखुणरया ॥२॥ ह्मणोनि आतां इतुकें करीं ॥ साच तें हें धरीं तुझें मन होय तुज अधिकारी ॥ तैंसर्वही त्याग तुज फळती बापा॥ जैंएकचि होऊनि निर्धारी ॥ नलगे शिणणें दंडणें ॥ येणेंचि आश्रम भावें ऐसेंचि मनें निर्धारी ॥ बापरखुमादेवीवरु विठ्ठलुचिंतितां ॥ सर्व प्रपंचाची जाली बोहरी ॥ निवृत्तिरायें खुणादाऊनि सकळां ॥ निजींनिजाचे निज निर्धारींरया ॥ ३ ॥

आलियाचा संतोष गेलियाची हानी ॥ नाहीं त्याचा अतिशोवेंचें त्याची काहणी ॥ ऐसे संकल्प विकल्प देहीं ॥ वारिवारि मुंडलिया होय कांहीं॥ तरि बहुरूप्याच्या ठायीं ॥ काईकाई नटूनसेरया ॥१॥ आधीं भीतरु दंडावा ॥ पाठीं बाहिजु मुंडावा ॥ नाहीं तरी योग मांडिवा ॥ कां करिसीरया ॥ध्रु०॥ मागीतलीया भीक ॥ जरी होय निर्दोष ॥ तरि सर्नीयेरजक काय न गमती ॥ देवपणें फूग धरिसील गाढा ॥ तरि वायाविण मुढा सिंतरलासी॥२॥थिगळी घालोनि गळां ॥ ह्मणसी न भियें कळिकाळा ॥ तरि काय कर्मा वेगळा ॥ केहोपाहासी ॥ योगिया ह्मणिजे कैसा ॥ भीतरी काश्मिरी जैसा ॥ मीनलिया पदार्थासरिसा होउनी मिळे ॥३॥ हृदयीं नाहीं जालेपण॥ क्रोधें भवंडिसी लोचन ॥ अंगीं भस्म उधळण ॥ राखराखेल काई ॥ खर लोळे उकरडां काय परत्राचिया चाडा ॥ तैसा मठी बांधोनि मूढा ॥ वर्म चुकलासी ॥४॥ तीर्थव्रत जपस्नान ॥ वाउगें करिसि ध्यान ॥ ऐसेंकरितां आनेआन ॥ मार्ग चुकलासी ॥ शुद्धकरूनियां मन ॥ सेवी निवृत्तीचे चरण ॥ विठ्ठल विठ्ठल ह्मण ॥ नाहीं तरी नाडलासी ॥ ५ ॥

चौऱ्यांसि लक्ष योनि क्रमूनी सायाशीं ॥ नरदेहा ऐसें भांडवल पावलासी ॥ जतन करीरे गव्हारा ॥ नभजे नभजे या संसारा ॥ बीज सांडूनि असारा ॥ वायां झोंबतोसि॥ १॥ हातींचियालागी भूमि

चाळितासी ॥ आपनेणतां तूं परकाय चिंतिसी ॥ मन एक स्वाधीन तरी खुंटलें साधन ॥ सर्व सुखाचें निधान हरि पावसीरया ॥ध्रु०॥ तृणें पशुझकविले ।। ते क्षीरातें विसरले ।। तैसा विषय पाल्हाळें ।। निज चुकलासी ॥ कोटि युगें जन्मवरी ।। येतांजातां येरझारीं ॥ दुःख भोगिसि दुर्धरीरया ।। २ ।। पुत्रकलत्र भवविभव विचित्र ॥ होय जाय सूत्र तूं आपण ह्मण ।। तुझातूंचि नाहीं ऐसें विचारूनि पाहीं ॥ चेतविचोरलासी वेगीं सावध होईरया ॥ ३ ।। तुज नाथिलाची धिंवसा ।। अस्तिकपणाच्या आशा ।। असतें सांडूनि आकाशा ॥ वायां झोंबतोसी ।। दिवस आहे तों धांवावें ।। नाहीं तरी फुटोन मरावें ।। मृगजळ हें अवघें पाहेरया ।।४।। स्वप्नीं साचाचि जोडे ॥ थोडेंना बहुत हातां सांपडे ।। तुटलें प्रीतीचें कुवाडें ।। ऐसें जाणोनिया शरण जाई निवृत्ति ।। तो सोडविल संसृति ।। बापरखुमादेविवरा विठ्ठलाचे भक्तिरया ॥ ५ ॥

आधीं तूं मुक्ताचि होतासीरे प्राणिया ।। परि वासनें पापिणीया नाडिलासी ॥ आधींचें आठवी मग घेई परी ।। हरिनाम जिव्हारीं मंत्रसार ।। १ ।। आदि मध्य हरि ऊर्ध्व वैकुंठ ।। जाईल वासना हरि होईल प्रगट ॥ ध्रु० ॥ एकतत्व धरीं हरिनाम गोड ॥ येरतें काबाड विषय ओढी ॥ नाम तें सांडी वासना पापिणी ॥ एक नारायणीं चाड धरीं ॥ २ ॥ मुक्ताई मुक्तलग्न सांडिली वासना ॥ मुक्तामुक्ती राणा हरि पाठें ॥ नामाचेनि घोटें जळती पापराशी ॥ नये ती गर्भवासीं अरे जना ।। ३ ॥

मुंगी उडाली आकाशीं ।। तिणें गिळिलें सूर्यासी ॥ १ ॥ थोर नवलाव जाहला ।। वांझे पुत्र प्रसवला ।। ध्रु० ।। विंचू पाताळासी जाय ।। शेष माथां वंदी पाय ।।२।। माशी व्याली घार झाली ।। देखोन मुक्ताई हांसली ।। ३ ।। श्रीमत्सद्गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

उत्पर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0003452